मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

# अर्थसंवाद

भारतीय सौर आषाढ - भाद्रपद, 1925

जुलै-सप्टेंबर, 2003 / खंड 27, अंक 2

- कोल्हापूर जिल्ह्याच्या ग्रामीण क्षेत्रातील पतपुरवठा संस्थांचे बहुसंस्थात्मक चित्र
- राज्य सरकारे : काही राजकोषीय प्रश्न, काही अविचार
- विविध वित्त आयोग आणि महाराष्ट्र - एक आढावा
- मानवी विकास : आशय आणि निष्पत्ती
- अर्थशास्त्रातील नोबेल - 2002
- आरक्षणाने सामाजिक समता प्रस्थापित झाली का?
- जे. आर. हिक्स यांच्या विचारांचा आढावा
- भागरूपी विकल्प : संपन्नतेचा सोपान



मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ॥

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जुलै- सप्टेंबर 2003/ खंड 27, अंक 2

**प्रमुख संपादक**
विनायक श्रीधर देशपांडे

**सहायक संपादक**
रवीन्द्र शंकर जोशी

**सल्लागार मंडळ**
(2003-06)
कमलाकर हणवंते
रामकृष्ण सोळुंके
आशुतोष राराविकर
वंदना दांडेकर

**संपादकीय पत्रव्यवहार**
विनायक श्रीधर देशपांडे
'श्रीकमल', 48 विद्या-विहार
प्रतापनगर, नागपूर 440022
दूरध्वनी क्र.(95712) 2237042

## अनुक्रमणिका

● कोल्हापूर जिल्हयाच्या ग्रामीण क्षेत्रातील पतपुरवठा संस्थांचे बहुसंस्थात्मक चित्र (लेखांक दुसरा)
रवीन्द्र दोशी ...... 101

● राज्य सरकारे : काही राजकोषीय प्रश्न, काही अविचार
नी. भा. सप्रे ...... 128

● विविध वित्त आयोग आणि महाराष्ट्र - एक आढावा
विलास खंदारे ...... 135

● मानवी विकास : आशय आणि निष्पत्ती
मुक्ता जहागिरदार ...... 142

● अर्थशास्त्रातील नोबेल - 2002
अनिल वर्तक ...... 152

● आरक्षणाने सामाजिक समता प्रस्थापित झाली का ?
माधव गायकवाड ...... 159

● जे. आर. हिक्स यांच्या विचारांचा आढावा
श्री. प्र. कुलकर्णी ...... 167

● भागरूपी विकल्प : संपन्नतेचा सोपान
शि. ना. माने ...... 178

● जागतिकीकरण व भारतीय शेती - टिपण
एम.एन. शिंदे ...... 182

● कृषी उत्पादनातील बदल (मराठवाडा) - संकीर्ण
एस. आर. टकले ...... 189

मराठी अर्थशास्त्र परिषद
कार्यकारी मंडळ (2003-04)

.................................

● अध्यक्ष
सूर्यकांत जगदाळे

.................................

● कार्याध्यक्ष
ज.फा. पाटील

.................................

● कार्यवाह खजिनदार
सर्जेराव ठोंबरे

.................................

● प्रमुख संपादक 'अर्थसंवाद'
विनायक श्रीधर देशपांडे

.................................

● सदस्य
दिलीप कदम
जनार्दन जाधव
कांतीलाल ठक्कर
चारुदत्त गोखले
विजय कांत
कुंदा दामले
रवींद्र जोशी
राम देशमुख
पंढरीनाथ टकले
अमृत पोळ
प्र.ब. कुलकर्णी
बा. भा. पावडे

.................................

● अर्थसंवादासाठी अनुदानाबद्दल आभार:
1)पश्चिम विभागीय केंद्र, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, मुंबई
2)महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई
(टिप : म. रा. सा.सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)

● कार्यालयीन पत्रव्यवहार

.................................

(वर्गणी पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे, अर्थसंवाद वितरणाविषयी पत्रव्यवहार, इत्यादी.)
**डॉ.सर्जेराव ठोंबरे**
कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा समन्वयक, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र, विवेकानंद महाविद्यालय, समर्थ नगर, औरंगाबाद-431001
(दूरध्वनी : 95240-2380702)

.................................

● परिषदेचे प्रमुख कार्यालय
मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन.रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस, फ्लॅट क्रमांक 6 'एफ ब्लाक' कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर,
बांद्रे(पूर्व), मुंबई 400051

.................................

**वर्गणी**

**(अ) परिषदेचे सदस्य**

**1) आजीव सदस्य : रु. 1200 (एकरकमी)**
**2) साधारण सदस्य : रु. 150 (वार्षिक)**
**3) संस्था सदस्य :**
**शैक्षणिक संस्था : रु. 150 (वार्षिक)**
**व्यवसायिक संस्था : रु. 200 (वार्षिक)**

**(परिषदेच्या सदस्यांना अर्थसंवाद त्यांच्या वर्गणीतच दिला जातो.)**

**(आ) अर्थसंवाद वर्गणीदार**
**ग्रंथालये : रु. 150 (वार्षिक)**
**(इ) वर्षगणना : 1 एप्रिल ते 31 मार्च**

.................................

कृपया वर्गणी मनीआर्डर वा डिमांड ड्राफ्ट ने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांना कडे पाठवावी.

# कोल्हापूर जिल्हयाच्या ग्रामीण क्षेत्रातील पतपुरवठा संस्थांचे बहुसंस्थात्मक चित्र

(लेखांक दुसरा)

● **रवीन्द्र दोशी,**

***भूतपूर्व प्राध्यापक व विभाग प्रमुख***
***अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ***
***कोल्हापूर आणि भूतपूर्व प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'***

## 1. उपोद्घात

1.1 ब्रिटिश राजवटीच्या कालखंडात सन 1904 मध्ये भारतात सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली. प्रारंभी तिने पतपुरवठ्यावर लक्ष केन्द्रित केले होते, हेतू हा की, शेतकऱ्यांची ग्रामीण सावकारांच्या कचाट्यातून सुटका करावयाची. ग्रामीण भागात सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन केल्यास सावकारांकडून डोईजड व्याज दराने कर्जे घेण्याला एक परिणामकारक पर्याय उपलब्ध होईल असा विश्वास त्यामागे होता. तथापि, सरकारच्या पुढाकाराने आणि पाठिंब्याने मार्गरत असलेल्या सहकारी चळवळीच्या माध्यमातून एकोणीसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत तरी ग्रामीण पतपुरवठ्याच्या क्षेत्रात भरीव कामगिरी होऊ शकली नाही. अखिल-भारतीय ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षण समितीच्या अहवालाने (1954)यावर प्रकाश टाकलेला आहेच. वास्तव ध्यानात घेतल्यानंतरही समितीने भारतातील सहकारी चळवळीमध्ये नवचैतन्य आणण्यासाठी विविध उपाययोजना सुचविल्या त्या एवढ्याच विश्वासाने की, ग्रामीण जनतेची पैशाची निकड त्या त्या वेळी भागविण्याची क्षमता सहकारी पतपुवठा संस्थांमध्येच आहे. म्हणून त्यांना कार्यात्मकदृष्टचा सुदृढ बनविण्यासाठी विविध प्रकारे हातभार लावण्यात आला.

1.2 भारतात 1960 च्या दशकाच्या मध्यापासून कृषी क्षेत्रात हरित क्रान्तीने जसे मूळ धरले तशी ग्रामीण पतपुरवठ्यासाठीची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली. या परिस्थितीत पतपुरवठ्याच्या मागणी-पुरवठ्याचा मेळ घालणे सहकारी पतपुरवठा संस्थांच्या आवाक्याबाहेरचे होऊ लागले. शेतीसाठीच्या पैशाची मागणी वेगाने वाढत राहणार असे स्पष्ट झाल्यानंतर ती पुरविण्यासाठी एकच एक अशा वित्तसंस्था प्रकारावर विसंबून राहण्याऐवजी बहुसंस्थात्मक धोरण अनुसरण्याचा विचार प्रकर्षाने पुढे आला. राष्ट्रीय धोरण म्हणून तो स्वीकारण्यातही आला. याचे प्रत्यंतर नंतरच्या घटनांमधून आले. दोन टप्प्यांत भारतातील मोठ्या 20 व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण होऊन त्यांना ग्रामीण पतपुरवठ्याकडे वळण्यास भाग पाडण्यात आले. त्यासाठी ग्रामीण शाखाविस्ताराला प्राधान्य देण्यास बँकांना सांगण्यात आले. विभागीय ग्रामीण

बँकांची स्थापना, कृषक सहकारी सेवा संस्थांचे संघटन, नागरी सहकारी बँकांचा ग्रामीण क्षेत्रातील प्रवेश आणि अलीकडेच स्व-सहायता गटांच्या बांधणीसाठी दिले जात असलेले प्रोत्साहन या सर्व त्यानंतरच्या घटना होत. एवढे करून देखील ग्रामीण पतपुरवठ्याच्या मागणी-पुरवठ्यातील तफावत भरून काढणे संस्थात्मक संरचनेला शक्य झालेले नाही. त्यामुळे ग्रामीण सावकारी अजूनही लव्हाळ्याप्रमाणे टिकून राहिली आहे. फक्त तिचा प्रभाव पूर्वीपेक्षा कमी झाला आहे एवढीच समाधानाची बाब मानता येईल. असे असले तरी तिचे अस्तित्व दुर्लक्षिण्याइतके नगण्य नाही याचा विसर न व्हावा.

1.3 या वास्तवाचे विश्लेषण कसे करता येईल? सरकारी तसेच खाजगी क्षेत्रातील व्यापारी बँका ग्रामीण भागात पोचण्यात कमी पडल्या असे म्हणावयाचे काय ? व्यापक क्षेत्रात विखुरलेल्या असूनही सहकारी पतपुरवठा संस्था कार्यकुशलता दाखविण्यात अयशस्वी झाल्या काय ? काही ठिकाणीच पतपुरवठा संस्थांची गर्दी झाल्यामुळे त्या सर्वच कमकुवत बनल्या काय ? औपचारिक संस्थांच्या किचकट कार्यपद्धतीमुळे ग्रामीण जनतेला आपल्या परंपरागत 'देवा' कडे जाणेच अधिक सुकर वाटते काय ?

1.4 या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आपल्याला पतपुरवठा संस्थांच्या बहुसंस्थात्मक चित्राचे परिशीलन करणे आवश्यक आहे. त्यासाठीचा एक निकष म्हणून त्यांच्या स्थानीय केन्द्रीकरणाचा विचार करता येईल. या संस्थांचा शाखानिहाय वित्तीय तपशील मिळाल्यास या विश्लेषणाला पुष्टी मिळू शकेल; तथापि असा तपशील मिळणे स्वतंत्रपणे अभ्यास करणाऱ्या संशोधकाला दुरापास्त असते. यास्तव याठिकाणचे विश्लेषण हे, पहिले पाऊल यादृष्टीने, या संस्थांचे स्थानीय विकेन्द्रीकरण आणि कार्यात्मक कार्यदक्षता या संदर्भातच मर्यादित ठेवलेले आहे. त्याकरिता कोल्हापूर जिल्हा हा घटक अभ्यासासाठी निवडला आहे. हा जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या अगदी दक्षिण टोकाला आहे.

1.5 कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी पतपुरवठा संस्थांमध्ये नागरी सहकारी बँका, प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था, महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण विकास बँक आणि स्व-सहायता गट यांचा अंतर्भाव होतो. जिल्ह्यात एकही विभागीय ग्रामीण बँक नाही. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँक ही या क्षेत्रात महत्वपूर्ण भूमिका वठविणारी संस्था आहे.

## 2. नागरी सहकारी बँका

2.1 व्यापारउदीम आणि लहान उद्योगांची वित्तीय गरज भागविण्याच्या उद्देशाने या बँका विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासून कोल्हापूर जिल्ह्यात स्थापन होत गेल्या. त्या प्रामुख्याने नागरी क्षेत्रात कार्य करीत असल्या तरी अलीकडे त्यानी जिल्ह्याच्या ग्रामीण क्षेत्रातही चंचुप्रवेश केलेला आहे. 31 मार्च 2000 रोजी जिल्ह्यात 64 नागरी सहकारी बँका होत्या. त्यांची एकंदर शाखासंख्या 362 होती; त्यापैकी 338 शाखा जिल्ह्यात होत्या आणि 24 शाखा जिल्ह्याबाहेर होत्या. याखेरीज, कोल्हापूर जिल्ह्याबाहेरच्या नागरी सहकारी बँकांच्या 4 शाखा जिल्ह्यात कार्यरत होत्या. अशा रीतीने कोल्हापूर जिल्ह्यात नागरी सहकारी बँकांची एकूण 342 (338+4) कार्यालये अस्तित्वात होती. त्यांचे जिल्ह्यामध्ये अपस्करण (dispersion) कसे झाले आहे ते आता पाहू.

2.2 उपरिनिर्दिष्ट 342 कार्यालयांची तालुकानिहाय स्थिती तक्ता 1 मध्ये दाखविली आहे. प्रारंभीच एक बाब स्पष्ट आहे की, बहुसंख्य शाखा नागरी क्षेत्रामध्ये कार्यरत असणे हे नागरी सहकारी बँकांच्या संघटनेचे मूलभूत अंग आहे.

**तक्ता क्र. 1**

**कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांच्या कार्यालयांचे तालुकानिहाय अपस्करण (31 मार्च 2002)**

| तालुका | कार्यालयांची (शाखांची) संख्या | नागरी शाखा | अर्ध-नागरी शाखा | ग्रामीण शाखा |
|---|---|---|---|---|
| 1. करवीर | 142 | (1) कोल्हापूर शहर ........ 117<br>(2) गोकुळ शिरगांव औद्योगिक वसाहत ............ 1<br>एकूण ....... 118 | 12<br>(पैकी गांधी नगर ...8) | 12 |
| 2. हातकणगले | 76 | (1) इचलकरंजी..38<br>(2) शिरोली औ. वसाहत........2<br>(3) नवी औ. वसाहत....... 1<br>एकूण .......... 41 | 23<br>(पैकी हुपरी...9) | 12 |
| 3. शिरोळ | 39 | पार्वती औ. वसाहत...1 | 21<br>(पैकी जयसिंगपूर...14) | 18 |
| 4. कागल | 16 | - | कागल.......4 | 12 |
| 5. गडहिंग्लज | 24 | - | गडहिंग्लज.....14 | 10 |
| 6. आजरा | 6 | - | आजरा.......4 | 2 |
| 7. पन्हाळा | 11 | - | 2 | 9 |
| 8.शाहूवाडी | 9 | - | - | 9 |
| 9. राधानगरी | 8 | - | - | 8 |
| 10. भुदरगड | 4 | - | गारगोटी .....4 | - |
| 11. चंदगड | 5 | - | - | 5 |
| 12. गगनबावडा | 1 | - | - | 1 |
| एकूण | 342 | 160 | 84 | 98 |

स्रोत : कोल्हापूर जिल्हा नागरी बँका सहकारी संघ, मर्यादित, कोल्हापूर यांच्याकडील माहितीच्या आधारावर वरील तक्ता तयार केला आहे.

त्यानुसारजिल्हयातील 342 पैकी 160 बँकशाखा (46.78 टक्के) नागरी क्षेत्रात होत्या. अर्धनागरी शाखांची टक्केवारी 24.57 आणि ग्रामीण शाखांची टक्केवारी 28.65 होती.

2.3 आता आपल्या मुख्य विषयाच्या संदर्भात, यापुढील विश्लेषणासाठी 98 ग्रामीण शाखांवर लक्ष

**तक्ता क्र. 2**

**कोल्हापूर जिल्हयातील नागरी सहकारी बँकांच्या ग्रामीण शाखांचे अपस्करण**

**(31 मार्च 2000)**

| तालुका | फक्त नागरी सहकारी बँकांच्याच शाखा असलेली ठिकाणे (संख्या) | नागरी सहकारी बँकां बरोबरच इतर बँकांच्याही शाखा असलेली ठिकाणे (संख्या) | नागरी सहकारी बँकांबरोबरच इतर बँकांच्याही शाखा असलेल्या ठिकाणांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | केवळ राष्ट्रीयीकृत बँका | केवळ खाजगी बँका | केवळ कोल्हा. जिल्हा.म. बँका | राष्ट्रीयीकृत बँक आणि कोल्हा.जिल्हा म. बँका | खाजगी बँक आणि कोल्हा. जिल्हा म. बँका |
| 1. करवीर | 2 | 7 | 1 | 2 | 2 | 1 | 1 |
| 2. हातकणगले | 5 | 6 | - | 2 | 2 | 1 | 1 |
| 3. शिरोळ | 5 | 9 | 1 | 4 | 2 | 2 | - |
| 4. कागल | 2 | 6 | - | - | 2 | 4 | - |
| 5. गडहिंग्लज | 3 | 5 | - | - | 1 | 3 | 1 |
| 6. आजरा | - | 1 | - | - | - | 1 | - |
| 7. पन्हाळा | - | 5 | - | 1 | 2 | 2 | - |
| 8. शाहूवाडी | 1 | 3 | - | - | - | 3 | - |
| 9. राधानगरी | - | 5 | - | - | 1 | 4 | - |
| 10. भुदरगड | - | - | - | - | - | - | - |
| 11. चंदगड | 2 | 2 | - | - | - | 2 | - |
| 12.गगनबावडा | - | 1 | - | - | - | 1 | - |
| एकूण | 20 | 50 | 2 | 9 | 12 | 24 | 3 |

केन्द्रित करण्यात येईल. कारण, त्यावरून बँक व्यवसायाचे ग्रामीण क्षेत्रात अपस्करण होण्यास नागरी सहकारी बँकांचा कितपत हातभार लागला आहे ते ध्यानात येईल. यासाठी तक्ता 2 मधील माहिती उपयोगी पडेल. जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांनी ग्रामीण भागातील 70 ठिकाणी आपल्या शाखास्थापन केल्या आहेत. विशेष म्हणजे, त्यापैकी 20 ठिकाणी (28.57 टक्के) एकही बँक शाखा नव्हती. या प्रमाणात त्यानी ग्रामीण क्षेत्रातील बँक शाखांच्या उपलब्धतेची पोकळी भरून काढली; हे त्यांचे महत्त्वाचे योगदान मानले पाहिजे. असे असले तरी, त्यानी अशा वेळी सधन तालुक्यांवरच प्रामुख्याने लक्ष केन्द्रित केलेले आहे. करवीर, हातकणगले, शिरोळ, कागल व गडहिंग्लज हे ते तालुके होत. जिल्हयाच्या पश्चिमेकडील डोंगराळ भागातील तालुक्यांकडे त्यानी जवळपास पाठ फिरविली आहे.

2.4 जी काही खेडी या शाखारहित तालुक्यांतून निवडली त्यांच्याबाबत थोडा खोलवर विचार करू या. करवीर, हातकणगले, शिरोळ व कागल तालुक्यातील नागरी बँकांच्या शाखा स्थापलेली सर्व खेडी तसेच गडहिंग्लज तालुक्यातील तीन खेडी या सर्व खेड्यांचा उल्लेख यापूर्वीच्या लेखात[1] बँकांच्या शाखा स्थापण्यासाठी अनुकूल खेड्यांच्या यादीत केलेला आहे. त्यांचा तपशील तक्ता 3 मध्ये दिला आहे. त्याचा मागोवा घेतल्यास, इथे तारांकित नसलेल्या चार गावांचा उल्लेख बँक शाखा स्थापन करण्यासाठी अनुकूल म्हणून निर्देशित गावांच्या यादीत नसल्याचे लक्षात येईल. कारण एवढेच की, या गावांची लोकसंख्या 3,000 पेक्षा कमी आहे, आणि सक्षम बँकशाखेसाठी किमान 3,000 लोकसंख्येची एक लक्ष्मण रेषा त्या संदर्भात स्पष्ट केलेली आहे. नागरी सहकारी बँकांनी अशा अतिलहान गावात जाण्याचे (3 गावे) धाडसच केले आहे असे म्हणावे लागते ! असो. नागरी बँका तारांकित 17 गावांमध्ये पोचलेल्या आहेत याची नोंद घेऊन बँकविरहित गावांच्या आपल्या मूळ यादीतून या गावांना वगळण्याला काहीच हरकत नाही.

2.5 इथे एक मुद्दा मात्र कटाक्षाने ध्यानात घ्यावयाला पाहिजे. उपरिनिर्दिष्ट 20 गावांपैकी वडणगे (करवीर तालुका) आणि शिरढोण (शिरोळ तालुका)ही प्रत्येकी दोन शाखा असलेली अपवादात्मक गावे वगळता उर्वरित 18 गावांमध्ये प्रत्येकी फक्त एकच शाखा नागरी सहकारी बँकांची आहे. सर्व प्रकारच्या बँकांनी एक पथ्य आवर्जून पाळावयाला हवे आहे. कोणत्याही खेडेगावात शक्य तो एकापेक्षा अधिक बँक शाखा नसाव्यात. असे झाल्यासच त्या एकुलत्या एक शाखेला पुरेसा व्यवसाय मिळून ती स्वयंनिर्वाही (Viable) बनेल. एकापेक्षा अधिक शाखांची गर्दी झाल्यास त्यामुळे सर्वांचेच नुकसान होईल. कुणालाही पुरेसा व्यवसाय मिळणार नाही आणि कुणीही स्वयंनिर्वाही होऊ शकणार नाही. एवढ्यासाठीच धोरण म्हणून भविष्यात कोणत्याही राष्ट्रीयीकृत वा खाजगी बँकेने तसेच कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने या गावांमध्ये आपल्या नव्या शाखा उघडू नयेत. त्याचप्रमाणे, नागरी सहकारी बँकांनाही भविष्यातील धोरण म्हणून आपल्या शाखाविस्तारासाठी आर्थिक क्षमता असलेल्या बँकविरहित गावांचीच निवड करण्याचा दृष्टिकोन ठेवावा.

2.6 आता नागरी सहकारी बँकांच्या शाखा असलेल्या उर्वरित 50 गावांचा विचार करू. या गावांत नागरी बँकांच्या शाखांबरोबरच दुसऱ्या कोणत्या तरी बँकांच्याही शाखा खांद्याला खांदा लावून काम करताहेत. महत्त्वाचे म्हणजे, यातील जवळपास 50 टक्के गावांमध्ये नागरी बँकांच्या शाखेबरोबरच राष्ट्रीयीकृत बँकेची/बँकांची आणि कोल्हापूर

**तक्ता क्र. 3**

**नागरी सहकारी बँकांनी व्यापलेली शाखाविरहित खेडी**

| तालुका | व्यापलेली खेडी | लोकसंख्या (1991) | शाखांची संख्या |
|---|---|---|---|
| 1. करवीर | (1) वडणगे* | 10,740 | 2 |
| | (2) पाचगांवे* | 5,069 | 1 |
| 2. हातकणगले | (1) आळते* | 8,644 | 1 |
| | (2) खोची* | 5,109 | 1 |
| | (3) किणी* | 6,400 | 1 |
| | (4) जुने पारगांव* | 8,999 | 1 |
| | (5) तळंदगे | 4,078 | 1 |
| 3. शिरोळ | (1) कवठे गुलंद* | 3,210 | 1 |
| | (2) घालवाड* | 3,207 | 1 |
| | (3) शिरढोण* | 8,266 | 2 |
| | (4) आलास* | 5,957 | 1 |
| | (5) यड्राव* | 6,599 | 1 |
| 4. कागल | (1) कसबा सांगाव* | 8,132 | 1 |
| | (2) सुळकूड* | 4,613 | 1 |
| 5. आजरा | - | - | - |
| 6. गडहिंग्लज | (1) कौलगे* | 2,499 | 1 |
| | (2) दुंडगे* | 3,215 | 1 |
| | (3) कडगाव* | 5,505 | 1 |
| 7. पन्हाळा | - | - | - |
| 8. शाहूवाडी | (1) केर्ले | 818 | 1 |
| 9. राधानगरी | - | - | - |
| 10. भुदरगड | - | - | - |
| 11. चंदगड | (1) शिणोली | 1,543 | 1 |
| | (2) कार्वे | 939 | 1 |
| 12. गगनबावडा | - | - | - |
| एकूण | 20 गावे | - | 22 |

टीप : तारांकित दर्शविलेल्या गावांत राष्ट्रीयीकृत/खाजगी बँकांच्या शाखा नव्हत्या. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्याही शाखा नव्हत्या. त्यामुळे या गावांचा समावेश माझ्या 'अर्थसंवाद' एप्रिल-जून, 2003 अंकातील लेखात बँक विरहित गावांच्या यादीत केलेला आहे. (तक्ता 8, पृष्ठे 59-60)

जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखाही अस्तित्वात आहेत. याचा अर्थ किमान 3 बँक शाखा व्यवसायासाठी स्पर्धा करताहेत. पंचवीस टक्के गावांमध्ये नागरी बँकांच्या शाखां समवेत केवळ जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखा असल्याने तिथे किमान 2 बँक शाखांमध्ये स्पर्धा आहे. वीस टक्के गावांमध्ये केवळ खाजगी बँकांच्या शाखा नागरी बँकांच्या शाखांशी स्पर्धा करीत असल्याने तिथेही किमान 2 बँकांचे अस्तित्व आहे. थोडक्यात, निर्देशित 50 गावांमध्ये एकापेक्षा अधिक बँका स्थापन

**तक्ता क्र. 4**

**नागरी सहकारी बँकांबरोबरच इतर बँकांच्याही शाखा असलेल्या 50 गावांचे तालुकानिहाय विवरण**

| तालुका | गाव | लोकसंख्या (1991) | नागरी सहकारी बँकांच्या शाखा | इतर बँकांच्या शाखा | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | राष्ट्रीयीकृत बँका | खाजगी बँका | कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँक |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1. करवीर | (1) गडमुडशिंगी | 9,850 | 1 | 1 | - | - |
| | (2) परिते | 4,562 | 1 | 1 | - | 1 |
| | (3) हळदी | 2,786 | 1 | - | 1 | - |
| | (4) उचगांव | 14, 790 | 1 | - | 1 | - |
| | (5) कुडित्रे | 4,760 | 2 | - | 1 | 1 |
| | (6) कसबा बीड | 3,447 | 2 | - | - | 1 |
| | (7) शिरोली दुमाला | 3,997 | 1 | - | - | 1 |
| 2. पन्हाळा | (1) काले | 5,712 | 4 | 1 | - | 1 |
| | (2) सातवे | 5,018 | 1 | 1 | - | 1 |
| | (3) कोतोली | 4,477 | 1 | - | 1 | 1 |
| | (4) वारणानगर | 22,542 | 1 | - | - | 1 |
| | (5) आसुर्ले पोर्ले | 2,711 | 2 | - | - | 1 |
| 3.हातकणगले | (1) वाठार | 4,682 | 1 | 1 | - | 1 |
| | (2) इंगळी | 5,626 | 1 | - | 1 | - |
| | (3) कुंभोज | 12,457 | 1 | - | 1 | 1 |
| | (4) रेंदाळ | 12, 239 | 2 | - | 1 | - |
| | (5) हेर्ले | 9,945 | 1 | - | - | 1 |
| | (6) यळगुड | 4,735 | 1 | - | - | 1 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4. शिरोळ | (1) नांदणी | 12,314 | 3 | 1 | - | - |
| | (2) अबदुल्लाट | 13,161 | 1 | 1 | - | 1 |
| | (3) दत्तवाड | 8,249 | 1 | 1 | - | 1 |
| | (4) गणेशवाडी | 1,795 | 1 | - | 2 | - |
| | (5) नरसोबावाडी | 4,664 | 2 | - | 1 | - |
| | (6) कोथळी | 7,272 | 1 | - | 1 | - |
| | (7) टाकळी | 4,994 | 1 | - | 1 | - |
| | (8) खिद्रापूर | 2,713 | 1 | - | - | 1 |
| | (9) दानोळी | 10,659 | 1 | - | - | 1 |
| 5. कागल | (1) बिद्री | 3,676 | 2 | 1 | - | 1 |
| | (2) सेनापती कापशी | 5,301 | 1 | 1 | - | 1 |
| | (3) सिद्धनेर्ली | 4,665 | 1 | 1 | - | 1 |
| | (4) मुरगुड | 8,598 | 4 | 1 | - | 1 |
| | (5) मौजे सांगाव | 5,634 | 1 | - | - | 1 |
| | (6) लिंगनूर | 2,291 | 1 | - | - | 1 |
| 6.गडहिंग्लज | (1) नेसरी | 5,705 | 2 | 1 | - | 1 |
| | (2) कसबा नूल | 5,466 | 1 | 1 | - | 1 |
| | (3) महागांव | 6,482 | 1 | 1 | - | 1 |
| | (4) हरळी | 3,090 | 1 | - | - | 1 |
| | (5) हलकर्णी | 5,572 | 2 | - | 1 | 1 |
| 7.चंदगड | (1) चंदगड | 7,819 | 2 | 1 | - | 1 |
| | (2) कोवाड | 3,009 | 1 | 1 | - | 1 |
| 8.आजरा | (1) उत्तूर | 6,656 | 2 | 1 | - | 1 |
| 9.भुदरगड | - | - | - | - | - | - |
| 10.राधानगरी | (1) सरवडे | 6,263 | 1 | 1 | - | 1 |
| | (2) राधानगरी | 5,045 | 3 | 1 | - | 1 |
| | (3) राशिवडे | 8,051 | 1 | 1 | - | 1 |
| | (4) कसबा वाळवे | 5,611 | 2 | 1 | - | 1 |
| | (5) कसबा तारळे | 3,770 | 1 | - | - | 1 |
| 11.गगनबावडा | (1) गगनबावडा | 1,646 | 1 | 1 | - | 1 |
| 12.शाहूवाडी | (1) सरुड | 6,247 | 1 | 1 | - | 1 |
| | (2) मलकापूर | 5,238 | 4 | 1 | - | 1 |
| | (3) बांबवडे | 2,437 | 3 | 1 | - | 1 |
| एकूण | 50 गावे | - | 76 | 26 | 13 | 40 |

टीप : वारणानगर ही कोडोली गावाच्या हद्दीतील एक वसाहत आहे. त्यामुळे तिची लोकसंख्या स्वतंत्रपणे उपलब्ध नाही. तिचा अंतर्भाव कोडोली गावाच्या लोकसंख्येतच केलेला आहे.

झालेल्या असल्यामुळे साहजिकच जास्तीतजास्त व्यवसाय करण्याकरिता त्याना परस्परांशी स्पर्धा करावी लागते. यातच अनेक बँकांच्या आर्थिक दुबळेपणाचे बीज सापडते.

2.7 ज्या 50 गावांमध्ये एकापेक्षा अधिक बँकशाखा आहेत त्यांचा तपशील तक्ता 4 मध्ये दिला आहे. त्यावरून ध्यानात येईल की, फक्त सहा गावांची (12 टक्के) लोकसंख्या दहा हजारांहून अधिक असून तिथे वेगवेगळ्या बँकांच्या 2,3, किंवा 4 शाखा आहेत. सात गावांची (14 टक्के) लोकसंख्या 7000 ते 10,000 दरम्यान असून तिथे सामान्यत: 2 ते 3 शाखा आहेत. यामध्ये देखील ठळकपणे नजरेत भरणारी दोन गावे आहेत; चंदगडमध्ये 4 शाखा तर मुरगुडमध्ये 6 शाखा आहेत ! उर्वरित सर्व गावे 7 ,000 पेक्षा कमी लोकसंख्येची असून (74 टक्के गावे) तिथेही बँकांच्या 2,3 किंवा 4 शाखा आढळतात. पन्हाळा तालुक्यातील काले गावाची लोकसंख्या 5,712 आणि बँकांच्या 6 शाखा असे चित्र आढळते; यापैकी 4 शाखा तर नागरी सहकारी बँकांच्याच आहेत ! गगनबावडा हे सर्वात लहान गाव, जेमतेम 1,646 वस्तीचे. तिथेही 3 बँकशाखा कार्य करताहेत.

2.8 नागरी सहकारी बँकांबरोबरच इतर प्रकारच्या बँकांच्या शाखा असलेल्या गावांच्याबाबत वरील तपशील लक्षात घेता त्यातून काही प्रश्न पुढे येतात. इतर प्रकारच्या बँकांपैकी कोणत्या तरी प्रकारच्या बँकेने संबंधित गावात आपली शाखा प्रथमत: स्थापन केली असण्याची शक्यता आहे. त्यानंतर इतर प्रवर्गातील बँका तिथे पोचल्या असणार. कालक्रमानुसार मागोवा घेतल्यास बहुतेक गावांमध्ये प्रथम पोचण्याचे काम जिल्हा मध्यवर्ती बँकेचे आहे. काही ठिकाणी खाजगी बँकांचा पुढाकार असेल, कारण त्याही बऱ्याच वर्षापूर्वी स्थापन झालेल्या असून त्यांचा आधार कोल्हापूर-सांगली जिल्हेच आहेत. राष्ट्रीयीकृत बँकांचा प्रवेश 1969 नंतरचा आहे हे तर स्पष्टच आहे. अशा परिस्थितीत, ग्रामीण शाखाविस्तार करताना, जिथे बँकशाखा उपलब्ध आहेत अशा गावांमध्येच शिरून आणखी गर्दी करण्यापेक्षा ज्या गावांत व्यापारी बँकेची शाखा नाही अशा गावांकडे वळणे राष्ट्रीयीकृत बँकांच्या दृष्टीने अधिक उचित ठरले असते. याबाबतही काही गावांचा अपवाद होउ शकेल, कारण एकापेक्षा अधिक बँक शाखा तिथे गरजेच्या ठरतील. म्हणून, 1969 नंतर बँकांच्या ग्रामीण शाखाविस्ताराचे तर्कशुद्ध धोरण अनुसरले गेले असते तर आतापर्यंत अनेक बँकविरहित गावांना बँक सेवा मिळू शकल्या असत्या. नागरी सहकारी बँकांचा या संबंधातील क्रमांक शेवटचा लागतो. या बँकांनी बँक विरहित गावांमध्ये जाण्याचा थोडासा प्रयत्न केला. अशा 20 गावांची नोंद आपण यापूर्वी घेतली आहेच; तिथे एकूण 22 शाखा स्थापन झाल्या. या प्रयत्नाची प्रशंसा करावयाला हवी. तथापि, त्यांनी ज्या इतर 50 गावांची निवड करून एकंदर 76 शाखा स्थापन केल्या तिथे मात्र प्रस्थापित बँकांशी स्पर्धा करण्याचा मार्ग पत्करला. त्या त्या गावांची लोकसंख्या विचारात घेतल्यास, तिथे अनेक संस्थांची खरोखरच गरज होती काय असा प्रश्न पडतो. काही मोजकी गावे वगळता इतर गावे लहान वा मध्यम आकाराचीच आहेत. अशा ठिकाणी सर्वच बँक शाखांना पुरेसा व्यवसाय उपलब्ध होण्याची शक्यता कमी असते. त्यामुळे प्रत्येक शाखा आर्थिक दृष्ट्या जीवनक्षम बनण्याचा संभव कमीच यातून एक गोष्ट स्पष्ट होते की, ग्रामीण पतपुरवठ्याचा बहुसंस्थात्मक दृष्टीकोन ही संकल्पना चुकीच्या पद्धतीने समजून घेउन प्रत्येक गावात एकाहून अधिक औपचारिक वित्तसंस्था स्थापन करण्याचा मार्ग स्वीकारला गेला; हे करताना त्यांच्या कार्यात्मक कार्यदक्षतेकडे दुर्लक्ष झाले. अग्रणी बँक (Lead Bank) कार्यक्रमातूनही

जिल्ह्यातील ग्रामीण शाखाविस्ताराचे जाणीवपूर्वक नियोजन झाले नाही. या कार्यक्रमाचे विशेष लक्ष ठेवी संकलन आणि कर्जपुरवठा यावरच केन्द्रित झाल्याने शाखाविस्ताराचे काम ज्या त्या बँकांनीच सांभाळावयाचे होते. खरे तर, ग्रामीण कर्जासाठीची वेगाने वाढणारी मागणी योग्यवेळी पुरविता यावी यासाठी विविध प्रवर्गातील वित्तसंस्था स्थापन करणे अशी बहुसंस्थात्मक दृष्टीकोनाची धारणा होती. यातून हे अभिप्रेत नव्हते की, अनेक संस्थांनी स्थानीय स्तरावर केन्द्रीकरण करून सर्वांनाच आर्थिक दृष्ट्या दुर्बल बनवावयाचे. आजपर्यंत घडले ते असे. निदान भविष्यकाळात तरी ग्रामीण शाखाविस्तार करताना सर्वच प्रवर्गातील बँकांनी स्वहितासाठी का असेना शाखांची गर्दी टाळण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करावयाला हवा.

### 3. प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था

3.1 ग्रामीण वित्तव्यवस्थेमध्ये प्राथमिक कृषी आणि बिगर कृषी सहकारी पतसंस्थांना महत्त्वाचे स्थान आहे. सभासदत्वाच्या माध्यमातून लोकसहभाग हे या संस्थांचे बलस्थान मानले जाते. त्यामुळे या संस्थांचे यश मोठे असते असा दावा केला जातो. अर्थात, वास्तव त्याहून वेगळे असल्याचा प्रत्यक्षातला अनुभव आहे. आता कोल्हापूर जिल्ह्याच्या तपशिलाकडे वळू.

3.2 प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था

3.2.1. या उप-वर्गीकरणात सहकार खाते पुढील संस्थांचा समावेश करते : (1) प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था (सर्वसाधारण), (2) कृषक सेवा संस्था, (3) आदिवासी सहकारी संस्था, (4) धान्य पेढ्या आणि (5) प्राथमिक भूविकास बँका. या पैकी कोल्हापूर जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था असून काही थोड्या धान्य पेढ्या आहेत; इतर प्रकारच्या संस्था अस्तित्वात नाहीत.

3.2.2. जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांची तालुकानिहाय माहिती तक्ता 5 मध्ये दिली आहे. एकंदरीत पाहता, जिल्ह्यातील गावांच्या संख्येपेक्षा प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची संख्या जास्त असल्यामुळे या संस्थांची प्रतिगाव घनता 1.27 येते. याचा अर्थ, निदान काही गावांमध्ये तरी प्राथमिक कृषी संस्थांची संख्या एकापेक्षा अधिक आहे. गडहिंग्लज, आजरा, चंदगड आणि शाहूवाडी तालुक्यांत मात्र ही घनता एकपेक्षा कमी आहे. याउलट, करवीर, पन्हाळा, हातकणगले, शिरोळ, कागल, भुदरगड, राधानगरी व गगनबावडा या आठ तालुक्यात ही घनता एकपेक्षा जास्त आहे. याठिकाणी विशेष नजरेत भरतो तो शिरोळ तालुका. इथे संस्थांची घनता सर्वाधिक (2.58) आहे, याचा अर्थ तालुक्यातील गावांत प्रत्येकी सरासरीने दोन ते तीन संस्था आहेत. त्या पाठोपाठ क्रमांक लागतो हातकणगले, करवीर आणि कागल तालुक्यांचा. या संदर्भात विशेष ध्यानात घेण्याजोगी बाब म्हणजे, जिल्ह्याच्या पश्चिमेकडील सह्याद्रीच्या रांगांमध्ये वसलेल्या भुदरगड, राधानगरी आणि गगनबावडा या तालुक्यांनी बऱ्याच प्रमाणात व्यापारी बँक शाखांची कमतरता प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची स्थापना करून भरून काढली आहे. या तिन्ही तालुक्यांची संस्था घनता एकपेक्षा अधिक आहे. याच डोंगरी टापूतील शाहूवाडी, आजरा आणि चंदगड तालुके मात्र याबाबतीत मागे राहिले आहेत; त्यांची संस्था घनता एकपेक्षा बरीच कमी आहे. शिरोळ, हातकणगले, करवीर आणि कागल हे जिल्ह्याच्या पूर्वेकडील पठारी प्रदेशातील तालुके मात्र प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन करण्यात बरेच सक्रिय राहिले. त्याचे एक कारण असे की, हे तालुके शेती उत्पादनाच्या बाबतीत सधन आहेत. पन्हाळा

**तक्ता क्र. 5**

**कोल्हापूर जिल्ह्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था**

**(31 मार्च, 2001)**

| तालुका | प्राथमिक संस्थांची संख्या | गावांची संख्या (1991) | प्राथ. संस्थांची प्रतिगाव घनता | ग्रामीण लोकसंख्या (1991) | प्रति प्राथ.संस्था लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1. करवीर | 229 (1) | 128 | 1.79 | 3,19,888 | 1,397 |
| 2.पन्हाळा | 200 | 130 | 1.54 | 2,03,904 | 1,020 |
| 3. हातकणगले | 119 | 60 | 1.98 | 3,21,275 | 2,700 |
| 4. शिरोळ | 137 | 53 | 2.58 | 2,53,404 | 1,850 |
| 5. कागल | 145 (6) | 86 | 1.69 | 1,84,951 | 1,276 |
| 6.गडहिंग्लज | 89 | 95 | 0.94 | 1,75,214 | 1,969 |
| 7.चंदगड | 110 (1) | 145 | 0.76 | 1,59,740 | 1,452 |
| 8.आजरा | 68 | 96 | 0.71 | 1,06,425 | 1,565 |
| 9. भुदरगड | 135 (5) | 108 | 1.25 | 1,27,545 | 945 |
| 10. राधानगरी | 163 (2) | 121 | 1.35 | 1,69,039 | 1,037 |
| 11.गगनबावडा | 40 | 39 | 1.03 | 27,781 | 695 |
| 12.शाहूवाडी | 89 (1) | 142 | 0.63 | 1,53,339 | 1,723 |
| एकूण | 1,524 (16) | 1,203 | 1.27 | 22,02,505 | 1,445 |

टीप : (1) कंसातील आकडे धान्य पेढ्यांची संख्या दर्शवितात

(2) प्राथमिक संस्थांची प्रतिगाव घनता = $\frac{\text{प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांची संख्या}}{\text{तालुक्यातील गावांची संख्या}}$

स्रोत : पुढील स्रोतांमधून संकलित केलेल्या माहितीच्या आधारे

(1) Office of the District Deputy Registrar (Cooperatives), Kolhapur District, Appendix "A" VA 24 , 31 March 2001

(2) Director of Census operations, Maharashtra, Census of India, 1991 series 14-Maharashtra, Part XII - A & B, District Census Handbook, Village & Town Direcory, Village and Townwise Primary Census Abstract, June 11, 1992

तालुका डोंगरी भागात असला तरी त्याने पूर्वेकडील तालुक्यांचा कित्ता गिरविण्याची जागरूकता दाखविली आहे.

प्रतिगाव संस्थात्मक घनतेच्या संकल्पनेचा संदर्भ घेऊन आतापर्यंत विश्लेषण केले आहे. या अनुषंगाने एका गोष्टीचे भान ठेवले पाहिजे. मापन केलेली घनता सरासरी असल्याने वास्तवात प्रत्येक गावात एक संस्था असे चित्र असेलच असे नाही. अगदी लहान गावात एकही संस्था असणार नाही. तथापि, त्यागावाची सांगड जवळच्याच गावातील संस्थेशी घातली असण्याची ही शक्यता आहे. वास्तव एखाद्या गावसमूहासाठी एक संस्था असू शकेल. त्यामुळे एक गाव, एक संस्था असे एकासएक समीकरण साधणार नाही. दुसरे, काही गावांत एकाहून अधिक संस्था आहेत. हे सारे विचारात घेतल्यास, एक निष्कर्ष स्पष्टपणे मांडता येईल तो म्हणजे, कोल्हापूर जिल्हयात प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थाचे जाळे ग्रामीण भागात व्यापक रीतीने पसरलेले असून त्यामुळे बँकशाखांच्या गैरहजेरीमुळे निर्माण झालेली संस्थात्मक पोकळी मोठ्या प्रमाणात भरून काढण्याचे कार्य त्यानी केलेले आहे.

3.2.3 प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था जिल्हयात सर्वदूर पसरलेल्या आहेत. याची नोंद घेत असतानाच या संस्था सरासरीने किती लोकसंख्येला सेवा पुरविताहेत याचा मागोवा घेणे उचित ठरेल. कारण, त्यावरून या संस्थांच्या जीवनक्षमतेबद्दल नेमका निष्कर्ष मांडता येईल. तक्ता 5 मधील तपशील पाहिल्यास जिल्हयाची सरासरी प्रतिसंस्था 1,445 लोकसंख्या अशी येते. या जिल्हा सरासरीच्या वर असणारे तालुके उतरत्या क्रमाने हातकणगले, गडहिंग्लज, शिरोळ, शाहूवाडी, आजरा आणि चंदगड हे आहेत. करवीर, कागल, राधानगरी, पन्हाळा, भुदरगड आणि गगनबावडा हे तालुके जिल्हा सरासरीच्या खाली आहेत. पतपुरवठा संस्था जेवढ्या जास्त लोकसंख्येसाठी कार्य करील तेवढी तिची जीवनक्षमतेची संभाव्यता अधिक. याच अनुषंगाने हेही स्पष्ट आहे की, एखाद्या गावात एकापेक्षा अधिक पतपुरवठा संस्था असतील तर सर्वच संस्था जीवनक्षमतेपासून दूर राहण्याचीच शक्यता जास्त राहील. लहान गावातील एकच संस्थादेखील पुरेशा आर्थिक उलाढालीच्या अभावी अजीवनक्षम (non-Viable)राहू शकते. महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याच्या निकषाप्रमाणे जी कृषी पतपुरवठा संस्था वर्षभरात किमान 10 लाख रुपयांचा अल्पकालीन कृषी पतपुरवठा व्यवसाय करते ती संस्था जीवनक्षम (Viable) आहे असे समजले जाते. हा निकष लावला असता, 31 मार्च, 2001 रोजी जिल्हयातील फक्त 40 टक्के संस्था जीवनक्षम आहेत असे सहकार खात्यातील नोंदींवरुन स्पष्ट होते. महत्त्वाचे म्हणजे, संबंधित अहवालामध्ये उर्वरित 60 टक्के संस्थांची नोंद 'संभाव्यत: जीवनक्षम' (Potentially Viable) अशी केलेली आहे ! त्याना अकार्यक्षम म्हणण्याचा हा सन्माननीय प्रकार म्हणावा लागेल . शेवटी एक मुद्दा असा की, जिल्हयातील कोणत्याही प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थेला कोणत्याही व्यापारी बँकेने दत्तक घेतले नाही आणि/ किंवा आर्थिक मदत दिलेली नाही. त्यामुळे या संस्था आणि व्यापारी बँका यांच्यामध्ये काहीही अनुबंधन नाही तसेच सहयोग होण्याची शक्यताही आढळत नाही. दोन्ही प्रवर्गातील वित्तीय संस्था आपली मार्गक्रमणा अलिप्तपणेच करताहेत.

### 3.3 प्राथमिक बिगर-कृषी सहकारी पतपुरवठा संस्था

3.3.1 या उपविभागात पुढील संस्थांचा समावेश होतो :(1) नोकरदारांच्या सहकारी पतपुरवठा संस्था

तक्ता क्र. 6

**कोल्हापूर जिल्हयातील प्राथमिक बिगर-कृषी सहकारी पतपुरवठा संस्था (31 मार्च, 2001)**

| तालुका/ शहर | नोकरदारांच्या पतपुरवठा संस्था | इतर बिगर-कृषी पतपुरवठा संस्था | | एकूण (2+3+4) | ग्रामीण संस्थांची प्रतिगाव घनता |
|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण | नागरी | | |
| 1. करवीर | 17 | 242 | - | 259 | 1.89 |
| 2.पन्हाळा | 15 | 172 | 3 | 190 | 1.32 |
| 3. हातकणगले | 45 | 247 | 194 | 486 | 4.12 |
| 4. शिरोळ | 20 | 165 | - | 185 | 3.11 |
| 5. कागल | 17 | 157 | 39 | 213 | 1.83 |
| 6.गडहिंग्लज | 14 | 125 | 32 | 171 | 1.14 |
| 7.चंदगड | 14 | 87 | - | 101 | 0.60 |
| 8.आजरा | 13 | 148 | - | 161 | 1.54 |
| 9. भुदरगड | 19 | 134 | - | 153 | 1.24 |
| 10. राधानगरी | 6 | 159 | - | 165 | 1.31 |
| 11.गगनबावडा | 1 | 8 | - | 9 | 0.21 |
| 12.शाहूवाडी | 7 | 73 | 6 | 86 | 0.51 |
| 13. कोल्हापूरशहर | 112 | - | 316 | 428 | - |
| एकूण | 300 | 1,717 | 590 | 2,607 | 1.43 |

स्रोत : तक्ता 5 प्रमाणे

आणि (2) इतर ग्रामीण व नागरी सहकारी पतपुरवठा संस्था, ज्या नागरी सहकारी पतपुरवठा संस्था, आणि ग्रामीण बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्था अशा नावाने कार्यरत असतात. कोल्हापूर जिल्हयातील त्यांची तालुकावार स्थिती तक्ता 6 मध्ये दर्शविली आहे.

3.3.2 जिल्हयातील एकंदर 2,607 बिगर-कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांपैकी 1,717 संस्था (65.86 टक्के) ग्रामीण भागात आहेत. त्यामुळे त्यांच्यावरच लक्ष केन्द्रित करावयाचे आहे. ग्रामीण पतपुरवठा करणाऱ्या एकूण संस्थांचा तो एक घटक आहे; बहुसंस्थात्मक दृष्टिकोनातून निर्माण झालेल्या

संरचनेचा तो एक घटक आहे. या संस्था कमीअधिक संख्येने सर्वच तालुक्यांत आढळतात. त्या ग्रामीण जनतेच्या बिगर-कृषी कर्जाच्या गरजा भागवितात आणि त्यायोगे बँकांकडून केल्या जाणाऱ्या ग्रामीण वित्तपुरवठ्याला पूरक प्रयत्न म्हणून कार्य करतात. तक्ता 6 मधील माहितीनुसार जिल्ह्यातील एकंदर 1,717 ग्रामीण बिगर-कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांपैकी 936 संस्था (54.51 टक्के) करवीर, हातकणगले, शिरोळ, कागल आणि गडहिंग्लज या पाच तालुक्यांमध्ये केन्द्रित झाल्या आहेत. हे तालुके जिल्ह्याच्या पूर्वेकडील पठारी प्रदेशात आहेत. उर्वरित 781 संस्था (45.49 टक्के) जिल्ह्याच्या पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेशात आहेत; यात सात तालुके येतात. गगनबावडा, शाहूवाडी आणि चंदगड तालुक्यांत या संस्थांचा पसारा बराच कमी आहे तर हातकणगले आणि करवीर तालुक्यांत त्यांची रेलचेल

**तक्ता क्र. 7**

**कोल्हापूर जिल्ह्याच्या ग्रामीण क्षेत्रात कार्यरत असलेल्या बिगर-कृषी सहकारी पतपुरवठा संस्था (31 मार्च, 1999)**

| तालुका/ शहर | कार्यरत संस्था (संख्या) | व्यापलेल्या गावांची संख्या | तालक्यातील गावांची संख्या | रकाना 3 ची रकाना 4 शी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1. करवीर | 210 | 100 | 128 | 78.13 |
| 2.पन्हाळा | 126 | 69 | 130 | 53.08 |
| 3. हातकणगले | 127 | 45 | 60 | 75.00 |
| 4. शिरोळ | 89 | 44 | 53 | 83.02 |
| 5. कागल | 146 | 72 | 86 | 83.72 |
| 6.गडहिंग्लज | 118 | 63 | 95 | 66.32 |
| 7.चंदगड | 89 | 49 | 145 | 33.79 |
| 8.आजरा | 113 | 70 | 96 | 72.92 |
| 9. भुदरगड | 91 | 55 | 108 | 50.93 |
| 10. राधानगरी | 137 | 60 | 121 | 49.59 |
| 11.गगनबावडा | 7 | 6 | 39 | 15.38 |
| 12.शाहूवाडी | 63 | 46 | 142 | 32.39 |
| एकूण | 1,315 | 679 | 1,203 | 56.44 |

स्रोत : कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी पतपुरवठा संस्थांचा संघ, मर्यादित, कोल्हापूर यांच्या कार्यालयातील माहितीच्या आधारे तक्ता तयार केला आहे.

आहे.

3.3.3 ग्रामीण संस्थांची प्रतिगाव घनता हातकणगले तालुक्यात सर्वाधिक (4.12) आहे. त्यापाठोपाठ शिरोळा तालुका (3.11) येतो. यावरून या दोन तालुक्यांमध्ये सरासरीने प्रत्येक गावात 3 ते 4 ग्रामीण बिगर-शेती पतपुरवठा संस्था परस्परांशी स्पर्धा करताहेत. याखेरीज ज्या सात तालुक्यांची घनता एकहून अधिक आहे तिथे सरासरीने 1 किंवा 2 संस्था आहेत. गगनबावडा, शाहूवाडी आणि चंदगड या डोंगराळ प्रदेशातील तालुक्यांची स्थिती फारशी आशादायक नाही; त्यांची प्रतिगाव संस्थाघनता एकहून बरीच कमी आहे. यांचा अर्थ, या तालुक्यांत ग्रामीण संस्था काही मोजक्याच गावांतून कार्य करतात

3.3.4 ग्रामीण बिगर-कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे प्रत्येक तालुक्यातील अपस्करण (dispersion) अभ्यासण्यासाठी 31 मार्च, 1999 ची उपलब्ध माहिती वापरली आहे. त्यातून वास्तवाचे दिग्दर्शन होऊ शकते. त्याच्या पुढील वर्षात त्यामध्ये लक्षणीय फरक पडण्याची शक्यता कमीच. या सखोल अभ्यासात नागरी आणि अर्ध-नागरी क्षेत्रातील ग्रामीण संस्था वगळलेल्या आहेत. त्यानंतरचे केवल ग्रामीण क्षेत्राचे चित्र तक्ता 7 मध्ये स्पष्ट केले आहे. तक्ता 7 नुसार मार्च, 1999 अखेर कोल्हापूर जिल्ह्यात प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या 1,315 ग्रामीण बिगर-शेती पतपुरवठा संस्था जिल्ह्यातील 1,203 गावांपैकी फक्त 679 गावांमध्येच (56.44 टक्के) होत्या. यासंदर्भातही आपल्याला पूर्वेकडील पठारी प्रदेशातील सधन तालुके आणि पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेशातील आर्थिक दृष्ट्या मागासलेले तालुके अशी सरळसरळ विभागणी आढळते. पूर्वेकडील कागल, शिरोळ, करवीर, हातकणगले आणि गडहिंग्लज यापैकी पहिल्या चार तालुक्यांमधील 75 ते 84 टक्के गावे आणि गडहिंग्लज तालुक्यातील 66 टक्के गावे या संस्थांनी व्यापली आहेत. अशा तऱ्हेचे संपादन डोंगराळ प्रदेशातील. फक्त आजरा तालुक्याचेच (72.92 टक्के) आढळते; इतर तालुक्यांची स्थिती त्याच्या बरीच खाली आहे. आता आपण 65 टक्क्यांपेक्षा जास्त गावे व्यापलेल्या पठारी प्रदेशातील 5 तालुके आणि डोंगराळ प्रदेशातील आजरा तालुका अशा एकूण 6 तालुक्यांचा मागोवा घेतला तर एक अटकळ बांधता येईल. प्रत्येक सहकारी संस्था आपली निर्वाहक्षमतेची पातळी गाठण्यासाठी आपल्या व्यवहाराचे क्षेत्र एकाच गावापुरते सीमित न करता जवळच्या गावांनाही व्यापण्याचा प्रयत्न करते असे मानल्यास, संदर्भातील या 6 तालुक्यांमध्ये ग्रामीण बिगर-शेती पतसंस्थांनी प्रत्यक्षात बव्हंशी खेडी व्यापली असण्याची शक्यता आहे. अपवादात्मक कारणास्तव काही थोडी गावे राहू शकतील. यावरून या तालुक्यांमध्ये संस्थांचे अपस्करण बरेचसे समाधानकारक आहे असे म्हणता येईल. अशा तऱ्हेचा निष्कर्ष डोंगराळ प्रदेशातील आणि उर्वरित 6 तालुक्यांच्या बाबतीत (पन्हाळा, भुदरगड, राधानगरी, शाहवाडी, चंदगड आणि गगनबावडा) काढता येत नाही. कारण, या तालुक्यांनी प्रत्यक्षात व्यापलेल्या गावांची टक्केवारी 15 ते 53 या दरम्यान दाखविली आहे. असे घडण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे, संभवत: डोंगराळ प्रदेशामुळे पतपुरवठा संस्थांना परिसरातील गावे व्यापण्यात काही नैसर्गिक अडचणी असतील. त्याचप्रमाणे, संस्था जीवनक्षम न होण्याचा धोका जाणवल्यामुळे अनेक गावांमध्ये अशा संस्था स्थापन करण्याचा प्रयत्नच झाला नसावा.

3.3.5 तक्ता 7 च्या अवलोकनातून आणखी एका पैलूवर प्रकाश टाकता येईल. प्रत्येक तालुक्यामध्ये कार्यरत असलेल्या प्राथमिक बिगर-शेती सहकारी पतपुरवठा संस्थांची संख्या व्याप्त गावांच्या संख्येपेक्षा

**तक्ता क्र. 8**

**बिगर-कृषी पतपुरवठा संस्थांच्या संख्येनुसार 679 गावांचे वारंवारता वितरण (Frequency distribution)**

| तालुका/शहर | एका गावातील पतपुरवठा संस्थांची संख्या / गावांची संख्या | | | | | | | | | | | एकूण गावे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | |
| 1. करवीर | 48 | 22 | 15 | 8 | 3 | 2 | 2 | - | - | - | - | 100 |
| 2.पन्हाळा | 33 | 25 | 4 | 3 | 3 | 1 | - | - | - | - | - | 69 |
| 3. हातकणगले | 11 | 10 | 9 | 10 | 4 | - | - | - | - | - | 1 | 45 |
| 4. शिरोळ | 15 | 18 | 7 | 3 | 1 | - | - | - | - | - | - | 44 |
| 5. कागल | 30 | 25 | 9 | 2 | 5 | - | 1 | - | - | - | - | 72 |
| 6.गडहिंग्लज | 31 | 23 | 5 | - | 1 | 1 | 1 | 1 | - | - | - | 63 |
| 7.चंदगड | 31 | 10 | 2 | 3 | 1 | 1 | - | - | 1 | - | - | 49 |
| 8.आजरा | 45 | 16 | 7 | 1 | - | - | - | - | - | - | 1 | 70 |
| 9. भुदरगड | 33 | 13 | 6 | 2 | - | 1 | - | - | - | - | - | 55 |
| 10. राधानगरी | 24 | 15 | 9 | 7 | 3 | 1 | 1 | - | - | - | - | 60 |
| 11.गगनबावडा | 5 | 1 | - | - | - | - | - | - | - | - | - | 6 |
| 12.शाहूवाडी | 36 | 5 | 3 | 2 | - | - | - | - | - | - | - | 46 |
| एकूण | 342 | 183 | 76 | 41 | 21 | 7 | 5 | 1 | 1 | - | 2 | 679 |
| 679 गावांशी टक्केवारी | 50.37 | 26.95 | 11.19 | 6.04 | 3.09 | 1.03 | 0.74 | 0.15 | 0.15 | - | 0.29 | 100.00 |

स्रोत : तक्ता 7 प्रमाणे

बरीच अधिक आहे. साहजिकच, काही गावांमध्ये तरी अशा संस्थांची संख्या एकापेक्षा अधिक आहे. या संख्यांचा मागोवा घ्यावयाचा आहे. त्याकरिता विचाराधीन 679 संस्थांचे संख्यानिहाय वारंवारता वितरण तक्ता 8 मध्ये दाखविले आहे.

सामान्यत: एक गाव अथवा एक गावसमूह आणि आणि एक गावसमूह आणि एक संस्था अशी स्थिती राखल्यास ती संस्था जीवनक्षम बनणे शक्य असते. ही अपेक्षा जिल्ह्यातील 679 गावांपैकी 50 टक्के गावांनी पूर्ण केली आहे. उर्वरित 50 टक्के गावांमध्ये 2 किंवा त्याहून अधिक संस्था कार्यरत आहेत. एक-चतुर्थांशपेक्षा थोड्या अधिक गावांमध्ये

2 संस्था आहेत. एक आणि दोन संस्था कार्यरत असणाऱ्या गावांची एकूण टक्केवारी 76 पर्यंत पोचते. बाकी राहिलेल्या गावांपैकी 20 टक्केवारी बिंदू गावांमध्ये 3 ते 5 संस्था कार्यरत आहेत. जिल्हयातील 16 गावांनी 6 ते 11 संस्था राबविण्याचा विक्रम केलेला आहे ! या संस्थांच्या आर्थिक भवितव्याबद्दल कुणालाही काळजीच वाटेल.

3.3.6. मोठ्या संख्येने एकाच गावात कार्यरत असणाऱ्या या ग्रामीण बिगर-शेती पतपुरवठा संस्थांच्या आर्थिक शाश्वततेची (Economic Sustainability) शक्यता विक्रमी संख्या असणाऱ्या उपरोल्लेखित 16 गावांच्या लोकसंख्येच्या संदर्भात तपासून घेता येईल. तक्ता 9 मध्ये आवश्यक तो तपशील दिला आहे. तो पाहिल्यास, संबंधित गावाची लोकसंख्या गावात स्थापन झालेल्या सर्वच संस्थांना जीवनक्षम बनण्याइतका बिगर-शेती क्षेत्रातील

**तक्ता क्र.9**

**जास्त संख्येने असणाऱ्या बिगर-कृषी सहकारी पतपुरवठा संस्था असलेल्या गावांची लोकसंख्या**

| तालुका | गाव | संस्थांची संख्या | लोकसंख्या (1991) |
|---|---|---|---|
| 1. करवीर | (1) शिरोली दुमाला | 7 | 3,997 |
| | (2) प्रयाग चिखली | 6 | 4,501 |
| | (3) गोकुळ शिरगांव | 6 | 3,154 |
| | (4) वडगणे | 7 | 10,740 |
| 2.पन्हाळा | (1) यवलुज | 6 | 4,787 |
| 3. हातकणगले | (1) रेंदाळ | 11 | 12,239 |
| 4. कागल | (1) कसबा सांगाव | 7 | 8,132 |
| 5. गडहिंग्लज | (1) भडगांव | 7 | 7,274 |
| | (2) हलकर्णी | 8 | 5,572 |
| | (3) नेसरी | 6 | 5,705 |
| 6. चंदगड | (1) माणगांव | 6 | 3,774 |
| | (2) चंदगड | 9 | 7,819 |
| 7.आजरा | (1) उत्तूर | 11 | 6,656 |
| 8.भुदरगड | (1) पुष्पनगर | 6 | 2,500 |
| 9. राधानगरी | (1) राशिवडे बुद्रुक | 7 | 8,151 |
| | (2) कौलव | 6 | 3,445 |

तक्ता क्र. 10

**कोल्हापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात कार्यरत असणाऱ्या विविध वित्तसंस्थांचे तालुकानिहाय अपस्करण**

| तालुका | व्यापारी बँकांच्या शाखा (31/3/2000) | | जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखा (31/3/2000) | नागरी सहकारी बँकांच्या शाखा (31/3/2000) | महा. राज्य कृषी व ग्रामीण विकास बँक शाखा (31/3/2000) | सहकारी पतपुरवठा संस्था | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सरकारी | खाजगी | | | | नोकर दारांच्या (31/3/2001) | कृषी (31/3/2001) | बिगर-कृषी (31/3/1999) |
| 1. करवीर | 8 | 6 | 24 | 12 | - | 17 | 229 | 210 |
| 2.पन्हाळा | 6 | 4 | 13 | 9 | 1 | 15 | 200 | 126 |
| 3. हातकणगले | 4 | 10 | 10 | 12 | - | 45 | 119 | 127 |
| 4. शिरोळ | 3 | 10 | 10 | 18 | - | 20 | 137 | 89 |
| 5. कागल | 8 | - | 14 | 12 | 1 | 17 | 145 | 146 |
| 6.गडहिंग्लज | 4 | 2 | 11 | 10 | - | 14 | 89 | 118 |
| 7.चंदगड | 8 | - | 13 | 5 | 1 | 14 | 110 | 89 |
| 8.आजरा | 3 | 2 | 9 | 2 | - | 13 | 68 | 113 |
| 9. भुदरगड | 5 | - | 13 | - | - | 19 | 135 | 91 |
| 10. राधानगरी | 8 | 1 | 15 | 8 | 1 | 6 | 163 | 137 |
| 11.गगनबावडा | 2 | - | 6 | 1 | 1 | 1 | 40 | 7 |
| 12.शाहूवाडी | 8 | - | 11 | 9 | 1 | 7 | 89 | 63 |
| एकूण | 67 | 35 | 149 | 98 | 6 | 300 | 1,524 | 1,315 |

व्यवसाय कसा काय उपलब्ध करून देणार याविषयी संदेह निर्माण होतो. त्यांच्या परिसरातील दोनचार खेडी त्या त्या गावांच्या साखळीत बांधली गेली असण्याची शक्यता जरी पुढे केली गेली तरीही या सर्व संस्थांना आवश्यक तेवढा व्यवसाय करता येईल असे मानणे धाडसाचे होईल. परिणामी, यातील काही संस्था तरी अजीवनक्षम बनण्याचाच संभव जास्त.

### 4 एक दृष्टिक्षेपात बहुसंस्थात्मक चित्र

4.1 आतापर्यन्त प्राथमिक सहकारी संस्था, नागरी सहकारी बँका यांचा स्वतंत्रपणे विचार केला. यापूर्वीच्या एका लेखात 2 व्यापारी बँका आणि

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांचा वेगळा ऊहापोह केला. आता या सर्वांना एकत्रित आणून ग्रामीण अर्थपुरवठा करणाऱ्या ग्रामीण भागातील सर्व वित्तसंस्थांचे एकत्रित चित्र कसे दिसते ते पाहावयाचे आहे. तक्ता 10 मध्ये त्याची मांडणी केली आहे. आपल्या विश्लेषणाचा भर ग्रामीण वित्तपुरवठ्याच्या संस्थात्मक उपलब्धतेवर असल्यामुळे या मांडणीत नागरी आणि अर्ध-नागरी गावांना वगळले आहे.

4.2 कोल्हापूर जिल्हयाच्या ग्रामीण क्षेत्रात व्यापारी बँकांच्या (सरकारी व खाजगी एकत्रित) एकूण 102 शाखा आहेत. यातही ध्यानात घेण्याजोगी बाब म्हणजे, सरकारी बँकांच्या शाखा सर्वच तालुक्यांत एक अंकी आहेत, आणि त्या 2 ते 8 या दरम्यानच आहेत. खाजगी क्षेत्रातील बँका प्रामुख्याने हातकणगले आणि शिरोळ तालुक्यांत केन्द्रित झाल्या आहेत; त्यापाठोपाठ करवीर आणि पन्हाळा हे तालुके येतात. स्थाननिहाय परिस्थिती बघितल्यास, असे ध्यानात येते की, सरकारी तसेच खाजगी व्यापारी बँकांनी जिल्हयातील पूर्वेच्या सधन प्रदेशावरच आपले लक्ष केन्द्रित केलेले आहे. इतर सर्व प्रवर्गातील संस्थांच्या बाबतीतही सामान्यत: हाच अनुभव आहे. या संदर्भात थोडेसे खोलवर जाण्यासाठी प्रथम विविध बँकांचे बाबतीत बहुसंस्थात्मक वास्तव कसे आहे त्याचे दिग्दर्शन तक्ता 11 मध्ये केले आहे.

4.3 तक्ता 11 दोन भागात विभागला आहे. पहिल्या भागात कोणत्या तरी बँकची केवळ एकमेव शाखा असेल अशा गावांचे वारंवारता वितरण दिलेले आहे. दुसऱ्या भागात एकापेक्षा अधिक बँकांच्या शाखा असलेल्या गावांचे वारंवारता वितरण दिलेले आहे. तक्त्यावरील माहितीवरुन स्पष्ट होते की, सरकारी व खाजगी क्षेत्रातील व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँक आणि नागरी सहकारी बँका यांच्या ग्रामीण शाखा असलेल्या एकंदर 210 गावांपैकी 129 गावांमध्ये (61.14 टक्के) यापैकी कोणत्या तरी एकाच बँकेची शाखा आहे. दुसऱ्या शब्दांत, ती एक शाखा गावे आहेत. या 129 गावांमध्ये अपवादात्मक म्हणून टोप (तालुका हातकणगले) या गावाचा समावेश केलेला आहे; इथे खाजगी क्षेत्रातील दोन बँकांच्या शाखा आहेत. हे एक गाव वगळता इतर 128 गावांमध्ये केवळ एकच बँकशाखा आहे. ग्रामीण बँकविस्ताराच्या दृष्टीकोनातून अशी स्थिती आदर्श म्हणून मानावयाला हवी; कारण, यामध्ये बँकाबँकांमधील स्पर्धा टळते आणि कार्यरत एकाच बँकेला किफायतशीर व्यवहार करता येतो. एवढ्याचसाठी आता भविष्यकाळात कोणत्याही बँकेने या गावांमध्ये आपल्या शाखा उघडू नयेत. हे पथ्य कटाक्षाने पाळावयाला हवे. तरच ग्रामीण शाखा तोट्याच्या स्थितीपासून दूर राहू शकतील. ज्या बँकांना ग्रामीण भागात शाखाविस्तार करावयाचा असेल त्यानी प्राधान्याने बँकविरहित गावांवरच लक्ष केन्द्रित करावे. अग्रणी बँकेनेसुद्धा याबाबतीत जागरुक राहून बँकांना योग्य तो सल्ला दिला पाहिजे. असा विवेकी दृष्टिकोन स्वीकारल्यासच पुढील वर्षामध्ये ग्रामीण शाखाविस्ताराचे कार्य सुकर होईल.

तक्ता 11 चा दुसरा भाग (रकाने 6 ते 14) ज्या गावांत एकापेक्षा अधिक बँकांच्या शाखा आहेत त्याबद्दलचे तालुकानिहाय आणि बँक मिश्रणनिहाय वितरण दाखवितो. वास्तवातील बँक मिश्रणाचे एकूण 9 गट आढळतात. एकंदर 210 गावांपैकी 82 गावांमध्ये (38.87 टक्के) बहुशाखा कार्यरत आहेत. बहुशाखांच्या मिश्रणामध्ये राष्ट्रीयीकृत बँका व जिल्हा मध्यवर्ती बँक (21) आणि राष्ट्रीयीकृत बँका, जिल्हामध्यवर्ती बँक व नागरी सहकारी बँका (20) या दोन गटांनी मिळून 82 गावांपैकी 50 टक्के गावे व्यापलेली आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, काही

**तक्ता क्र. 11**

**कोल्हापूर जिल्हयातील खेडेगावांतील विविध प्रवर्गातील बँक शाखांचे अपस्करण (dispersion): तालुकानिहाय**

| तालुका/ गावांची संख्या | एकमेव बँकशाखा असलेल्या गावांची संख्या | | | | एकापेक्षा अधिक बँक शाखा असलेल्या गावांची संख्या | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | फक्त राष्ट्रीयीकृत बँक | फक्त खाजगी बँक | फक्त जिल्हा मध्यवर्ती बँक | फक्त नागरी सहकारी बँक | जिल्हा मध्य.बँक + नागरी सह. बँक | खाजगी +नागरी सह.बँक | राष्ट्रीय बँक + नागरी सह.बँक | राष्ट्रीय + जिल्हा मध्य.बँक | खाजगी + जिल्हा मध्य. बँक | राष्ट्री. + जिल्हा मध्य. बँक +नागरी सह. बँक | खाजगी +जिल्हा मध्य. बँक + नागरी सह. बँक | राष्ट्री.+जिल्हा मध्य.+नागरी सह+ राज्य कृषी व ग्रामीण विकास बँक | राष्ट्रीय + जिल्हामध्य + राज्य कृषी व ग्रामीण विकास बँक |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1. करवीर (32) | 3 | - | 14 | 2 | 2 | 2 | 1 | 3 | 3 | 1 | 1 | - | - |
| 2. पन्हाळा (18) | 4 | 1 | 6 | - | 2 | - | - | - | 2 | 1 | 1 | 1 | - |
| 3. हातकणगले (25) | 3 | 5 | 5 | 5 | 2 | 2 | - | - | 1 | 1 | 1 | - | - |
| 4. शिरोळ (24) | - | 4 | 5 | 5 | 2 | 4 | 1 | - | 1 | 2 | - | - | - |
| 5. कागल (18) | 2 | - | 6 | 2 | 2 | - | - | 2 | - | 3 | - | 1 | - |
| 6. गडहिंग्लज (15) | - | 1 | 5 | 3 | 1 | - | - | 1 | - | 3 | 1 | - | - |

| तालुका/ शहर | एकमेव बँकशाखा असलेल्या गावांची संख्या | | | | एकापेक्षा अधिक बँक शाखा असलेल्या गावांची संख्या | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | फक्त राष्ट्रीयीकृत बँक | फक्त खाजगी बँक | फक्त जिल्हा मध्यवर्ती बँक | फक्त नागरी सहकारी बँक | जिल्हा मध्य.बँक + नागरी सह. बँक | खाजगी +नागरी सह.बँक | राष्ट्रीय बँक + नागरी सह.बँक | राष्ट्रीय + जिल्हा मध्य.बँक | खाजगी + जिल्हा मध्य. बँक | राष्ट्री. + जिल्हा मध्य. बँक +नागरी सह. बँक | खाजगी +जिल्हा मध्य. बँ क + नागरी सह. बँक | राष्ट्री.+जिल्हा मध्य.+नागरी सह+ राज्य कृषी व ग्रामीण विकास बँक | राष्ट्रीय +जिल्हामध्य + राज्य कृषी व ग्रामीण विकास बँक |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 7.चंदगड (16) | 1 | - | 6 | 2 | - | - | - | 4 | - | 2 | - | - | 1 |
| 8.आजरा (10) | 1 | - | 5 | - | - | - | - | 1 | 2 | 1 | - | - | - |
| 9. भुदरगड (15) | 2 | - | 10 | - | - | - | - | 3 | - | - | - | - | - |
| 10. राधानगरी (17) | 1 | 1 | 7 | - | 1 | - | - | 3 | - | 3 | - | 1 | - |
| 11.गगनबावडा (6) | - | - | 4 | - | - | - | - | 1 | - | - | - | 1 | - |
| 12.शाहूवाडी (14) | 2 | - | 5 | 1 | - | - | - | 2 | - | 3 | - | - | 1 |
| एकूण (210) | 19 | 12 | 78 | 20 | 12 | 8 | 2 | 20 | 9 | 20 | 4 | 4 | 2 |

टीप : या गावांची तपशीलवार यादी परिशिष्टात दिलेली आहे.

थोड्या गावांमध्ये नागरी सहकारी बँकांच्या 3 ते 4 शाखांबरोबरच जिल्हा मध्यवर्ती बँकेची शाखा तसेच राष्ट्रीयीकृत/खाजगी बँकेचीही शाखा त्या गावातील व्यवहारांच्या वाटेकरी झाल्या आहेत. एकंदरीत, जिथे एकाहून अधिक बँक शाखा अस्तित्वात आहेत त्याठिकाणी ग्रामीण वित्तपुरवठ्याच्या बहुसंस्थात्मक दृष्टिकोनाचे मुळात संकल्पित केलेले चित्र आढळत नाही. उपरोल्लेखित 82 गावांमध्ये उमटलेले चित्र हे निश्चितपणे त्या गावातील सर्वच बँक शाखांच्या दृष्टीने हानीकारक आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या साधारणत: 50 टक्के ग्रामीण शाखा तोट्यात चालताहेत हा याचा एक ढळढळीत पुरावा आहे. इतर बँकांच्या आर्थिक व्यवहारांचा शाखानिहाय तपशील खाजगी संशोधकांना कधीच उपलब्ध होउ शकत नाही. तरीदेखील, अनौपचारिकपणे उपलब्ध होत असलेल्या माहितीच्या आधारावर एवढे नक्की म्हणता येईल की, इतरही प्रवर्गातील व्यापारी बँकांचा अनुभव जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अनुभवापेक्षा फारसा वेगळा असण्याची शक्यता नाही. प्रत्येक शाखेनेच आपली खरीखुरी स्थिती काळजीपूर्वक तपासून पाहावी. यातून एकच सूचना करावीशी वाटते. यापुढील कालात कोणत्याही बँकेने या 82 गावात आपली शाखा स्थापन करू नये; त्यानी बँकविरहित गावांचा शोध घ्यावा.

4.4 बँकांनी बँकविरहित गावांमध्ये शाखाविस्तार करताना 'समूह दृष्टिकोन' (Cluster Apporach) स्वीकारणे हितकारक ठरेल. कोणत्याही बँकेने आपल्या ग्रामीण शाखा एकमेकींपासून फार दूरवरच्या प्रदेशात स्थापण्याऐवजी विशिष्ट प्रदेशावर लक्ष केन्द्रित करावे असा या दृष्टिकोनाचा अर्थ आहे. असे केल्याने बँकेच्या शाखाशाखांमध्ये व्यवस्थापन, वित्त, कर्मचारी आणि माहिती, इत्यादी बाबतीत सातत्याने परस्परांशी सहकार्य करीत राहू शकतील. परस्परांतील भौगोलिक अंतर थोडे असल्यामुळे शाखांना कार्यसुलभतेच्या अनुकूलतांचा लाभ होईल. भविष्यात त्याना माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांच्या माध्यमातून आंतरजाल प्रस्थापित करणे सुकर होईल. त्यातून शाखेच्या कामकाजाचा परिव्यय घटविणे शक्य होईल. याच्या जोडीलाच बँकेने आपल्या प्रत्येक शाखेमध्ये एकदोन स्थानिक कर्मचारी नेमण्याचे धोरण ठेवल्यास त्यांच्या स्थानिक परिस्थितीच्या ज्ञानाचा चांगला फायदा त्या बँक शाखेला मिळेल.

4.5 तक्ता 11 वरून आपल्याला जाणवेल की, सहकारी क्षेत्रातील कृषी आणि बिगर-कृषी पतपुरवठा संस्थांनीच व्यापकपणे ग्रामीण पतपुरवठ्याची जबाबदारी पत्करलेली आहे. बहुतेक सर्व गावांतून त्यांचे अस्तित्व जाणवते. सर्व प्रवर्गातील बँकशाखांच्या त्याच खऱ्या स्पर्धक होत. त्यामुळे जिल्ह्यातील बहुसंस्थात्मक चित्राचा एक आकृतिबंध म्हणजे बँक/बँका, कृषी पतपुरवठा सहकारी संस्था आणि बिगर-कृषी पतपुरवठा सहकारी संस्था यांचे साहचर्य. दुसऱ्या आकृतीबंधात केवळ कृषी आणि बिगर-कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचीच परस्परांतील स्पर्धा आहे. दुसरा आकृतिबंध पहिल्यापेक्षा खूप व्यापक आहे याची नोंद घेतल्यास त्या क्षेत्रात खऱ्या अर्थाने बहुसंस्थात्मक व्यवस्था अस्तित्वात आलेलीच नाही! या वास्तवाकडे सर्व संबंधितांचे दुर्लक्ष झालेले आहे !! पहिल्या आकृतीबंधात सहकारी पतपुरवठा संस्थांना बँक शाखांच्या स्पर्धेत काही विशेष अनुकूलता आहेत. या संस्था ठेवींवर थोडे जास्त व्याज देतात, कर्ज देण्यासाठी सोप्या पद्धती अवलंबितात, थकबाकीच्या वसुलीसाठी प्रसंगोपात दबावतंत्रांचा वापर करतात आणि त्यांच्यामध्ये स्थानिक लोकांचा बराच सहभाग असतो. दुसऱ्या बाजूने, सरकारी व खाजगी क्षेत्रातील बँकशाखांसाठी आता सेवा क्षेत्र पद्धतीचा अवलंब केला गेला आहे, त्यामुळे प्रत्येक शाखेचे कार्यक्षेत्र व्यापक बनले आहे. असे असूनही, आपल्या अनेक

ग्रामीण शाखा जीवनक्षम होत नसल्याची तक्रार बँक वर्तुळातून ऐकावयास मिळते.

4.6 वर उल्लेख केल्याप्रमाणे बँक शाखेच्या तुलनेत सहकारी पतपुरवठा संस्थेला काही बाबतीत अधिक अनुकूलता आहेत हे सत्य आहे. तथापि, प्रत्यक्षात कामकाजात मात्र त्यानी बऱ्याच बाबतीत आपला कमकुवतपणा उघडा करुन दाखविला आहे. सहकारी पतपुरवठा संस्था या बव्हंशी गावातील पुढारी मंडळींनी आणि राजकारण्यांनी आपले राजकीय हेतू साध्य करण्यासाठीच स्थापन केलेल्या आहेत. त्या संस्था या त्यांची राजकीय बलस्थाने आहेत. संस्थांचे सर्व कामकाज या अग्रणी मंडळींच्या इच्छेनुसार आणि कार्यपद्धतीनुसार चालत असल्याने बऱ्याचदा नियमावलीची पायमल्ली होत असते. विशिष्ट व्यक्तींनाच कर्जे दिली जातात, कर्जाच्या सुरक्षेविषयी फारशी फिकीर केली जात नाही, कर्जाची थकबाकी फुगत राहते, कर्जवसुलीसाठी असभ्यमार्ग अनेकदा अनुसरले जातात आणि पदाधिकाऱ्यांकडून निधीच्या वापरातील घोटाळे, अशा तऱ्हेच्या अनुभवांमळे या संस्थांची प्रतिमा मलिन झाली आहे. कोल्हापूर जिल्हयाच्या सहकार खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी परिपत्रकांद्वारे आणि जाहीरपणे सहकारी पतपुरवठा संस्थाच्या गैरकारभाराबद्दल ताशेरे ओढून त्याना अधिक स्वच्छ व पारदर्शक व्यवहार करण्याबद्दल समज दिलेली आहे. या संस्थांनी ठेवींचे संकलन वाढविण्यासाठी ठेवीं 14 ते 15 टक्क्यांपर्यंत व्याज देतात. ग्रामीण ठेवीदारांनी व्याजाच्या आमिषाने ठेवलेल्या अशा ठेवी गमावल्या आहेत. अशा तऱ्हेच्या कामकाजाचे झालेले काही गंभीर परिणाम असे : (1) जिल्हा सहकार न्यायालयात दाखल झालेली असंख्य प्रकरणे (2) तोटयात चालणाऱ्या संस्थांची वाढती संख्या आणि त्यातूनच काही संस्था अवसायानात निघणे. कोल्हापूर जिल्हयातील न्यायालयीन प्रकरणांची सर्वाधिक संख्या हातकणगले तालुक्याची आहे. या तालुक्यात कृषी आणि बिगर-कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची एकत्रित संख्या 250 आहे. शेती उत्पादनाच्या दृष्टीने तो सधन तालुका आहे.

4.7 या पतपुरवठा संस्थांमध्ये भाग भांडवलाच्या रूपाने महाराष्ट्र शासनाचा थोडाच पैसा गुंतलेला आहे. साधारणत: 10 ते 15 टक्के संस्थांनीच शासनाचा पैसा घेतलेला आहे. गतवर्षी केन्द्र सरकारने प्राथमिक पतपुरवठा संस्थांना आर्थिक दृष्ट्या प्रबळ बनविण्यासाठी रु. 6,000 कोटी बाजूला ठेवल्याचे जाहीर केले; त्याची कार्यपद्धती अजून ठरावयाची होती. आता भरीस भर म्हणून गावागावांतून स्व-सहायता गटांच्या स्थापनेला प्रोत्साहन दिले जाऊ लागले आहे. कोल्हापूर जिल्हयाने याबाबतीत अजून पुरेसा वेग घेतला नसला तरी त्यादृष्टीने खटपट चालू आहे. सहकारी संस्थांना अधिक कार्यदक्ष बनविण्यासाठी त्यांच्यावर प्रशासकीय अंकुश परिणामकारक रीतीने राखण्याची नितांत गरज आहे.

### संदर्भ टीपा

1. पाहा : दोशी, रवीन्द्र (2003), 'कोल्हापूर जिल्हयातील व्यापारी बँकांचा ग्रामीण क्षेत्रातील शाखाविस्तार', 'अर्थसंवाद', खंड 27, अंक 1, एप्रिल-जून, तक्ता 8, पृष्ठे 59-60.
2. पाहा : उपरोल्लेखित लेख.

(टीप : ''कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण बँक व्यवसाय'' या विषयावरील संशोधन प्रकल्पांतर्गत तयार केलेल्या निबंधांपैकी हा दुसरा निबंध.)

## परिशिष्ट

## कोल्हापूर जिल्हयातील एकच एक बँक शाखा असलेल्या आणि एकाहून अधिक बँकशाखा असलेल्या गावांची तालुकावार यादी

| तालुका (गावांची संख्या) | एकच एक बँक शाखा असलेली गावे | | | | एकाहून अधिक बँक शाखा |
|---|---|---|---|---|---|
| | सरकारी क्षेत्रातील बँक | खाजगी क्षेत्रातील बँक | जिल्हा मध्य. सह. बँक | नागरी सह. बँक | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. करवीर (32) | (1) चुये<br>(2) आंबेवाडी<br>(3) भुये | - | (1) वडकशिवले<br>(2) बहिरेश्वर<br>(3) हसुर दुमाला<br>(4) निगवे दुमाला<br>(5) वारंगे<br>(6) देवळे<br>(7) कांचनवाडी<br>(8) भुयेवाडी<br>(9) कोगे<br>(10) आमशी<br>(11) इस्पुर्ली<br>(12) नांदगांव<br>(13) छाफोडी<br>(14) निगवेखालसा | (1) वडणगे<br>(2) पाचगांव | (1) सडोली खालसा<br>(2) मुडशिंगी<br>(3) बालिंगे<br>(4)सांगरूळ<br>(5) परिते<br>(6) वसगडे<br>(7) हळदी<br>(8) खुपिरे<br>(9) उचगांव<br>(10) प्रयाग चिखली<br>(11) कुडित्रे<br>(12) कसबा बीड<br>(13) शिरोली दुमाला |
| 2. पन्हाळा (18) | (1)अमृतनगर<br>(2)पोर्ले तर्फ ठाणे<br>(3) यवलूज<br>(4) किसरूळ | (1)बोरपाडळे | (1) पडळ<br>(2) अकुर्डे<br>(3) पुनाळ<br>(4) वेतवडे<br>(5) कसबा ठाणे<br>(6) मरळी | - | (1) काले<br>(2) सातवे<br>(3) बाजार भोगांव<br>(4) घोटवडे<br>(5) कोतोली<br>(6) वारणानगर<br>(7) असुर्ले पोर्ले |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
|---|---|---|---|---|---|
| 3.हातकणगले | (1) नागाव<br>(2) घुणकी<br>(3) तारदाळ | (1) रांगोळी<br>(2) चंदूर<br>(3)माणगांव<br>(4) बाहुबली<br>(5) टोप | (1) नरंदे<br>(2) अंबप<br>(3) साजणी<br>(4) सावर्डे<br>(5) भादोले | (1) आळते<br>(2) खोची<br>(3) किणी<br>(4) जुने पारगांव<br>(5) तळंदगे | (1) वाठार<br>(2) इंगळी<br>(3) कुंभोज<br>(4) रेंदाळ<br>(5) हेर्ले<br>(6) यळगुड<br>(7) रुई |
| 4. शिरोळ | - | (1)अर्जुनवाड<br>(2) शिरटी<br>(3) दानवाड (जुने)<br>(4) शिरदवाड | (1) हारोळी<br>(2) हसूर<br>(3) टाकवडे<br>(4) औरवाड<br>(5) निमशिरगावं | (1) कवठे गुलंद<br>(2) घालवाड<br>(3)शिरढोण<br>(4) आलास<br>(5) यड्राव | (1) नांदणी<br>(2)अबदुललाट<br>(3)दत्तवाड<br>(4) अकिवाट<br>(5) गणेशवाडी<br>(6)नरसोबावाडी<br>(7) कोथळी<br>(8) टाकळी<br>(9) खिद्रापूर<br>(10) दानोळी |
| 5. कागल | (1) खडकेवाडा<br>(2) हळदी | - | (1) चिखली<br>(2) बेळवले बुद्रुक<br>(3) केनवडे<br>(4) केसरी<br>(5) सुरुपली<br>(6) म्हाकवे | (1) कसबा सांगाव<br>(2)सुळकूड | (1) बिद्री<br>(2) बाचणी<br>(3) कापशी सेनापती<br>(4) सिद्धनेर्ली<br>(5) मुरगूड<br>(6)मौजे सांगाव<br>(7) लिंगनूर<br>(8) बाणगे |
| 6.गडहिंग्लज | - | (1) नरेवाडी | (1) मुंगुरवाडी<br>(2) कानडेवाडी<br>(3) जरळी<br>(4) अत्याळ<br>(5) नांगनूर | (1) कौलगे<br>(2)दुंडगे<br>(3) कडगावं | (1) नेसरी<br>(2) हेब्बाळ जैत्याळ<br>(3) कसबानूल<br>(4)महागांव<br>(5) हरळी<br>(6)हलकर्णी |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
|---|---|---|---|---|---|
| 7.चंदगड (16) | (1) तुडिये | - | (1)तिलारी नगर<br>(2) कुदनूर<br>(3) शिरोली खुर्द<br>(4) हेरे<br>(5) ढोलगरवाडी<br>(6) म्हाळेवाडी | (1) शिणोली<br>(2) कार्वे | (1) चंदगड<br>(2) कणूर खुर्द<br>(3) कोवाड<br>(4) अडकूर<br>(5) तुर्केवाडी<br>(6) हलगर्णी<br>(7) माणगांव |
| 8.आजरा (11) | (1) शिरसंगी | - | (1) मलिग्रे<br>(2) वडकशिवले<br>(3) किणे<br>(4) पेरणोली<br>(5) सरोळी | - | (1) उत्तूर<br>(2) गवसे<br>(3)मडिलगे<br>(4) भादवान |
| 9.भुदरगड (15) | (1) पाटगांव<br>(2) मदूर | - | (1) शेलोली<br>(2) म्हासवे<br>(3) कराडवाडी<br>(4) पुष्पनगर<br>(5) मिणचे खुर्द<br>(6) तांबळे<br>(7) दिंडेवाडी<br>(8) वेसर्डे<br>(9) सोनुर्ली<br>(10) मडिलगे | - | (1) कूर<br>(2) कडगांव<br>(3) पिंपळगांव |
| 10.राधानगरी (17) | (1)आवळीबुद्रुक | (1) घोटवडे | (1)शिरगांव<br>(2) शेळेवाडी<br>(3) कौलव<br>(4) तुरंबे<br>(5) गुडाळ<br>(6) छाफोडी<br>(7) अणाजे | - | (1) सरवडे<br>(2) सोळांकूर<br>(3) राधानगरी<br>(4)राशिवडे<br>(5) कसबावाळवे<br>(6)म्हासुर्ली<br>(7) धामोड<br>(8) कसबातारळे |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
|---|---|---|---|---|---|
| 11.गगनबावडा (6) | - | - | (1)शेलोशी<br>(2) वेतवडे<br>(3) असंडोळी<br>(4) मंडुकली | - | (1)गगनबावडा<br>(2) साळवण |
| 12.शाहूवाडी (14) | (1) वारुळ<br>(2) माळेवाडी | - | (1) अंबा<br>(2) कापशी<br>(3) मौजे सोनडोळी<br>(4) माण<br>(5) नंदगांव | (1) केर्ली | (1) शाहूवाडी<br>(2) सरुड<br>(3)करंजफेण<br>(4) मलकापूर<br>(5) बांबवडे<br>(6) भेडसगांव |


# मराठी अर्थशास्त्र परिषद

**आंतरराष्ट्रीय व्यापार – सिद्धान्त व धोरण (लेखक : भ.ग. बापट)**

एम. ए अर्थशास्त्र अभ्यासक्रमांतर्गत आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र विषयासाठी उपयुक्त आणि दर्जेदार म्हणून प्रशंसा लाभलेला वरील ग्रंथ वाचकांना उपलब्ध झाला आहे.

किंमत रु. 160 आणि सूट 10 टक्के. सूट वजा जाता रक्कम म. ऑ.ने/ डिमांड ड्राफ्टने (**'मराठी अर्थशास्त्र परिषद'** या नावाने आणि औरंगाबाद येथील बँक शाखेवर देय ) कार्यवाहांकडे पाठवावी. ग्रंथ आमच्या खर्चाने रजिस्टर्ड बुक पोस्टाने पाठविला जाईल.

**पत्ता : डॉ. सर्जेराव ठोंबरे, समन्वयक, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, अभ्यास केंद्र, विवेकानंद महाविद्यालय, समर्थ नगर, औरंगाबाद-431001**

# राज्यसरकारे : काही राजकोषीय प्रश्न, काही अविचार

● नी. भा. सप्रे
*निवृत्त प्राचार्य, नौरोसजी वाडिया कॉलेज,*
*पुणे.*

मराठी अर्थशास्त्र परिषद पुरस्कृत धुळे व्याख्यानमाला धुळे येथे
10 फेब्रुवारी 2003 रोजी झालेल्या व्याख्यानाचे शब्दांकन

**भा**रतातील राजकोषीय परिस्थिती जितकी विकट व गोंधळात टाकणारी आहे तितकीच गोंधळाची स्थिती त्याबाबत असणाऱ्या विचारांची आहे. गेल्या अर्धशतकात आपले विचार फार अस्थिर अशा अवस्थेला पोचलेले आहे. विशेष म्हणजे भारतीय असे विचार आपण निर्माण केलेले नाहीत. मिश्रअर्थव्यवस्था व अलिप्तता फार काळ टिकू शकली नाही. मिश्र-अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग जो आम्ही पंचवार्षिक योजनात साकारु पहात होतो तो भाग ढासळू लागला आहे. योजना समिती पूर्वीसारखी सर्वसत्ताधीश राहीलेली नाही. अनेक कारणामुळे योजना वेळेवर तयार होत नाहीत व त्यांचे स्वरूप फक्त खर्च योजना असे होत आहे. एकेकाळी योजना महत्त्वाचा दस्तावेज होता. आज तो तसा राहिलेला नाही.

एकीकडे योजना तयार करीत असतानाच आम्ही जागतिक आर्थिक सुधारणांचे पाईक बनत आहोत. या सुधारणात आमचा सहभाग कसा वाढेल याचे प्रयत्न सतत चालू आहेत. या कार्यात असणारे द्वंद्व व परस्पर विरोधी आचार व विचार हे आजच्या समस्यांचे मूळ कारण आहे. यातूनच अस्थिरता निर्माण झाली असून संभाव्य धोके नकळत पत्करण्यात येत आहेत.

जागतिक आर्थिक सुधारणामागील तात्त्विक भूमिका फार महत्त्वाची आहे. चलनवाढीची समस्या मुख्य मानून त्याचे मुख्य कारण सरकारचे वाढलेले क्षेत्र व त्यावर वाढत जाणारा खर्च हे मान्य केले आहे. सरकारी क्षेत्र कमी करणे हे या तत्त्वांमुळे आवश्यक ठरते. पण हे क्षेत्र कमी करावयाचे असेल तर अंदाजपत्रकातील कर कमी करणे महत्त्वाचे ठरेल. प्रगत देशात प्रत्यक्ष करांचे प्रमाण जास्त असल्यामुळे हे कर किंवा उत्पन्नावरील कर कमी करणे योग्य ठरेल. पूर्वी उत्पन्नावरील कर अवास्तव झाल्यामुळे खाजगी क्षेत्र कमी पडले व सरकारी क्षेत्र वाढले. उत्पन्नावरील कर कमी केल्यास खाजगी क्षेत्र वाढू शकेल व सरकारी क्षेत्र कमी करता येईल. असे झाल्यास कार्यक्षमता वाढेल व साधनसामुग्रीचा योग्य वापर होईल. म्हणून सरकारी क्षेत्र कमी झाले तर बरेच काही साध्य होईल असा विचार प्रस्थापित झाला.

सरकारी क्षेत्र कमी करण्याचा दुसरा

महत्त्वाचा भाग म्हणजे केंद्र सरकारनी आपले खर्च कमी करणे व काही खर्च स्थानिक सरकारकडे सोपवून एकत्रित असणाऱ्या खर्चातून सहभाग काढून घेणे हा आहे. यात कल्याणकारी सेवांवर खर्च कमी करण्यास बराच वाव आहे असे मानन्यात आले. यातून सरकारी क्षेत्र बऱ्याच जबाबदारीतून मुक्त होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला.

भारतात या प्रक्रियेला फार कमी वाव आहे. एक तर आपल्याकडे लोकरक्षणकारी सेवांवर फार कमी खर्च होतो व तो मर्यादित लोकांपुरताच आहे.दुसरे म्हणजे केंद्र सरकारचे होणारे खर्च राज्यांवर टाकता येणारे नाहीत, अशा खर्चाचे प्रमाण 02-03 च्या अंदाजपत्रकात 78 टक्के आहे. उरलेल्या खर्चात राज्यांच्या मदतीचा बराच अंतर्भाव आहे. तेव्हा आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम पूर्णपणे अमलात आणता येतार नाही. आपल्या संघराज्यात कल्याणकारी खर्च खऱ्या अर्थाने राज्यसरकारांच्या अखत्यारीत आहेत व त्यावरील खर्च मर्यादितच आहे. एकूण खर्च कमी करण्याची क्षेत्रे मर्यादित आहेत. कर सुधारणा अमलांत आणतांना या पैलुंकडे फारसे लक्ष देण्यात आले नाही.

सरकारी खर्च कमी करण्याची प्रक्रिया शेवटी स्थानिक संस्थांच्या अनेक खर्चाचे खाजगीकरण किंवा हस्तांत्तर करण्यापर्यंत पोचते. यात स्थानिक संस्थांना मिळणारी मदत कमी करता येईल व तेथे अप्रत्यक्ष कर आणून स्थानिक प्रत्यक्ष कर कमी करता येतील असा विचार मांडण्यात आला. इंग्लंडमधे अशा प्रकारच्या केंद्र-स्थानिक आर्थिक संबंधावर विशेष भर देण्यात आला. आपल्याकडे स्थानिक संस्था राज्यसरकारांच्या अधिकारात असल्यामुळे व स्थानिक पातळीवर आर्थिक संबंध फारसे विकसित न झाल्यामुळे या पातळीवरील सुधारणा फारशा होउ शकल्या नाहीत. या पातळीवरील खाजगीकरणाचे प्रयोग फारसे परिणामकारक किंवा वाढलेले नाहीत. तसेच राज्य-वित्तीय मंडळाचे कार्य अपेक्षेपेक्षा खूपच मर्यादित झालेले आहे. त्यातील अनेक अडचणी बघून अकराव्या वित्तमंडळाने राज्य-वित्तीय मंडळाचे कार्य हे केंद्र-वित्तीय मंडळाच्या कार्यकक्षेत आणू नये असे मुद्दाम नमूद केले आहे.

सरकारचे काही प्रकल्प खाजगी क्षेत्रांना विकून अंदाजपत्रकीय तूट भरुन काढावी व सरकारचे खर्च वाचवावेत असा प्रस्ताव आहे. पण असे खाजगीकरण वादग्रस्त ठरले आहे. या खाजगीकरणाला काही विरोध आहेत व बऱ्याच मर्यादा देखील निर्माण झाल्या आहेत. सध्या फक्त फायद्यात चालणाऱ्या उद्योगधंदयांचे खाजगीकरण चालू आहे. प्रचलित एकूण सात धंदे विकले गेले आहेत व पाच हजार कोटीची मिळकत झाली आहे. इतर बारा हजार कोटीचे प्रस्ताव सोडून देण्यात आले आहेत. अनेक वाद, कोर्टकचेऱ्या व इतर अडचणीमुळे खाजगीकरणाचा विचार मागे पडला आहे. अंदाजपत्रकात बारा हजार कोटीचे उत्पन्न गृहित आहे व पुढे समभागाचे भाव वाढुन पन्नास हजार कोटी मिळतील असा एक अंदाज आहे.

राज्यसरकारांकडे खाजगीकरणाकरीता फार थोडे प्रकल्प आहेत. वाहन व्यवहार, वीजप्रकल्प, दुग्धपुरवठा, रस्तेबांधणी, शिक्षण, कापूस खरेदी व पाणीपुरवठा असे काही प्रकल्प सांगता येतील. यापैकी रस्तेबांधणीचे काही व्यवहार सोडले तर इतर फारशी प्रगती नाही.

या सर्वावरुन खर्च कमी करण्याचे कार्य मर्यादित व उत्पन्नाच्या दृष्टीने फारसे आशादायक नाहीत हे स्पष्ट दिसते.

खाजगीकरण झाल्यानंतर या उद्योगधंदयाचे पुढे काय होणार याचा विचार झालेला नाही. असे गृहित धरले आहे की खाजगी क्षेत्रात हे उद्योगधंदे

नीट चालतील. प्रत्यक्षात असे होईलच असे नाही कारण मुळात खाजगी क्षेत्र सर्वत्र कार्यक्षम असते हा समज चुकीचा आहे. अगदी मंदी येण्यापूर्वीसुद्धा अनेक मोठे कारखाने तोटयात चालले होते. अनेक कंपन्यांची भांडवली जिंदगी निम्म्या ते शुन्य किंमतीवर आलेली होती. खाजगी क्षेत्राने 02-03 या सालापर्यंत बँकांचे रु. 1,10,000/- कोटी देणे होते. तसेच उत्पन्न कराचे रु. 12,483 कोटी देणे होते. खाजगी क्षेत्राला एक मुभा व परवाना आहे. ते कोटयावधी रुपयांचे तोटे मागे ठेवून स्वत:चे दिवाळे काढू शकतात. शेवटी हा तोटा समाजच मुकाटयाने सहन करतो व तरीही खाजगी क्षेत्र कार्यक्षम आहे असा दिंडोरा पिटत असतो. सरकारी क्षेत्राला कर बुडवता येत नाहीत, खोटया प्रतिमा उभ्या करता येत नाहीत किंवा स्वत:चे दिवाळे वाजवता येत नाही. खाजगीकरण करून सरकार पुढे असलेला मूळ प्रश्न सुटत नाही. माझ्या मते अकार्यक्षमता सर्व क्षेत्रातून आहे. त्याचा साठा होत असतो व त्याची समाजाकडून भरपाई होईपर्यंत टोलवा-टोलवी केली जाते. या भरपाईचे क्षेत्राक्षेत्रातून मार्ग निराळे असतात एवढेच.

खाजगीकरणाचा फारसा न चर्चिलेला भाग म्हणजे याचे राज्यसरकारांवर होणारे परिणाम. खाजगीकरणामुळे केंद्राचा राज्यात येणारा पैसा थांबेल व बदली खाजगी क्षेत्राच्या पैशाचे नवीन प्रवाह निर्माण होतील. यातील फरकाची मोजमाप करणे फार कठीण होईल. दुसरा प्रश्न असा की या भरपाई पैशावर राज्यांचा कितपत हक्क आहे. राज्यांचे नुकसान होणार असेल तर त्याचे काय ? केंद्र सरकारने या पैशांचा कसा वापर करावा हा विचार अजून पक्का झालेला नाही, विशेषत: केंद्र सरकारचे कर्ज कमी करण्याबाबत. आर्थिक सुधारणा व खाजगीकरण चालू असतांना केवळ पूर्वीच्या सरकारची बांधिलकी म्हणून आम्ही योजना प्रक्रियेत मोठा बदल केला आहे. घटनेच्या 73 व 74व्या दुरुस्तीमुळे स्थानीक संस्थांकडे योजनेच्या फार मोठ्या जबाबदाऱ्या टाकण्यात आल्या आहेत. त्याकरीता लागणारा पैसा हा प्रथम राज्यसरकारांनी पुरवावयाचा आहे. केंद्र सरकारची अप्रत्यक्ष मदत असेल. पण 02-03 या वर्षाकरीता सरकारचा ग्रामीण भाग सुधारणेवचरचा रु. 7973 कोटी खर्च (एकूण खर्चाच्या 5.5 टक्के) पाहता पुढे राज्यसरकारांवर फार मोठा बोजा निर्माण होण्याची शक्यता आहे. केंद्रीय वित्तमंडळाकडून मिळणारी मदत फार पूरक असेल असे समजण्याचे कारण नाही.

पुढे येणाऱ्या जबाबदाऱ्या लक्षात घेता राज्यसरकारांना आपले उत्पन्न कर वाढवून पुरेसे करावे लागेल. कर वाढविल्यास ते केंद्र सरकार करीत असलेल्या करकपातिविरुद्ध असेल व राज्यसरकारांना अडचणीत टाकणारे असेल. राज्यसरकारांकडे कमी करण्यासारखे प्रत्यक्ष कर नाहीत. हा विरोध व संघर्ष लक्षात घेतलेला नाही.

**घटना व घटनादुरुस्त्या**

भारताची घटना 20 व्या शतकाच्या पहिल्या अर्धशतकांत बऱ्यांच स्थित्यंतरातून बाहेर आल्यानंतर अंतीम स्वरुपाला पोचली. सन 1935 च्या कायद्यात भारताची संघराज्य म्हणून जरी सुरुवात झाली असली तरी ते कोणत्या प्रकारचे असावे याबाबत दुमत होते. व आजही ते आहे. केंद्रसरकारचे अधिकार हे फक्त तीन-चार क्षेत्रापुरतेच असावेत व उरलेले सर्व अधिकार, शेष अधिकारासकट, राज्यसरकारांकडे असावेत असा एक विचार होता. पण या संदर्भात राज्यांचे आर्थिक क्षेत्र कसे असावे याबाबत फारशी चर्चा झाली नाही. अशा आशयाची एक घटना प्रत्यक्षात होऊ घातली होती. ही भारताची पहिली 1946 ची घटना. परंतु ती पूर्णस्वरुपात येण्याच्या आतच भारताचे विभाजन झाले. भारताला स्वातंत्र्याच्या दृष्टिने 1947 हे साल जरा महत्वाचे असले तरी पुढील घटनांच्या इतिहासाचे मूळ 1946

मध्ये आहे. माझ्या मते 1946 मधल्या घटनांचा अभ्यास पूर्णपणे झालेला नाही. पाकिस्तान निर्माण झाल्यानंतर जी घटना झाली ती दुसरी घटना होय. व तीच आज अस्तित्वात आहे. याच घटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर होते. पण ही घटना 1946 च्या घटनेच्या तुलनेत पूर्णपणे निराळी होती, या घटनेत केंद्रसरकार हे सर्वाधिकारी व आर्थिकदृष्ट्या बलवान करण्यात आले व राज्यसरकारांना गौण स्थान देण्यात आले. शेष अधिकार हे केंद्रसरकारला देण्यात आले. घटनेतील ह्या आमूलाग्र बदलांची व त्यामागील परिश्रमांची व निष्णातपणाची टीकाकारांनी पुरेशी दखल घेतलेली नाही. तसेच हेही लक्षात घेतले नाही की 1946, ची घटना ही बदलली असली तरी काही राज्यसरकारांच्या स्मरणातून ती गेलेली नाही.

सध्याच्या घटनेत राज्यसरकारांकडे कमी उत्पन्नाची व कमी लवचिक अशी करक्षेत्रे देण्यात आलेली आहेत तर उलट कल्याणकारी प्रकारचे खर्च राज्यांच्या अधिकारांत ठेवण्यात आलेले आहेत. यातून निर्माण होणारा राजकोषीय असमतोल हा केंद्र सरकारच्या वित्तीयमंडळाने आर्थिक हस्तांतर करून भरून काढावा अशी घटनेची व्यवस्था आहे. त्याप्रमाणे आजपर्यंत अकरा वित्तमंडळे स्थापन झाली व बारावे वित्तमंडळ नुकतेच स्थापन करण्यात आले आहे.

घटनेच्या 73 व 74 दुरुस्त्यांमुळे वित्तमंडळाचे अधिकार वाढविण्यात आलेले आहेत. स्थानिक संस्थांबाबत राज्यसरकारांवर जी ज्यादा आर्थिक जबाबदारी पडणार आहे त्याचा विचार करून वित्तमंडळाने राज्यांना अधिक मदत करावयाची आहे.

असा घटनात्मक बदल राज्यसरकारांना मदत करणारा असला तरी या दुरूस्त्यांमध्ये इतर बदल जे सामावलेले आहेत ते राज्यांना बरेच अडचणीत टाकणारे आहेत. या दुरूस्त्यांमुळे राज्यस्थानिक संस्थांच्या संबंधाचे नवीन पर्व सुरू झाले आहे. या पर्वाची फार मोठी जबाबदारी नव्याने स्थापन होणाऱ्या राज्यपातळीवरील वित्तमंडळांची असेल. याचा हेतू स्थानिक संस्था स्वायत्त व बळकट करण्याचा असला तरी तसे उद्देश साधण्याचे स्वतंत्र मार्ग घटना बदलणाऱ्यांना किंवा राज्य-वित्तमंडळांना सापडलेले नाहीत. पर्यायाने हा बोजा राज्यसरकारांवरच पडणार आहे. सध्याच्या बिकट परिस्थितीत ही जबाबदारी राज्यांना पार पाडणे फारच अवघड होईल.

सन 2000 मधे 80 वी घटनादुरुस्तीत बरेच बदल करण्यात आले. प्रथम कलम 271व 269, यात सामावलेले कर वगळता केंद्र सरकारचे सर्व कर व त्यावरील उत्पन्न हे केंद्र व राज्यसरकारमध्ये वित्तमंडळाच्या शिफारशीनुसार विभागले जातील. या तरतुदीमुळे स्वतंत्ररित्या करविभाजनाच्या तरतुदी निष्प्रभ ठरतात म्हणून त्या वगळण्यात किंवा बदलण्यात आल्या आहेत. उदा. कलम 270, व 27 2, कलम 269 मधील सर्व कर जे राज्य सरकारांना उत्पन्नाकरीता हस्तांतरित करण्यात आले होते त्यांचा निर्देश वगळण्यात आला आहे. या करांच्या विभाजनाबाबत बरेच प्रश्न उपस्थित होतात व त्यांचे भवितव्य अधांतरी राहते. यात राज्य सरकारांचे नुकसानच होण्याची शक्यता आहे.

राज्य सरकारांनी मूल्य वर्धीत कर आणण्याचा प्रस्ताव जो मान्य केला आहे त्याला घटना दुरूस्ती आवश्यक आहे. राज्यसूचीमधे मूल्य वर्धीत कराचा उल्लेख करावा लागेल. तो कसा असेल हे महत्त्वाचे ठरते. तसेच केंद्र सरकार राज्यसकारांना कशी व किती काळ भरपाई देते हेही महत्त्वाचे आहे.

मूल्य वर्धीत कराबाबत विशेष लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे हा कर प्रगत देशात प्रत्यक्ष कर कमी करून अप्रत्यक्ष करांचे प्रमाण

वाढविण्याकरीता व करपाया रुंद करण्याकरिता आणला गेला. मोजक्या श्रीमंत लोकांवरील कर कमी करुन तो जास्त संख्येच्या सामान्य लोकांवर पडावा असा मूळ हेतू आहे. तसेच तो सर्व देशाकरिता एकाच सरकाराने म्हणजे केंद्र सरकारांनी बसवावा अशी अपेक्षा आहे. मूल्यवर्धीत कर प्रणालीत करसत्ता केंद्राकडे जाते व त्याचे केंद्र आणि स्थानिक असे विभाजन अपेक्षित नाही. याच कारणाकरिता अमेरिकेनी मूल्यवर्धीत कर स्वीकारलेला नाही. त्यांच्या मते राज्य सरकारांनी बसविलेला एकअंशी विक्रीकर आणि व्हॅटकर यात फारसा फरक नाही. राज्य सरकारे मूल्य वर्धीत कर मान्य करणार नाहीत हे अमेरिकन सत्य आहे. आपण त्याकडे डोळेझाक करुन राज्यांना 1-4-03 पर्यंत व्हॅट आणण्यास तयार केले आहे. या करीता राज्यांना सेवाक व प्रवेशकर बसविण्यास परवानगी देण्यात आली आहे व ते शक्य व्हावे म्हणून योग्य त्या घटनादुरुस्त्या होतील याचे आश्वासन देखील देण्यात आले आहे. मुळात केंद्र सरकारच्या सेवाकरालासुद्धा घटना दुरुस्तीची आवश्यकता आहे. सध्या हे सेवाकर शेष अधिकारानुसार बसविले जात असले तरी त्याची घटनाग्राहचता शंकातीत नाही. घटनाकारांनी शेष अधिकारांची योजना एक कायम स्वरुपाचा कर अधिकार म्हणून केलेला नाही. घटना दुरुस्तीत सेवाकर कसे आणले जातात हे राज्यसरकारांच्या दृष्टीने फार महत्त्वाचे ठरेल.

राज्य सरकारांनी मूल्य वर्धीत कर आणला तर त्यांना काही काळ केंद्र सरकारवर अवलंबून रहावे लागेल. तसेच मूल्य वर्धीत कर बसविला तर स्थानिक संस्थाचे ऑक्ट्रॉय सारखे कर काढून टाकावे लागतील. यात ऑक्ट्रॉय असणाऱ्या राज्यांचे नुकसान होणार आहे. नुकसान भरपाईत याचा कितपत समावेश असेल हे सांगणे कठीण आहे.

महाराष्ट्र सरकारने मूल्य वर्धीत कराला अनुमती कशी दिली हे न समजण्यासारखे आहे. महाराष्ट्रात ऑक्ट्रॉयचे उत्पन्न बरेच आहे व अत्यंत महत्त्वाची शहरे ऑक्ट्रॉयवर अवलंबून आहेत. मूल्य वर्धीत कर आणल्यास आजना उद्या ऑक्ट्रॉय रद्द करावा लागेल व एकटच्या महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर करलुप्तता होईल. व्हॅटमधे याचा विचार झालेला नाही. किंवा केंद्र सरकार असे गृहित धरते की नवीन करातून ही उणीव भरून काढता येईल. पण याबाबत सविस्तर अशी चर्चा झालेली दिसत नाही.

राज्यस्तरीय मूल्य वर्धीत कर हा पूर्णपणे चुकीचा विचार आहे. राज्य सरकारांनी तो मान्य केला असला तरी त्यावर परत विचार करावा. सर्वात महत्त्वाचे म्हणजे एकाच देशात दोन स्तरांवर मूल्य वर्धीत कर असणे हे मूल्य वर्धीत कर व्यवस्थेत बसत नाही. शेवटी एकच मूल्य वर्धीत कर असावा असा प्रस्ताव येईल व राज्यांना आपला मूल्य वर्धीत कराचा अधिकार सोडून द्यावा लागेल.

प्रत्यक्ष व्यवहारात मूल्य वर्धीत करामध्ये येणाऱ्या वस्तू सर्व राज्यात समान असतील, त्यांचे दर कमी असतील व केंद्रप्रणालीत विक्रीकर काढून टाकावा लागेल व एकूण राज्यस्तरीय कररचना बरीच बदलेल व राज्यांचे बरेच नुकसान होईल.

शेतकी उत्पन्न कर केंद्राकडे सुपूर्त करावा अशीही एक सूचना आहे. याला घटनादुरुस्तीची आवश्यकता नसली तरी राज्य सरकारांच्या विरोधामुळे प्रत्यक्ष व्यवहारात येण्याची शक्यता कमी आहे.

या सर्व प्रत्यक्ष व संभाव्य बदलामुळे राज्यसरकारांचे अर्थकारण ढवळून निघणार आहे. याच्या एकूण परिणामाची कल्पना कुणालाच करता येणार नाही. सध्याच्या राजकीय अस्थिरतेत असे महत्त्वाचे बदल घातक ठरु शकतात. यातून महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो तो घटनेच्या मूळ ढाच्याबाबत. या

सर्व घटनाबदलांचा एकत्रित विचार केला तर आपण घटनेचा ढाचा बदलत आहोत हे स्पष्ट दिसून येते. याचा हेतू राज्यसूची बदलण्याचा आहे यात राज्य सरकारे निष्प्रभ होणार आहेत. सुदैवाने सर्वोच्च न्यायालयाला ही गोष्ट मान्य होणार नाही.

**चिंतेच्या बाबी**

राज्यसरकारांची राजकोषीय परिस्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे हे अगदी स्पष्ट आहे. एकीकडे खर्च वाढत आहे व दुसरीकडे उत्पन्नाची शिथिलता असा बहुतेक राज्य सरकारांचा अनुभव आहे. परिणामी तुटीचे अर्थसंकल्प व कर्ज काढून तूट भरून काढणे अशी परिस्थिती आहे. सर्व राज्यांनी 2002-03 वर्षाकरिता रु. 49,000/- कोटीची तूट रु. 43,000/- कोटीची कर्जे काढून रु. 6000/- कोटीपर्यंत कमी केली आहे. असे सतत करता येणार नाही. सध्या राज्यसरकारांचे उत्पन्न दरसाल 13 ते 14 टक्के वाढत आहे तर खर्च 15 टक्के वाढीव आहे. राज्यांच्या कर उत्पन्नात प्रत्यक्ष करांचे उत्पन्न नगण्य आहे तर विक्रीकरांचे उत्पन्न एकूण कर उत्पन्नापैकी 60 टक्के व सर्व उत्पन्नापैकी 13 टक्के आहे. वार्षिक वाढ जवळपास 13 टक्के आहे.

राज्यांची एकूण कर्जे 02-03 पर्यंत रु. 589 हजार कोटीपेक्षा जास्त होती. तर व्याजावरील खर्च रु. 72,000/- कोटीपेक्षा जास्त होता. एकूण खर्चाच्या 24 टक्के खर्च व्याजापोटी होता तर केंद्र सरकारचे कर्ज त्याच सरकारचे कर्ज परतफेडी व व्याजापायी वापरावे लागत आहे. यामुळे राज्यसरकारे आता अल्पबचत व बाजारातून काढलेली कर्जे यावरच अवलंबून आहेत. राज्यांच्या उत्पन्नात अगदी अलीकडे लॉटरीपासून मिळणाऱ्या उत्पन्नानी मोठी हजेरी लावली आहे. चालु वर्षात हे उत्पन्न दुप्पट वाढेल असा अंदाज आहे. याउलट राज्यातील अनेक प्रकल्प तोटयात चालले आहेत. राज्य वीज मंडळांची 2000-01 या वर्षाकरीता रु. 26,000 कोटीची तूट आहे तर या मंडळांनी केंद्रसरकारचे रुपये 41,000 कोटी देणे आहे. राज्य सरकारे हमी देण्याच्या व्यवहारात फार अडचणीत येऊ शकतात कारण कर्जवसूली बाबतच्या कायद्यातील तरतूदी बदलल्या आहेत. महाराष्ट्र सरकारचा या बाबतचा अनुभव अतिशय बोलका आहे. असे असूनही केंद्र सरकार राज्यसरकारांची मदत कमी करून कर्जाचे प्रमाण वाढवित आहे.

वेळेअभावी महाराष्ट्राची परिस्थिती खुलासेवार न सांगता एवढेच नमूद करेन की महाराष्ट्राला केंद्र सरकारचे जे वित्तमंडळाकडून हस्तांतर होत आहे ते अत्यल्प आहे. महाराष्ट्रात प्रत्यक्ष उत्पन्न कर नाहीत उलट लॉटरीद्वारे पुढील 10 वर्षात रु. पाच हजार कोटीचे जास्त उत्पन्न अपेक्षित आहे. सबंध समाजच जुगारी व्यवहाराकडे झुकत चालला आहे. जुगारी व्यवहार करून एखादी व्यक्ती काही काळ उत्पन्न मिळवू शकते पण राष्ट्राचे ते उत्पन्नाचे साधन होऊ शकत नाही. राष्ट्राची संपत्ती श्रमातूनच निर्माण झाली पाहिजे व त्याकरिता प्रथम आळशीप्रवृत्ती झटकून दिली पाहिजे. समाजात पसरलेला आळस हा आजचा मोठा यक्ष प्रश्न आहे.

महाराष्ट्रातील साखर धंदयाचे व वीज व्यवहारातले तोटे, साखरेचे पडीक साठे व कापूस खरेदीतले तोटे व देणी हे सतत चालू राहणारे प्रश्न प्रदीर्घ चर्चेचे स्वतंत्र विषय आहेत.

**राज्यसरकारांची संभाव्य गळचेपी**

सध्याचे होणारे व होऊ घातलेले राज्यस्तरीय बदल यांचा एकत्रित विचार केला तर आपल्या असे लक्षात येईल की घटनेचा साचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या बदलण्याचे प्रयत्न चालू आहेत. या प्रयत्नात राज्यसरकारांची उत्पन्नाची साधने कमी

करुन ती केंद्रसरकार व स्थानिक संस्था यामध्ये सामावली जातील व संघराज्यात राज्यसरकारांची आर्थिक गळचेपी होईल. राज्यसरकारांना मिळणारी मदत स्थानिक संस्थांना मदत करण्यात खर्चावी लागेल. राज्यसरकारांची अवस्था ही काहीशी भारत सरकारच्या 1919च्या कायद्यात प्रांतिक सरकारांची होती तशी होईल. प्रांतिक सरकारांना या अवस्थेत राहणे केवळ अशक्य होते. तब्बल पंधरा वर्षे झगडून प्रांतिक सरकारांनी 1935 चा कायदा आणला व त्यात प्रांतिक सरकारांची स्थाने भक्कम करुन स्थायिक संस्थांची स्थाने दुय्यम करविण्यात यश मिळविले. भारताच्या घटनेने 1935 च्या कायद्याचीच संघरचना स्वीकारली आहे. पण सध्याचे बदल पाहता आपण परत मागे परत जात आहोत की काय अशी शंका येते.सध्याच्या परिस्थितीला सावरतील असे उपाय भारतीय अर्थशास्त्रज्ञांकडे नाहीत हे खेदाने नमूद करावेसे वाटते. भवितव्यात काय होईल हे सांगणे कठीण आहे. प्रश्न सोडविण्याची सुरूवात चुकीच्या बाजूने झाली म्हणजे असे होते. या संदर्भात खालील सूचना लक्षात घेता येतील.

1. राज्यसरकारांची मदत दरमहिना दिली जावी. यात राज्यसरकारांची असलेल्या मदतीत जास्त सोय होणार आहे.

2. राज्यसरकारांची कर्जे दीर्घ मुदतीची करावीत. दोन्ही उपायाबाबत सखोल अभ्यासाची आवश्यकता आहे. विशेषतः दुसऱ्या उपायाबाबत.

**टीप**

केंद्र सरकारने 03-04 या अंदाजपत्रकांत व्हॅट भरपाईकरिता फक्त रु. 700 कोटीची तरतूद केलेली दिसते.

●●●


# मराठी अर्थशास्त्र परिषद

## प्रकाशन पाचवे व सहावे

### मूल्य व वितरण (भाग 1 आणि 2) लेखक : ग. प्र. पिंपरकर

बी.ए. आणि एम.ए. च्या अभ्यासक्रमासाठी उपयुक्त ग्रंथ या ग्रंथाचे भाग 1 आणि 2 स्वतंत्रपणे आता विद्यार्थी व अध्यापकांना पुनर्मुद्रित स्वरूपात उपलब्ध झाले आहेत. प्रत्येक भागाची किंमत रु. 200/- आहे. पाच वा अधिक प्रती घेणाऱ्यांना विशेष सूट मिळेल. पुस्तकाच्या प्रतींसाठी वितरकांकडे/कार्यवाहांकडे मागणी करावी.

**वितरक : अनमोल प्रकाशन, अप्पा बळवंत चौक, पुणे 411 002**

**कार्यवाह-खजिनदार**

# विविध वित्त आयोग आणि महाराष्ट्र - एक आढावा

● **विलास खंदारे**
*श्री. आ. भां. महाविद्यालय, देवगांव (र.),*
*ता. कन्नड, जि.औरंगाबाद*

भारतात संघराज्य पद्धती अस्तित्वात असून भारतातील सर्व राज्यांचा एकमेकांशी सांस्कृतिक व आर्थिक सहसंबंध आहे. देशात कर आकारणीच्या दृष्टीने घटक राज्ये आणि केंद्र यांच्यात फरक केला जातो. केंद्र शासन आपला खर्च भागविण्यासाठी स्वत: काही कराची आकारणी करून कर वसूल करीत असते. देशातील प्रत्येक राज्यांना त्यांचा प्रशासकीय व सामाजिक विकास कार्यासाठीचा खर्च भागविण्याकरीता विशिष्ट प्रकारचे कर आकारण्याचा व वसूल करण्याचा अधिकार शासनाने व संविधानाने राज्यांना दिला आहे. केंद्र सरकारला राज्यांमार्फत कराद्वारे मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळते. केंद्राला सर्वाधिक उत्पन्न हे उत्पादन शुल्क व उत्पन्न कर यापासून मिळते. या दोन्ही करांचा संबंध राज्यांशीच असतो. राज्यांपासून विविध करांद्वारे केंद्र सरकारला जे उत्पन्न मिळते त्या उत्पन्नापैकी काही उत्पन्न राज्यांना त्यांच्या सुधारणा खर्चासाठी विभागून दिले जाते. केंद्राने सर्व उत्पन्न मिळवून राज्यांवर अन्याय करू नये म्हणून संविधानात केंद्राने राज्यांना आपल्या उत्पन्नातील ठराविक हिस्सा देण्याची तरतूद केली आहे. केंद्र आणि राज्य यांच्यात उत्पन्नाचे वाटप करण्यासाठी संविधानाच्या कलम 280 नुसार राष्ट्रपती दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची नेमणूक करतात. या वित्त आयोगाकडे प्रामुख्याने दोन जबाबदाऱ्या सोपविल्या जातात. पहिली, केंद्राला मिळणाऱ्या एकूण कर उत्पन्नापैकी राज्यांना किती उत्पन्न वाटप करावयाचे हे निश्चीत करणे आणि दुसरा या उत्पन्नाची योग्य विभागणी राज्यांमध्ये कशी करावयाची या संबंधीचे निकष ठरविणे हा होय.

या लेखात केंद्रीय उत्पादन कर आणि उत्पन्न कर यापासून केंद्राला मिळणाऱ्या उत्पन्नाची केंद्र-राज्य आणि राज्याराज्यांमध्ये विभागणी करण्याबाबतच्या वित्त आयोगांच्या शिफारशींचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच विविध वित्त आयोगांच्या शिफारशीमुळे महाराष्ट्र राज्याच्या हिश्शात झालेल्या बदलांचा अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासाची काही महत्त्वाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

1. उर्ध्व कर विभागणी आणि समांतर कर विभागणी संदर्भात विविध वित्त आयोगांच्या

शिफारशींचा अभ्यास करणे.

2. वित्त आयोगांच्या शिफारशी अल्पविकसित राज्यांच्या दृष्टिने हितकारक ठरल्या का ?

3. वित्त आयोगांच्या बदलत्या धोरणांमुळे राज्यांच्या हिश्श्यात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

4. विविध वित्त आयोगांच्या शिफारशींमुळे महाराष्ट्राच्या हिश्शात झालेल्या बदलामुळे राज्याला झालेल्या लाभाचा आणि नुकसानीचा अभ्यास करणे.

केंद्राला सर्वाधिक उत्पन्न केंद्रीय उत्पादन कर आणि उत्पन्न कर यापासून मिळते. या दोन्ही करापासून मिळणारे उत्पन्न केंद्र सरकार राज्यांमध्ये वित्त आयोगाच्या शिफारशीप्रमाणे वितरित करीत असते. या लेखात उत्पन्न कर विभागणी व केंद्रीय उत्पादन कर विभागणी असे दोन विभाग करण्यात आले आहेत.

## अ. प्राप्तिकर उत्पन्न विभागणी

प्राप्तिकर उत्पन्नातील राज्यांचा हिस्सा सतत वाढत गेल्याचे विविध वित्त आयोगांच्या शिफारशी वरुन निदर्शनास येते. उत्पन्न कर विभागणीच्या वित्त आयोगांच्या शिफारसी तक्ता क्र. I मध्ये दर्शविल्या आहेत. या शिफारशीवरुन असे निदर्शनास येते की, पहिल्या वित्त आयोगाने केंद्राला मिळणाऱ्या एकूण उत्पन्न करापैकी 55 टक्के उत्पन्न राज्यांमध्ये वाटप करण्यात यावी अशी शिफारस केली. दहाव्या वित्त आयोगाने एकूण केंद्रीय कर उत्पन्नाच्या 29 टक्के उत्पन्नाचे राज्यांमध्ये वाटप करण्याची शिफारस केली, तर अकराव्या वित्त आयोगाने यामध्ये अल्पशी वाढ करून हे प्रमाण 29.5 टक्के एवढे केले.

प्राप्तिकरापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे राज्यांमध्ये वाटप करण्याचे निकष पहिल्या ते अकराव्या वित्त आयोगापर्यंत भिन्न आहेत. वित्त आयोगांच्या बदलत्या निकषांमुळे काही वेळा प्रगत तर काही वेळा अप्रगत राज्यांना अधिक लाभ झाला. राज्यांमध्ये निश्चित झालेल्या उत्पन्न कराच्या हिश्शाचे वाटप करताना पहिल्या, तिसऱ्या व चौथ्या आयोगाने 20 टक्के भार करवसुलीला देऊन 80 टक्के उत्पन्न लोकसंख्येच्या आधारावर वाटप करण्याची शिफारस केली. यामुळे महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, पंजाब, गुजरात व तमिळनाडु या राज्यांना अधिक लाभ मिळाला. याउलट दुसऱ्या, पाचव्या, सहाव्या आणि सातव्या आयोगांनी लोकसंख्येला 90 टक्के तर करवसुलीला 10 टक्के भार दिला. या बदलामुळे उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार, आसाम, ओरिसा, आन्ध्रप्रदेश, केरळ, कर्नाटक व राजस्थान यासारख्या अप्रगत व जास्त लोकसंख्या असलेल्या राज्यांच्या हिश्शात वाढ झाली. पाचव्या वित्त आयोगापर्यंत प्रगत आणि अप्रगत राज्यांच्या हिश्शात फारशी तफावत नव्हती. ही तफावत सहाव्या वित्त आयोगाच्या काळात वाढली कारण या काळात हिमाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय व त्रिपुरा या चार नवीन राज्यांचा कर विभागणीत समावेश झाला. आठव्या वित्त आयोगाने नवीन सूत्र अमलात आणले. त्यात लोकसंख्येचा भार कमी करून मागासलेपणाला प्राधान्य देण्यात आले. यामुळे मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, मेघालय, आसाम व बिहार या राज्यांना लाभ झाला. दुसऱ्या बाजुला महाराष्ट्र गुजरात, पंजाब व हरियाणा यांच्या हिश्शात घट झाली. नवव्या वित्त आयोगाने 11.25 टक्के भार मागासलेपणावर दिला तरीही मध्यप्रदेश, आसाम, उत्तरप्रदेश, बिहार, ओरिसा, राजस्थान यांच्या हिश्शात बदल झाला नाही. दहाव्या वित्त आयोगाच्या निकषांमुळे राज्यांच्या हिश्शात फारसे बदल झाले नाहीत. अकराव्या वित्त आयोगाने प्रतिव्यक्ती उत्पन्नातील अंतर व क्षेत्रफळ या घटकांना 70 टक्के प्राधान्य दिले यामुळे बिहार, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, आसाम, व ओरिसा या राज्यांच्या हिश्शात लक्षणीय

**तक्ता क्र.1**

**प्राप्तीकरापासून मिळणाऱ्या उत्पन्नातील घटक राज्यांचा हिस्सा**

| वित्तआयोग | प्राप्तिकरापासून मिळणाऱ्या उत्पन्नात घटक-राज्यांचा शेकडा हिस्सा | प्राप्तिकरापासून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नातील घटक राज्यांच्या हिश्शाच्या वाटपाचे निकष | |
|---|---|---|---|
| | | लोकसंख्येनुसार | करवसुलीनुसार |
| पहिला | 55 | 80 | 20 |
| दुसरा | 60 | 90 | 10 |
| तिसरा | 65 | 80 | 20 |
| चौथा | 75 | 80 | 20 |
| पाचवा | 75 | 90 | 10 |
| सहावा | 80 | 90 | 10 |
| सातवा | 85 | 90 | 10 |
| आठवा | 85 | नविन निकष<br>10% शिल्लक ठेवून बाकी 90% खालीलप्रमाणे-<br>25% - लोकसंख्या<br>50% - दरडोई उत्पन्नातील तफावत.<br>25% - व्यस्त दरडोई उत्पन्न निकष. | |
| नववा | 85 | 10% शिल्लक ठेवून बाकी 90% खालीलप्रमाणे-<br>25% - लोकसंख्या<br>45% - दरडोई उत्पन्नातील तफावत.<br>11.25 % - व्यस्त दरडोई उत्पन्न निकष.<br>11.25 % - आर्थिक मागासलेपणानुसार. | |
| दहावा | 77.5 | 20% लोकसंख्या<br>60% - दरडोई उत्पन्नातील तफावत<br>5% - आधारभूत सुविधा<br>5 % -क्षेत्रफळानुसार<br>10 % - कर प्रयत्नानुसार | |
| अकरावा | 29.5 | 10% लोकसंख्येच्या प्रमाणात.<br>62.5 % - दरडोई उत्पन्नातील तफावत<br>7.5 % - क्षेत्रफळानुसार<br>5 % -करप्रयत्नानुसार.<br>7.5 % - राजकोषीय अनुशासन निकष | |

स्रोत : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या बुलेटिन्सचे विविध अंक

वाढ झाली. परंतु महाराष्ट्र, तामिळनाडू, आंध्रप्रदेशआदी राज्यांच्या हिश्शात घट झाली.

पाचव्या वित्त आयोगापासून वित्त आयोगांनी अप्रगत राज्यांना महत्त्व दिल्याचे दिसून येते. अकराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींमुळे अप्रगत राज्यांना अधिक लाभ झाला तर महाराष्ट्रासारख्या राज्यांचे नुकसान झाले.

**ब) केंद्रीय उत्पादन कराची उत्पन्न विभागणी**

जवळपास सर्वच वित्त आयोगांनी केंद्रीय उत्पादन करातील राज्यांचा हिस्सा वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. पहिल्या ते सहाव्या वित्त आयोगांनी उत्पादन कर वितरणातील वस्तुंची संख्या वाढविली तर राज्यांच्या हिश्शाचे प्रमाणे 40 टक्के वरून 20 टक्के पर्यंत कमी केले. सातव्या वित्त आयोगापासून केंद्रीय उत्पादन करातील राज्यांचा हिस्सा वाढत जाऊन तो दहाव्या वित्त आयोगापर्यंत 47.5 टक्के पर्यंत पोहोचला. केंद्रीय उत्पादन कर विभागणीचे निकष तक्ता क्र. 2 मध्ये दर्शविले आहेत.

पहिल्या ते चौथ्या वित्त आयोगांपर्यंत प्रगत व अप्रगत राज्यांच्या हिश्शात फारशी तफावत नव्हती. कारण वित्त आयोगांनी लोकसंख्या व मागासलेपणा या सर्वसाधारण निकषांना प्राधान्य दिले. यामुळे समान विकास साध्य झालेल्या महाराष्ट्र, गुजरात, पंजाब आणि हरियाणा या राज्याना प्राप्त होणारा वाटा भिन्न होता. याचा अर्थ राज्याच्या प्रगत व अप्रगत याप्रमाणे उत्पन्न वितरणात फारसा बदल झाला नाही. पाचव्या वित्त आयोगात लोकसंख्या आणि मागासलेपणा यावर जास्तीचा भर दिल्यामुळे, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार सारख्या राज्यांना अधिक लाभ झाला. महाराष्ट्र, पंजाब, हरियाणा सारख्या प्रगत राज्यांचे नुकसान झाले. सहाव्या वित्त आयोगाच्या काळात 5 टक्क्यां ने लोकसंख्येच्या निकषात कपात केल्यामुळे मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार, ओरिसा यांच्या हिश्शात घट झाली. सातव्या वित्त आयोगाने आपल्या नव्या निकषात दारिद्र्याचे प्रमाण, प्रतिव्यक्ती उत्पन्नातील अंतर यांना प्राधान्य दिल्यामुळे अप्रगत राज्यांच्या हिश्शात वाढ तर प्रगत राज्यांच्या हिश्शात घट झाली. आठव्या व नवव्या वित्त आयोगांनी सर्वाधिक प्राधान्य मागासलेपणाला दिल्यामुळे अप्रगत राज्यांना लाभ तर प्रगत राज्यांचे नुकसान झाले. दहाव्या वित्त आयोगाने 20 टक्के प्राधान्य कर प्रयत्नाला दिल्यामुळे प्रगत राज्यांना लाभ झाला. अकराव्या वित्त आयोगाने सरासरी प्रतीव्यक्ती उत्पन्नातील अंतर ह्या निकषांचे प्रमाण वाढवून कर प्रयत्न या निकषाचे प्रमाण निम्याने कमी केल्यामुळे उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश व इतर अप्रगत राज्यांच्या हिश्शात वाढ झाली. यामुळे महाराष्ट्र, तमिळनाडू, आन्ध्रप्रदेश व इतर प्रगत राज्यांचा हिस्सा कमी झाला.

उत्पन्न कर आणि केंद्रीय उत्पादन करापासून केंद्राच्या उत्पन्नातील राज्यांचा हिश्शाचे राज्यांना वाटप करतांना वित्त आयोगांनी प्रगत राज्यांच्या तुलनेत अप्रगत राज्यांना जास्त प्राधान्य दिले. पण बदलत्या निकषांमुळे काही वेळा प्रगत-प्रगत व अप्रगत-अप्रगत राज्यांच्या हिश्शातही तफावत झाल्याचे दिसून येते. वित्त आयोगांनी राज्यांना कर व करेत्तर उत्पन्न वाढविण्याची आणि योजनाबाह्य खर्च कमी करण्याची सूचना देखील केली.

**क) वित्त आयोगांच्या शिफारशी आणि महाराष्ट्र राज्य**

महाराष्ट्र राज्याची देशातील काही प्रगत राज्यांत गणना केली जाते. केंद्राला मिळणाऱ्या कर उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा सर्वाधिक आहे. केंद्राकडून महाराष्ट्राला मिळणारे साहाय्यक अनुदान व कर उत्पन्न विभागणी अंतर्गत मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण इतर प्रगत राज्यांच्या तुलनेत अल्प आहे.

तक्ता क्र.2

**केंद्रीय उत्पादन करापासून मिळणाऱ्या उत्पन्नातील घटक राज्यांचा हिस्सा**

| वित्तआयोग | केंद्रीय उत्पादन करापासून मिळणाऱ्या उत्पन्नातील राज्यांचा शेकडा हिस्सा | केंद्रीय उत्पादन करापासून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नातील घटक राज्यांच्या हिश्शाच्या वाटपाचे निकष |
|---|---|---|
| पहिला | 3 वस्तूंवरील शुल्काच्या 40% | 100 % लोकसंख्या |
| दुसरा | 8 वस्तूंवरील शुल्काच्या 25% | 90 % लोकसंख्या<br>10% क्षेत्रफळ |
| तिसरा | 35 वस्तूंवरील शुल्काच्या 20% | |
| चौथा | मूळ उत्पादन शुल्काच्या 20% | 80 % लोकसंख्या<br>20% - आर्थिक व सामाजिक मागासलेपणा. |
| पाचवा | वरीलप्रमाणे | 80% लोकसंख्या.<br>13.33% - दरडोई उत्पन्नातील तफावत.<br>6.67 % - मागासलेपणा. |
| सहावा | वरीलप्रमाणे | 75% - लोकसंख्या.<br>25% - प्रतिव्यक्ती उत्पन्नातील अंतर |
| सातवा | मूळ उत्पादन शुल्काच्या 40% | 25% - लोकसंख्या<br>25% - व्यस्त दरडोई उत्पन्न निकष<br>25% - दारिद्र्याचे प्रमाण.<br>25% - महसूल समानीकरण निकष |
| आठवा | मूळ उत्पादन शुल्काच्या 45% | 5% - तूट असलेल्या राज्यांसाठी ठेवून.<br>40% - ची विभागणी खालीलप्रमाणे<br>25% - लोकसंख्या<br>25% - व्यस्त दरडोई उत्पन्न निकष.<br>50% - दरडोई उत्पन्नातील तफावत. |
| नववा | वरीलप्रमाणे | 25% - लोकसंख्या<br>12.5 % - व्यस्त दरडोई उत्पन्न निकष<br>33.5 % - दरडोई उत्पन्नातील तफावत<br>12.5 % -उत्पन्न विनियोग.<br>16.5 % - योजनाबाह्य महसूल तूट निकष |
| दहावा | मूळ उत्पादन शुल्काच्या 47.5% | 20% - लोकसंख्या<br>60 % - दरडोई उत्पन्नातील तफावत<br>5 % - पायाभूत सुविधा.<br>5 % -क्षेत्रफळानुसार.<br>10 % - कर प्रयत्नानुसार |

स्रोत : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या बुलेटिन्सचे विविध अंक

विविध वित्त आयोगांच्या शिफारशींमुळे महाराष्ट्राला केंद्राकडून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या हिश्शात बदल झाल्यामुळे महाराष्ट्राला किती फायदा किंवा नुकसान झाले हे तक्ता क्र. 3 मध्ये दर्शविले आहे.

केंद्र सरकारने पहिल्या वित्त आयोगाच्या शिफारशीप्रमाणे प्राप्तिकर आणि केंद्रीय उत्पादन करातील राज्यांच्या हिश्शाचे जे वाटप केले त्यात महाराष्ट्राचा हिस्सा सर्वाधिक म्हणजे 18.50 टक्के एवढा होता. (पहा तक्ता क्र. 3) त्या खालोखाल उत्तरप्रदेश (15.75), तामिळनाडू (15.25) आणि पश्चिम बंगाल (11.25) याचा क्रमांक लागतो. पहिल्या वित्त आयोगानंतर केंद्राकडून राज्यांना मिळणाऱ्या उत्पन्नातील महाराष्ट्र राज्याचा हिस्सा सतत कमी कमी होत गेला त्याला फक्त चौथा वित्त आयोग अपवाद आहे. या आयोगाच्या शिफारशीमुळे महाराष्ट्राच्या हिश्शात 0.87 टक्के एवढी अल्प वाढ झाली कारण या आयोगाने 10 टक्के लोकसंख्या या निकषाला देण्यात येणारे प्राधान्य कमी केले. पहिल्या वित्त आयोगाच्या तत्त्वानुसार महाराष्ट्राचा हिस्सा 18.50 टक्के होता तो अकराव्या वित्त आयोगापर्यंत आयोगांच्या बदलत्या धोरणांमुळे 4.63 टक्के पर्यंत कमी झाला. देशातील कोणत्याच राज्याचा हिस्सा महाराष्ट्राच्या हिश्शासारखा सतत कमी झाला नाही. दहाव्या वित्त आयोगाच्या कार्यकाळात महाराष्ट्राचा केंद्राकडून वाटप होणाऱ्या कर उत्पन्नातील हिस्सा 6.13 टक्के होता तो अकराव्या वित्त आयोगाच्या

**तक्ता क्र.3**

**विविध वित्त आयोगांच्या निकषाप्रमाणे प्राप्तिकर व मध्यवर्ती उत्पादन कराच्या उत्पन्नातील महाराष्ट्राचा हिस्सा.**

| वित्त आयोग | महाराष्ट्राचा हिस्सा (टक्केवारीत) | हिश्शातील वाढ/घट (टक्केवारी) | हिश्शात बदल झाल्यामुळे झालेला लाभ अथवा नुकसान (कोटी रूपये) |
|---|---|---|---|
| पहिला | 18.50 | -- | -- |
| दुसरा | 15.97 | (-)2.53 | (-) 20.81 |
| तिसरा | 13.41 | (-)2.56 | (-) 27.33 |
| चौथा | 14.28 | (+)0.87 | (+) 11.55 |
| पाचवा | 11.34 | (-)2.94 | (-) 136.50 |
| सहावा | 11.05 | -0.29 | (-) 23.93 |
| सातवा | 10.95 | - 0.10 | (-) 19.30 |
| आठवा | 8.39 | - 2.56 | (-) 913.49 |
| नववा | 8.19 | - 0.20 | (-) 199.33 |
| दहावा | 6.13 | -2.06 | (-) 4250.67 |
| अकरावा | 4.63 | - 1.50 | (-)5644.77 |
| एकूण | - | -- | (-)11224.58 |

टीप - कर विभागणी रकमेच्या आधारावर परिगणना

निकषांमुळे 4.63 टक्के पर्यंत कमी झाला. म्हणजे दहाव्या आयोगाच्या तुलनेत 1.50 टक्क्याने राज्याचा हिस्सा कमी झाला. दहाव्या वित्त आयोगाच्या तुलनेत अकराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीमुळे आंध्रप्रदेश, तामिळनाडु, गुजरात, कर्नाटक यांच्याही हिश्शात घट झाली पण या सर्वांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्याच्या हिश्शातील घट जास्त आहकारण या आयोगाने कर प्रयत्न या निकषात 50 टक्के कपात केली.

केंद्राकडून वितरित केल्या जाणाऱ्या कर उत्पन्नातील महाराष्ट्राचा हिस्सा सातत्याने कमी झाल्यामुळे महाराष्ट्राला करोडो रूपयाचे आर्थिक नुकसान झाले. अकराव्या वित्त आयोगाच्या तत्त्वामुळे महाराष्ट्राच्या हिश्शात 1.50 टक्क्याने घट झाल्यामुळे महाराष्ट्राला केंद्राकडून वितरित केल्या जाणाऱ्या कर उत्पन्नातून 1.5 टक्के प्रमाणे 5644.77 कोटी रूपये कमी मिळणार आहेत. पहिला वित्त आयोग ते अकरावा वित्त आयोग या काळात आयोगांच्या धोरणात बदल झाल्यामुळे महाराष्ट्राचा हिस्सा कमी-कमी होत गेला, त्यामुळे आतापर्यंत महाराष्ट्राला 11224.58 कोटी रूपयाचे नुकसान झाले आहे. इतर राज्यांच्या तुलनेत हे नुकसान सर्वाधिक आहे.

**निष्कर्ष**

पहिल्या ते सातव्या वित्त आयोगांनी सर्वाधिक भार लोकसंख्येला दिला त्यामुळे जास्त लोकसंख्या असलेल्या राज्यांना या काळात लाभ झाला. आठव्या ते अकराव्या वित्त आयोगांनी करवसूली निकषात कपात करून 60% पेक्षा जास्त प्राधान्य प्रतिव्यक्ती सरासरी उत्पन्नातील अंतर या घटकाला दिले यामुळे अप्रगत राज्यांच्या हिश्शाते वाढ झाली. यावरून स्पष्ट होते की, वित्त आयोगांनी मागास राज्यांना जास्त हिस्सा मिळेल याची काळजी घेतली आहे. काही वित्त आयोगांच्या निकषांमुळे काही प्रगत व काही मागास राज्यांना लाभ झाला आहे. यावरून हे वित्त आयोग प्रगत किंवा अप्रगत राज्यांकडे पूर्णत: झुकले आहेत असे दिसत नाही. वित्त आयोगांनी प्राप्तिकर व केंद्रीय उत्पादन कर उत्पन्नातील राज्यांचा हिस्सा सतत वाढविला आहे. वित्त आयोगांच्या शिफारशी एकंदर मागास राज्यांच्या दृष्टिने हितकारक राहिल्या हे मागास राज्यांच्या वाढत्या हिश्शावरुन लक्षात येते. अकराव्या वित्त आयोगाच्या निकषामुळे महाराष्ट्राचा हिस्सा 1.5 टक्क्यांनी कमी झाल्यामुळे महाराष्ट्राला 5644.77 कोटी रूपये नुकसान होणार आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचा हिस्सा सतत कमी झाला आहे कारण करवसुली निकषाचे महत्त्व वित्त आयोगांनी जवळपास संपुष्टात आणले आहे. मागास राज्यांच्या विकासासाठी वित्त आयोगांनी मागासलेपणाला प्राधान्य द्यावे पण त्याचबरोबर कर वसुलीला देखिल प्राधान्य द्यावे. करवसुलीला प्राधान्य देऊन कर व करेत्तर उत्पन्न वाढविण्याची प्रेरणा राज्यांना देणे आवश्यक आहे.

**संदर्भ**

1. Bajpai A.D.N., Post - Reform Leading Issues of Indian Economy, Atlantic Publishers and Distributors, New Delhi-27,2002.

2. कुरूलकर र.पु. दहाव्या वित्त आयोगाचा अहवाल - एक आढावा, अर्थबोध, खंड-2,अंक-2, फेब्रुवारी 1997.

3. मिश्र आणि पुरी, भारतीय अर्थव्यवस्था, हिमालय पब्लिशिंग हाउस, मुंबई - 2001

4. विविध वित्त आयोगांचे अहवाल

5. Various Issues of Reserve Bank of India Bulletines.

●●●

# मानवी विकास : आशय आणि निष्पत्ती

● **मुक्ता जहागिरदार**
*प्रपाठक, शासकीय विदर्भ ज्ञानविज्ञान संस्था,*
*अमरावती.*

***(मराठी अर्थशास्त्र परिषद आणि एस. एन. डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कला, वाणिज्य व गृहविज्ञान महिला महाविद्यालय, जळगाव येथे दि. 13 फेब्रुवारी 2003 रोजी दिलेले भाषण)***

## 1. प्रस्तावना :

विकासाची सार्वत्रिक आकांक्षा हे 20व्या शतकाच्या उत्तरार्धापासून जगाचे व्यवच्छेदक वैशिष्ट्य बनलेले दिसते. विकास सुखी जीवनाची आवश्यक अट आहे. तो अनिश्चित भविष्याची तरतुद करतो. शीतयुद्धाच्या काळात तो देशाच्या श्रेष्ठत्वाचा दर्शक असू शकतो. आज जगात स्वत:चे वर्चस्व निर्माण करण्याचे प्रभावी अस्त्र म्हणूनही विकासाचा वापर होत आहे. विकासाकडे दुर्लक्ष करण्याची अंधुक शक्यता सुद्धा अतिशय संपन्न देशांबाबतही वर्तवता येत नाही. आर्थिक विकासाने आज विश्वात सध्याचा दर्जा प्राप्त केल्याचे हे सुस्पष्ट लक्षण आहे.

### 2. विकासाचा आशय व कारके

विकासाच्या यशस्वी प्रयत्नांसाठी विकासाच्या कारकांचा मागोवा हा अभ्यासकांच्या संशोधन आणि चिंतनाचा विषय असणे स्वाभाविक होते. भांडवलासारखा घटक प्रथमपासूनच मान्य झालेला आणि कायम महत्त्वाचा होता. नैसर्गिक संसाधने, तंत्रज्ञानासारखे घटकही ज्ञात होते. परंतु विकासाच्या कारकांचा शोध तेवढ्यावर थांबण्यासारखा नव्हता. नैसर्गिक संसाधन आदींची समानता असूनही निरनिराळ्या देशांच्या विकासात असमानता आढळून आली. त्यातील अज्ञात घटकांचा उलगडा निकडीचा वाटला. दुसऱ्या महायुद्धाच्या ओझ्याने उध्वस्त झालेल्या अर्थव्यवस्थेच्या पुनरुत्थानाचे प्रयत्न अनेक देशांनी केले. तथापि ही गोष्ट सगळ्याच देशांना जमली नाही. त्यामुळे विकासाच्या बलस्थानांचा शोध घेणे क्रमप्राप्त होते.

विकास ही देशाच्या एकूण वास्तविक उत्पन्नात वृद्धी घडवून आणणारी प्रक्रिया मानली गेली. त्यामुळे उत्पादन व उत्पादकतेतील वाढीच्या अनुषंगाने विचार झाला. प्रारंभी लोक विकासाबाबत भलतेच सश्रद्ध होते. विकास व त्याच्या परिणामांचे सुरम्य चित्र रेखाटले जाई. आपण विकासाची काळजी घ्यावी, विकास आपल्या सगळया आर्थिक, सामाजिक, समस्यांची काळजी घेईल हा ठाम विश्वास होता. विकासाचे लाभ समाजाच्या खालच्या थरापर्यंत

पाझरत जातील असा सिद्धान्तच होता. प्रत्यक्षात विकासाचे लाभ मर्यादित लोकांपर्यंतच पोहोचले. विकास ज्यावर उत्तर असल्याचे मानले गेले ते दारिद्र्य, विषमतादि प्रश्न सुटले नाहीत. त्यामुळे उच्च प्रतिव्यक्ती उत्पन्न मानवी कल्याणाची शाश्वती नसण्याचा अनुभव आला. एकूण विकासाच्या अज्ञात कारकांच्या शोधांची निकड आणि विकासाच्या निष्पत्तीच्या मर्यादा यामुळे एका बाजूने विकासाच्या कारकांचा शोध ही एक सातत्यपूर्ण प्रक्रिया ठरली. दुसऱ्या बाजूने विकासाची आशयघनता वाढवण्याचा, विकासाचे प्रयोजन सुस्पष्टपणे अधोरेखित करण्याचा तसेच विकास सर्वांपर्यंत पोहोचवण्याची क्लृती कोणती असू शकेल या परस्परात गुंतलेल्या प्रश्नांचा शोध चालू राहिला.

टी. डब्ल्यू. शुल्झ यांनी शिक्षण व उत्पादनातील संबंध विशद केला. डेनिसन, रॉबिन्सन, क्रुगर इ. अभ्यासकांनी भिन्न देशातील वृद्धीचे व त्यातील भिन्नतेचे स्पष्टीकरण शिक्षणातील भिन्नतेद्वारे मिळू शकत असल्याचे निदर्शनास आणले. जवळपास समान संसाधने असलेल्या देशात नैसर्गिक संसाधनांचे दोहन, भौतिक व वित्तीय संसाधनांची उपलब्धता आणि आंतर्राष्ट्रीय मदत यांची विकासातील भूमिका व महत्व मान्य करीत असतानाच कार्यक्षम व समर्पित मानवशक्ती सगळ्यात महत्वाची असल्याचा निष्कर्ष आर्थर लेविसने काढला. उच्च शिक्षण व विकास दरातील सहगामित्वावर मॅकलेलॅण्ड यांनीही अनुभवाश्रित अध्ययनाद्वारे प्रकाशझोत टाकला. देशाच्या आर्थिक विकासाची संभाव्यक्षमता त्यांच्या भौतिक संसाधन अभिदानाबरोबरच मानवी संसाधनाद्वारे प्रभावित होते हा वरील अभ्यासातून एकमुखी निष्कर्ष निघाला.

बेकारी, दारिद्र्यादि प्रश्न, मानवी संसाधनांचा अपर्याप्त विकास आणि न्यून वापर यांचा परिणाम असून मानवी क्षमतांचा विकास व वापर ही निकड असल्याचे लक्षात आले. गरिबांजवळ फक्त श्रम असतात. त्यांचे कौशल्य, कार्यक्षमता, उत्पादकता वाढली तरच त्यांचे उत्पन्न वाढू शकते. विकासात भागीदारी प्राप्त होऊ शकते. दारिद्र्य हे अनेक वंचनांचे प्रतिबिंब असून मानवी विकासातील प्रगतीचा अभाव वा मानवी विकासाची अपेक्षित पातळी गाठण्याबाबत अपयश यांचे दर्शक असल्याचे निदर्शनास आले. या सगळ्यातून विकास प्रक्रियेतील सशक्त आणि प्रभावी घटक म्हणून आणि विकास सगळ्यांपर्यंत पोहोचवण्याची क्लृप्ती म्हणूनही विकसित मानवी संसाधनांचे म्हणजेच मानवी क्षमतांचे महत्त्व सुस्पष्टपणे अधोरेखित झाले. यातून मानवी संसाधनाच्या विकासाची आणि मानवी विकासाची कल्पना उदयाला आली.

आर्थिक विकासाच्या विश्लेषणातही मानवी क्षमतांच्या विकासाला मध्यवर्ति स्थान मिळाले. विकासाच्या प्रक्रियेकडे क्षमतांच्या विस्ताराची प्रक्रिया या दृष्टीने बघितले पाहिजे असा विचार समोर आला. विकास म्हणजे क्षमतांचे संरचन असा अर्थ लावला गेला. मानवी क्षमतांच्या विकासासाठी तशी संधी समाजातील बहुसंख्य लोकांना, समाजातील दुर्बल वर्गाला सुद्धा प्राप्त झाली पाहिजे म्हणून विकासाचा विचार समाजातील लोकांना उपलब्ध संधीच्या विस्ताराच्या स्वरुपात करायला हवा असे ड्रेझ आणि अमर्त्य सेन यांनीही म्हटले. मानवी जीवनाची गुणवत्ता सुधारण्यातील, विकासाच्या लाभात वाटा मिळवण्यातील अपयश हे बहुधा संधींची कमतरता व विषमता यांच्याशी संबंधित असते म्हणून सामाजिक संधींचा विस्तार म्हणजे विकास असेही म्हटले गेले. विकासात संधींचा

विस्तार, प्रसार आणि प्रत्यय अभिप्रेत असल्याचे मानले गेले. संधींची उपलब्धता जितकी जास्त तितकी व्यक्तीला आपल्या क्षमतांच्या विकासाबाबत तसेच विकासाच्या फलनिष्पत्तीत सहभागी होण्याबाबत, पर्यायाने कल्याणाची साधने प्राप्त करण्याबाबत निवडीची संधी मिळू शकेल म्हणून विकास ही निवड वा चयन विस्ताराची प्रक्रिया मानली गेली.

### 3. मानवी विकास - संकल्पना आणि गाभा

निवडीची कक्षा विस्तारित करणे आणि कल्याण वा सुस्थिती प्राप्त करणे यांची सांगड हा मानवी विकास कल्पनेचा गाभा आहे. निवडीची कक्षा हा संसाधनाधारित विस्तार आहे तर कल्याणाच्या स्वरुपातील उपलब्ध उपयोगिताधारित विस्तार आहे. लोकांना त्यांच्या क्षमतांच्या विस्ताराची संधी मिळाली तर त्यांना हव्या असलेल्या, योग्य वाटणाऱ्या गोष्टींची निवड करता येईल. निवडीची विस्तारित कक्षा हा अशाप्रकारे मानवी क्षमतांचा विकास तसेच वस्तू, सेवांचे उत्पादन या अर्थाने आर्थिक विकास यांचा संयुक्त परिणाम आहे. त्यामुळे आर्थिक विकास आणि मानव विकास या दोन्ही निवड विस्ताराच्या प्रक्रिया मानल्या गेल्या. 1990 च्या संयुक्त राष्ट्राच्या मानवी विकास अहवालातही नेमकी मानवी विकास ही निवड विस्ताराची प्रक्रिया मानली आहे.

वस्तुतः आर्थिक विकासात मानवी संसाधनांचे, क्षमतांचे महत्त्व ही पूर्णतः नवीन कल्पना नाही. अगदी विल्यम पेट्टी पासून स्मिथ ,मार्शल, फिशर, बॅगहॉट, लिण्ट, वॉलरस. अशा अनेकाचा या संदर्भात उल्लेख करता येईल. मानवी घटक व त्याच्या अर्जित क्षमतांचा व कौशल्याचा भांडवलाचा घटक म्हणून स्मिथने विचार केला. मानवी भांडवलातील गुंतवणूक सर्वाधिक मूल्यवान असून, लोकांचे ज्ञान व कौशल्याचा विकास व प्रभावी वापर करु न शकणारा देश संपन्न होऊ शकणार नाही असे मार्शलने सुद्धा म्हटले आहे.

मानवी विकास संकल्पनेचे अलीकडच्या काळातील मूळ विसाव्या शतकाच्या सहाव्या दशकात मूलभूत गरजा निर्धारित करण्याच्या प्रयत्नात असल्याचे मानले जाते. हा दृष्टिकोन समाजातील सर्वांना सुस्थितीची मुलभूत साधने पुरवण्यावर भर देतो. महत्त्वाची बाब म्हणजे यात अन्य आवश्यक गोष्टींबरोबर आरोग्य आणि शिक्षणाचाही अन्तर्भाव आहे. पुढे 1980 च्या जागतिक विकास अहवालात 70 च्या दशकातील आर्थिक वृद्धीबाबत आणि दारिद्र्यात समाधानकारक घट न झाल्याबाबत असमाधान व्यक्त केले गेले. रोजगार वृद्धी, मुलभूत गरजांची पूर्ति, विषमतेत घट, गरीबांच्या उत्पादकतेत वाढ इ. वर म्हणजे मानवी क्षमतांचा विकास व वापरावर भर देणाऱ्या विकास व्यूहरचनेची शिफारस करण्यात आली. नंतरच्या काळात मानवी क्षमतांच्या विकासाच्या विचाराला वेगवान चालना मिळाली. त्यावर भरपूर विचार मंथन व लिखाण झाले. मानवी विकास मापनाचा प्रयत्न हा त्यातला अगदी अलीकडला एक महत्वाचा टप्पा मानता येईल.

मानवी विकासात मनुष्याच्या क्षमतांचा विकास अभिप्रेत आहे. त्यात श्रमशक्तीची सक्षमता, ज्ञान, कौशल्य, त्याची सर्जनशीलता, गुणवत्ता, विश्वास, मूल्ये, अभिवृत्ती, अभियोग्यता इ. चा अन्तर्भाव होतो. मानवी क्षमतांच्या विकासाबाबत मानवी संसाधन वा मानवी भांडवल विकास दृष्टिकोन आणि मानवी विकास दृष्टिकोन असे दोन दृष्टिकोन आहेत. पहिल्या दृष्टिकोनानुसार व्यक्तिला विकासाचे साधन मानल्या जाते. उत्पादन कार्यात उपयोगी

क्षमतांच्या विकासावर भर असून त्यासाठी होणारा खर्च मानवी भांडवलावरील गुंतवणूक मानला जातो. अर्थव्यवस्थेला मिळणाऱ्या प्रत्यायाचा विचार करुन ही गुंतवणूक केली जावी असे अपेक्षित आहे. या दृष्टिकोनान्तर्गत दोन प्रकारचे सिद्धांत मांडले गेले. मानवी भांडवल विकास सिद्धान्तकांच्या मते शिक्षण, प्रशिक्षण, आरोग्य, पोषण इ. वरील खर्चाच्या माध्यमातून व्यक्ती स्वत:मध्ये गुंतवणूक करतात. त्यामुळे त्यांची शारीरिक क्षमता तसेच कार्यकुशलता वाढते. अर्जनाचा कालावधीही वाढतो. वेतन संबंधन व उत्पादन फलन दोन्हीवर अनुकूल परिणाम होतो. विकासाला चालना मिळते. प्रचलित तंत्राचा कार्यक्षम वापर होणे यावर या सिद्धान्ताचा भर आहे. याच दृष्टिकोनान्तर्गत येणाऱ्या अन्तर्जात विकास सिद्धान्तानुसार शिक्षणादिमुळे प्रचलित तंत्राचा कार्यक्षम वापर तर होतोच परंतु त्यामुळे संशोधन व नवप्रवर्तनाला मिळणारी चालना, आणि त्यामुळे विकास झपाट्याने होणे ही बाब त्यांना जास्त महत्त्वाची वाटते. एकूण विकासाच्या दृष्टीने मानवी क्षमतांच्या साधनात्मक भूमिकेवर त्यांचा भर आहे.

मानवी क्षमतांच्या विकासाला महत्त्व देणाऱ्या मानवी संसाधन विकास आणि मानवी विकास या दोन्ही दृष्टीकोनानुसार शिक्षण आरोग्यादी साधनीभूत घटक समान आहेत तथापि मानवी विकास दृष्टीकोन आर्थिक विकासाला नाही तर व्यक्तीला केंद्रस्थानी मानतो. मनुष्याला विकासाचे साध्य मानतो. त्यामुळे विचाराधीन बाबींचे प्रयोजन बदलते आणि त्यांची कक्षा व्यापक होते. उदा. शिक्षणामुळे उत्पादकता वाढतेच परंतु मानवी विकास दृष्टीकोनात उत्पादकतेबरोबर सामाजिक न्यायाच्या दृष्टीने शिक्षण जास्त महत्त्वाचे मानले जाईल. आरोग्याच्या विचारात वैद्यकीय वा उपचारात्मक सुविधांबरोबर मूलभूत आरोग्य सेवांवर भर राहीला. महत्त्वाची बाब म्हणजे मानवी विकासाला साधनीभूत गोष्टी समाजाला उपलब्ध करुन देण्यासाठी होणाऱ्या खर्चावरील प्रत्याय त्यावर करावयाच्या खर्चाच्या समर्थनाचा महत्त्वाचा मुद्दा राहणार नाही.

मानवी विकास ही मानवाच्या निवडीची कक्षा व्यापक करण्याची तसेच व्यक्तीच्या कल्याणाची पातळी उंचावण्याची प्रक्रिया मानली जाते त्यामुळे कल्याणाची साधने सर्वांना उपलब्ध करुन देण्यावर या दृष्टिकोनाचा भर आहे. त्यासाठी निरक्षरता, रोगराई, अपमृत्यु, दारिद्र्य इ. मध्ये घट आणि भौतिक कल्याणात वाढ अभिप्रेत आहे. दर्जेदार शिक्षण, उपचार व आरोग्य सुविधा रोजगाराची उपलब्धता इ. द्वारे या गोष्टी साध्य होतील. मानवी विकासाबाबत सातत्यपूर्ण तसेच अधिकतम संभाव्य उपलब्धीची आकांक्षा असेल तर कल्याणाची साधने समाजातील सर्वांना पर्यायाने गरीबांना प्राप्य असणे अगत्याचे आहे. मानवी विकासाचे समर्थक त्यामुळे सामाजिक सेवांच्या विशेषत: सार्वजनिक सेवांच्या पुरवठ्याला महत्त्व देतात. त्यासाठी सार्वजनिक तरतुदीची भूमिका महत्त्वाची मानतात.

मानवी विकासाच्या संदर्भात सामाजिक सुरक्षिततेची आजची व्यापक संकल्पना अन्वर्थक ठरते. त्यात सामाजिक, आर्थिक विपत्तीच्या स्थितीत व्यक्तीला संरक्षणाची साधने पुरवणे अभिप्रेत आहे. तसेच किमान उत्पन्न टिकवून ठेवणेही अपेक्षित आहे. दारिद्र्यनिर्मूलनाचे प्रयत्न, शिक्षण, आरोग्यादी मूलभूत गरजांची व्यवस्था, उत्पादक साधन संपत्तीचे वितरण, रोजगार निर्मिती इ. चा त्यात अन्तर्भाव आहे. सार्वजनिक नीती व तरतुदीद्वारे याप्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या तरच क्षमतांच्या विकासाची व वापराची संधी त्यांना प्राप्य राहील अन्यथा, निरक्षरता,

अनारोग्य, दारिद्र्य हे सामाजिक वर्जनाचे प्रमाण वाढवून व्यापक मानवी विकासात अडसर निर्माण करेल. याचा अर्थ सामाजिक सुरक्षितता केवळ संरक्षणात्मकच नाही तर प्रोत्साहक स्वरुपात मानवी विकासाच्या संदर्भात अपेक्षित आहे. सामाजिक सुरक्षिततेचा पाठपुरावा सामाजिक साधनांद्वारे व्हावा असे अमर्त्य सेन आणि ड्रेझ म्हणतात तेव्हा त्यांना वरील बाबी अभिप्रेत आहेत.

वरील आशयाच्या अनुषंगाने मानवी विकास संकल्पना ही सबलीकरण आणि सहकार्य तसेच मूलभूत क्षमता व संधीबाबत न्याय, सातत्य आणि सुरक्षितता यांना सामाऊन घेते असे म्हटले जाते. संयुक्त राष्ट्रसंघ मानवी विकास संकल्पनेत लोकांच्या निवडीची कक्षा रुंदावण्यावर भर देतो तेव्हा ती मानवी विकास संकल्पनेचा मूलस्रोत असलेल्या मूलभूत गरजांच्या तसेच वरील आशयाच्याही पुढे जाते. व्यक्तीला क्षमतांच्या विकासाद्वारे कल्याणाची साधने-वस्तूसेवा- तर प्राप्त करावयाच्या आहेतच परंतु स्वत:क्षमतांच्या विकासाच्या स्वरुपातील उपलब्धी वा कार्यानुवर्तन निष्पत्ती (Functional achievement) प्राप्त करणे त्यात महत्त्वाचे मानले आहे.

### 4. मानवी विकासाचे मापन-विकास व वंचन निर्देशके

अर्थशास्त्रात मापनीयता नेहमी महत्त्वाची मानली गेलेली आहे. त्यामुळे मापनाचे प्रयत्न स्वाभाविक ठरतात. मानवी विकास अहवालाच्या स्वरुपात 1990 पासून संयुक्त राष्ट्रसंघाने विशिष्ट निर्देशकांच्या आधारावर मानवी विकास मापनाचा पद्धतशीर प्रयत्न केलेला आहे. त्यात सुधारणेची प्रक्रियाही चालू ठेवली आहे. जागतिक पातळीवर मानवी विकासाच्या दृष्टीने देशांचे क्रमांकन त्यात आहे. मानवी विकास ही एक व्यापक संकल्पना असल्यामुळे मानवी विकासाच्या मापनाकरिता तज्ज्ञ तसेच भिन्न क्षेत्रात काम करणाऱ्या आंतरराष्ट्रीय अभिकरणांनी अनेक निर्देशके सूचवली आहेत. पाच वर्षाखालील बालकांचा मृत्युदर, लिंगसापेक्ष निर्देशकात स्त्री सक्षमीकरण मापक, बालक कल्याण व त्यातील बदलाचा दर इ. ही त्याची काही उदाहरणे होत.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रतिपादनानुसार मानवी विकास ही निवड विस्ताराची प्रक्रिया आहे. या निवडी अनंत असू शकतील. त्या काळानुसार बदलतीलही. परंतु निवडीची संधी मिळण्यासाठी तसेच वापरणाऱ्यासाठी ज्या मूलभूत क्षमता आवश्यक आहेत. त्या लक्षात घेऊन आयुर्मान, साक्षरता वा शिक्षण आणि उत्पन्न हे तीन निकष आधारभूत मानून मानवी विकासाचे मापन केले आहे. आयुष्यमानाशिवाय संधी मिळण्याचा व वापरण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. आयुर्मान मुख्यत्वे चांगल्या आरोग्याचा परिणाम म्हणून आरोग्य निदर्शकांचा विचार महत्त्वाचा ठरतो. सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय उपचार सुविधा, पोषणाचा स्तर इ. चा त्यात समावेश होतो. ज्ञान कौशल्यादीमुळे संधींचे ज्ञान व वापर शक्य होतो. ज्ञान, कौशल्य, नवप्रवर्तनशीलता, संशोधनक्षमता, मूल्ये, अभिवृत्ती, अभियोग्यताही शिक्षणाद्वारे रुजवता व परिपोषित करता येतात. त्यामुळे शिक्षणाचा निकष महत्त्वाचा ठरतो. साक्षरता दर, शाळेत घालवलेली वर्षे, शैक्षणिक संस्था व शिक्षणावरील खर्च इ. चा त्यासाठी विचार करावा लागेल. वस्तुत: मानवी विकास निर्देशक हा जीवनाच्या गुणवत्तेचा पर्यायाने जीवनाच्या उत्पन्नेतर पैलूच्या मापनावर भर देणारे साधन मानले जाते. तथापि उत्पन्नाशिवाय कल्याणाची साधने प्राप्त करणे अवघडच. त्यामुळे उत्पन्नाचा निकष आवश्यक

आहे. दारिद्रय निर्मूलन, रोजगार संधींचा विस्तार इ. बाबी त्यात विचाराधीन असतील. मानवी विकासाबाबत उपलब्धींच्या अनुषंगाने वरील तीन निदर्शके मानवी विकासाचे मापन करण्यासाठी वापरली जातात. आयुर्मान, साक्षरता, आणि उत्पन्न या तीनही निर्देशकांबाबत किमान व कमाल प्रमाण ठरविण्यात आलेले आहे. आयुर्मान किमान 25 तर कमाल 85 वर्षे आहे. साक्षरतेबाबत या मर्यादा 0 (शून्य) व 100 आहेत. प्रतिव्यक्ती वार्षिक उत्पन्न किमान 100 डॉलर्स तर कमाल 40, 000 डॉलर्स ठरविण्यात आलेले आहे. कुठल्याही निदर्शकाच्या एखाद्या देशातील प्रत्यक्ष प्रमाणातून किमान प्रमाण वजा करायचे आणि येणाऱ्या मूल्याला कमाल व किमान मर्यादितल्या फरकाने भागायचे म्हणजे त्या निर्देशकाचा निर्देशांक मिळतो. प्रत्येक निर्देशकांचा निर्देशांक प्राप्त करुन त्यांची सरासरी म्हणजे मानवी विकास निर्देशांक होय.

मानवी विकासाच्या उपलब्धींचे अधिक वास्तववादी चित्र जाणून घेण्यासाठी मानवी विकासापासून, तत्संबंधित सुविधांपासून वंचित राहिलेल्यांचा विचार अधिक महत्त्वाचा आहे असे मानणारे मानवी विकास वंचन निर्देशकांची शिफारस करतात. मानवी विकास मापक निर्देशकेच त्यासाठी आधारभूत आहेत. आरोग्य वंचन, शिक्षण वंचन व उत्पन्न वंचनाचा निकष त्यासाठी वापरला जातो. निर्देशकाचे देशातील प्रत्यक्ष प्रमाण त्याच्या महत्तम वा कमाल प्रमाणातून वजा करायचे आणि येणाऱ्या मूल्याला कमाल व किमान प्रमाणाच्या अंतराने भाग द्यायचा म्हणजे त्या निर्देशकाच्या संबंधात वंचन निर्देशांक प्राप्त होईल. या प्रकारे प्रत्येक निर्देशकाचा निर्देशांक प्राप्त करुन त्यांची सरासरी काढली तर मानव विकास वंचन निर्देशांक प्राप्त होतो. मानवी विकासाच्या दृष्टीने शून्याजवळ जाणारा वंचन निर्देशांक तर, एक जवळ जाणारा विकास निर्देशांक चांगली स्थिती दर्शविल.

### 5. महाराष्ट्रातील मानवी विकास

महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या मानव विकास अहवाल 2002 च्या आधारावर मानवी विकासाच्या संदर्भात महाराष्ट्रातील प्रत्यक्ष स्थितीचा परामर्श घेता येईल.

मानवी विकासाच्या संदर्भात भारताचा क्रमांक संयुक्त राष्ट्र संघाच्या मानवी विकास अहवालानुसार 1997 साली 174 देशांमध्ये 135वा होता. त्यात सुधारणा होऊन 1999 मध्ये तो 126 वा झाला. 2001 मध्ये भारत 124 व्या क्रमांकावर आला. वस्तुतः भारताचा उत्पन्न वाढीचा दर असमाधानकारक नाही. ज्ञान कौशल्याच्या क्षेत्रातील आपले यश उल्लेखनीय आहे. विकसित देशात आमच्या देशातून गेलेल्या डॉक्टर, शास्त्रज्ञ, यंत्रज्ञ इ. ची संख्या मोठी आहे. क्रायोजेनिक इंजिन, परमसंगणक अणुस्फोट, उपग्रह, संरक्षणक्षेत्राशी संबंधित यशस्वी प्रयोग इ. ज्ञानाच्या क्षेत्रातील आपल्या यशाची प्रतिके आहेत यात शंकाच नाही.

आयुर्मान, मृत्युदर, विशेषतः बालमृत्युदर, साक्षरता, यासारख्या मानवी विकास निदर्शकाच्या आधारावर भारताची प्रगती चांगली आहे. महाराष्ट्र भारतातील एक प्रगत राज्य असल्यामुळे महाराष्ट्राच्या प्रगतीचा वेगही चांगला आहे. 1951 साली भारतातील सरासरी आयुर्मान फक्त 32 वर्षे होते. 2001 साली हे दुप्पट म्हणजे 64 वर्षे झाले. महाराष्ट्रात सरासरी आयुर्मान भारता एवढेच आहे. बालमृत्युदर 1951 मध्ये दर हजारी 146 होता तो 2001 मध्ये 70 पर्यंत घटला. महाराष्ट्रात तर तो फक्त 48 एवढा कमी आहे. भारताचा साक्षरतेचा दर 1951 मध्ये 16.7% होता तो 2001 मध्ये 65 पर्यंत

वाढला. महाराष्ट्रात तर तो 77% एवढा आहे.

मानव विकास निर्देशकाच्या आधारावर भारताची वाटचाल अगदीच असमाधानकारक नसली तरी मानव विकासाचा निःसंदिग्ध, वस्तुनिष्ठ आढावा घ्यायचा असेल तर विकास निर्देशकावरील संपूर्ण निर्भरता उपयोगाची नाही कारण वंचनेचे प्रमाण फार मोठे आहे. जगातील 1/3 निरपेक्ष दरिद्री लोक भारतात राहतात. भारतातील जवळपास 50% प्रौढ निरक्षर आहेत. मुलभूत आरोग्य सुविधापासून 135 दशलक्ष लोक वंचित आहेत. पिण्याचे सुरक्षित पाणी 266 दशलक्ष लोकांना उपलब्ध नाही.

महाराष्ट्र उत्पन्नाच्यादृष्टीने भारतात चौथ्या क्रमांकावर आहे. केरळ, पंजाब, तामीळनाडूसारख्या मोजक्याच मध्यम मानवी विकास गटात येणाऱ्या राज्यांपैकी ते एक राज्य आहे, तरी सुद्धा महाराष्ट्रातील चित्र दिलासादायक नाही.

विकास निर्देशकाच्या आधारे मानवी विकासाला आवश्यक असलेल्या सुविधांमध्ये ज्यांना वाटा मिळालाच नाही ते देखील या सुविधांच्या विकासाचे लाभार्थी आहेत असा आभास सामान्य लोकांमध्ये निर्माण होतो. मात्र सत्य परिस्थितीचे अधिक चांगले आकलन होण्यासाठी वंचन निर्देशकांच्या आधारावर मानवी विकास स्थितीचा मागोवा घेणे उचित ठरते.

**(अ) आरोग्य वंचन**

चांगले आयुर्मान हे आरोग्याचा परिणाम मानले पाहिजे. वैद्यकीय सुविधा, पिण्याचे सुरक्षित पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, झोपडपट्टीवासीयांचे प्रमाण, आजारपणाचा दर, किमान पोषण पातळी इ. च्या अनुषंगाने आरोग्याचा विचार करता येईल.

झोपडपट्टीत मुलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे अनारोग्य हा स्वाभाविक परिपाक मानता येईल. महाराष्ट्रात 10.6 दशलक्ष लोक झोपडपट्टीत राहतात. महाराष्ट्राची लोकसंख्या 9.37 कोटी आहे. म्हणजे एकूण नागरी लोकसंख्येच्या जवळपास 28% लोकसंख्या झोपडपट्टीत राहते. मुंबई उत्पन्नाच्या दृष्टीने महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकावर आहे. परंतु तेथील 49% जनता महाराष्ट्राच्या 2002च्या मानव विकास अहवालानुसार झोपडपट्टीत राहते. इतर काही प्रांतांच्या राजधानीतील झोपडपट्टीवासियांच्या प्रमाणाशी तुलना केली तर हे प्रमाण तुलनात्मक दृष्ट्या सुद्धा फार जास्त असल्याचे दिसते. बंगालची राजधानी कोलकाता एक बकाल शहर मानले जाते. परंतु तेथील 33% जनताच झोपडपट्टीत राहते. चेन्नईत हे प्रमाण 26% आहे. दिल्लीत हे प्रमाण 19% आहे तर बंगलोरमध्ये झोपडपट्टीत राहणाऱ्यांचे प्रमाण केवळ 8% आहे.

अनारोग्यता दर हा शिक्षण, उत्पन्न, पोषण अशा अनेक घटकांवर अवलंबून असतो. पंधरवाडा प्रत्यावर्तन कालावधिसाठी Two week recall period अनारोग्यता दर नागरी भागात दर हजारी 48 तर ग्रामीण भागात 52 आहे. आजारपणाचे एक कारण म्हणजे ॲनिमियाचे प्रमाण जास्त असणे हे होय. विशेषतः स्त्रियांमध्ये व बालकांमध्ये 15 ते 49 या वयोगटातील विवाहित स्त्रियांमध्ये ॲनिमियाचे प्रमाण नागरी क्षेत्रात 44.8% तर ग्रामीण भागात ते 51.2% आढळून आले. न्यूनपोषण हे त्याचे महत्त्वाचे कारण आहे.

पोषणाच्या दृष्टीने प्रत्येक व्यक्तीला किमान 2700 उष्मांक मिळायला हवेत. उत्पन्नाच्या दृष्टीने महाराष्ट्राचा भारतात चौथा क्रमांक आहे. परंतु हे उच्च उत्पन्न वास्तविक उपभोगातील वृद्धित प्रतिबिंबित झालेले नाही. किमान आवश्यक पोषण पातळीच्या वर असणाऱ्यांचे प्रमाण असल्याचे अहवालात नमूद केले आहे . निम्म्याहून अधिक लोकसंख्या न्यूनपोषित

आहे. नागरी क्षेत्रात न्यूनपोषितांचे प्रमाण 54.8% तर ग्रामीण क्षेत्रात ते 57.4% आहे.

ग्रामीण क्षेत्रात 54% लोकांना पिण्याचे सुरक्षित पाणी उपलब्ध नाही. सांडपाण्याची व्यवस्था 75% शहरांना उपलब्ध आहे. या संदर्भात खेडी या अहवालात अनुल्लेखित आहेत.

मानवी विकासावर परिणाम करणाऱ्या आरोग्य शिक्षणादी सुविधा समाजातील जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यात सार्वजनिक व्ययाचे योगदान विशेष महत्त्वाचे असते. आरोग्य सुविधांवर होणाऱ्या सार्वजनिक खर्चाचे प्रमाण घटत गेलेले दिसते. राज्याच्या एकूण खर्चाशी आरोग्यावरील खर्चाचे प्रमाण 1980च्या दशकात 6.5% होते ते 1998-99 मध्ये 4.6% पर्यंत घटले आहे. हा कल आरोग्य वंचनाचे प्रमाण वाढवायला कारणीभूत ठरेल असे अनुमान काढणे सहज शक्य आहे. शासनाने अहवालातच तशी कबुली दिलेली असून याचा दीर्घकालीन विकासावरील प्रतिकूल परिणामाची शक्यता मान्य केलेली आहे.

### (ब) शिक्षणवंचन

राज्यात शिक्षणाबाबत वैपुल्य आणि दारिद्र्य, विकास आणि वंचन असे संमिश्र चित्र असल्याचे म्हटले आहे. शैक्षणिक संधींचा विस्तार डोळ्यात भरण्यासारखा असला तरी शिक्षणाच्या दर्जाबाबत निष्कर्ष काढणे अवघड असल्याचे नमुद करण्यात आले आहे. एक शिक्षकी शाळा, वर्ग खोल्या व इतर आवश्यक साधनसामुग्रीची कमतरता, शिक्षकांच्या रिक्त जागा इ. त्रुटी मान्य आहेत. सार्वजनिक खर्चात शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण घटत गेलेले आहे. विशेषत: सामाजिक संधीमध्ये घट हा त्याचा एक महत्त्वाचा अपरिहार्य परिणाम असेल.

आरोग्याप्रमाणे शिक्षणाबाबतही विषमतेची समस्या सुस्पष्टपणे जाणवते. मुंबई जिल्ह्याच्या सरासरी साक्षरता दर 86.82% आहे तर नंदुरबार जिल्ह्याचाच नागरी साक्षरता दर महाराष्ट्रात सगळ्यात कमी 56.06% आहे. साक्षरता दरातील दोन जिल्ह्यात असणारे 30.76% चे अंतर निश्चितच फार जास्त आहे. नंदुरबार जिल्ह्याचाच नागरी साक्षरता दर 80.27% तर ग्रामीण साक्षरतादर 51.40% एवढा आहे. एकाच जिल्ह्याच्या नागरी व ग्रामीण भागातील साक्षरतेत जवळपास 29% एवढा फरक मानवी विकासाच्या संधीबाबत ग्रामीण क्षेत्राच्या वंचनेचा दर्शक मानावा लागेल.

### (क) उत्पन्न वंचन

उत्पन्न वंचनाच्या संदर्भातील परिस्थिती फारशी वेगळी नाही. भारतातील 26% लोक निरपेक्ष दरिद्री आहेत. महाराष्ट्रात 25.02% लोक दरिद्र्यरेषेखाली आहेत. दरिद्र्याबाबत भिन्न जिल्ह्यांमधील विषमता फार जास्त आहे. मुंबई, रायगड, कोल्हापूर, ठाणे सारखे काही मोजके जिल्हे सोडले तर इतरत्र दारिद्र्याचे प्रमाण बरेच जास्त आहे. मुंबई, रायगड जिल्ह्यात दारिद्र्याचे प्रमाण 10% आहे तर धुळे जिल्ह्यात हे प्रमाण 50% आहे. राज्यात ग्रामीण भागातील दारिद्र्याच्या प्रमाणातही मोठी तफावत आहे. सरासरी उपभोगाच्या आधारावर काढलेले ग्रामीण भागातील दारिद्र्याचे प्रमाण ठाणे जिल्ह्यात फक्त 8.29% आहे तर अकोला जिल्ह्यात हे प्रमाण 45.57% एवढे जास्त आहे.

दारिद्र्यनिर्मूलनासाठी रोजगार महत्त्वाचा आहे. तो नियमित व किमान उत्पन्नाची शाश्वती देणारा असला पाहिजे. तरच उत्पन्न वंचनाचे प्रमाण कमी होण्याची प्रवृत्ती राहील. रोजगार हमी योजनेसारखी वैशिष्ट्यपूर्ण योजना महाराष्ट्रात सुरु आहे. इतर कार्यक्रमांद्वारेही असे प्रयत्न होतात. तरी

सुद्धा रोजगारातील अस्थैर्य वाढलेले आहे. निर्माणी क्षेत्राचा रोजगारातील हिस्सा घटत आहे. अनौपचारिक क्षेत्र रोजगाराचा महत्त्वाचा स्रोत बनले आहे. 1990 ते 98 या दरम्यान निर्माण क्षेत्राचा रोजगारातील हिस्सा 24% वरुन 18% पर्यंत घटला तर अनौपचारिक क्षेत्राचा हिस्सा 52% वरुन 59% पर्यंत वाढला आहे. अर्धरोजगार आणि कमी उत्पन्न अनौपचारिक क्षेत्रातील रोजगारीची खास वैशिष्टचे असल्यामुळे उत्पन्न वंचनाचे प्रमाण वाढले असणार यात शंका नाही. विसाव्या शतकात दारिद्रयाचे प्रमाण घटलेले असले तरी दारिद्रय ही आजची सगळ्यात मोठी समस्या आहे आणि जागतिक दबावामुळे संपूर्ण जगात दारिद्रय वाढण्याची शक्यता आहे'' हे संयुक्त राष्ट्रसंघाच्या 1997 च्या मानव विकास अहवालातील विधान महाराष्ट्रात वरील प्रकारे प्रत्ययाला आलेले जाणवते हे खरे. सार्वजनिक व्ययात घट झाल्यामुळे समाजातील दुर्बल धटकांना विकासाची संधी व सुविधा कमी प्रमाणात उपलब्ध होती. रोजगार संधींच्या वाढीचा दरही घटता आहे. त्यामुळे उत्पन्नवंचनाचा कल याच पद्धतीचा राहील असे अनुमान निघते.

### 6. मानवी विकास - मर्यादा व भावी शक्यता

मानवी विकासाबाबत वंचनेचे उल्लेखनीय प्रमाण आढळण्यात विषमतेचा अभिशाप हे अत्यंत महत्त्वाचे एक कारण आहे. विभाग निहाय, जिल्हानिहाय, ग्रामीण नागरी क्षेत्र, स्त्री पुरुष, इ.च्या अनुषंगाने ही विषमता प्रत्ययास येते. त्यामुळे मानवी विकासाची समस्या दिसते त्यापेक्षा अधिक गंभीर आहे. महाराष्ट्रात भिन्न पातळीवर आढळून येणारी तीव्र असमानता अहवालात शासनानेही मान्य केलेली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे मानव विकास निर्देशांकात सरासरीवर भर देताना ती वाढवण्यासाठी विषमतेकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली परिस्थितीही असमानता वाढविण्यास पोषक ठरली आहे.

इ.स. 1990 पासून मानवी विकास मापनाचे प्रयत्न होत आहेत. मापनीयतेला अर्थशास्त्रात विशेष महत्त्व आहे. मापनाशिवाय आपण नेमके कुठे आहोत ते कळणे अवघड असते. तथापि मापनीयतेला महत्त्व देताना साध्यांऐवजी साधने विवेचनाचा केंद्रबिंदू बनतात. तसेच गणनक्षम घटकांचे महत्त्व वाढून महत्त्वाची परंतु मापनीय नसलेली गुणात्मक बाजू उपेक्षित राहते. अनौपचारिक क्षेत्राचा रोजगारातील वाढता हिस्सा, परिणामत: रोजगाराचे अस्थैर्य, स्त्रियांमधील वाढते दारिद्रय, सार्वजनिक खर्चात कपात केल्याने दुर्बल वर्गांकरिता विकास संधी मर्यादित होण्याचा कल इ. मानवी विकासाच्या गुणात्मक बाजूत दुर्बलता निर्माण करणाऱ्या गोष्टींकडे प्रकर्षाने लक्ष वेधले गेलेले दिसत नाही. मानव विकासाची वस्तुस्थिती आणि भावी प्रवृत्तीच्या विचारात जागतिकीकरणाची पार्श्वभूमी अटळ आहे. जागतिकीकरण ही सर्वस्पर्शी बाब आहे. त्यातून घडून आलेले व घडवून आणलेले बदल मूलगामी स्वरुपाचे आहेत. विकासावर तिचा परिणाम जाणवणे स्वाभाविक आहे. कारण मानवी विकास हा शेवटी देशाच्या आर्थिक भौतिक आधारांशी निगडित आहे. तसाच मानवी क्षमतांच्या सुधारणा व वापरासाठी हितकर, असून अनुकूल सामाजिक वातावरणावर तो निर्भर आहे. भौतिक सोईमधील सुधारणा, साथीच्या रोगांवर मात, औषधोपचारांची उपलब्धता, काहींचे वेगाने वाढणारे उत्पन्न इ. मुळे मानव विकास निर्देशांकात सुधारणा होण्याची शक्यता निश्चितच आहे. तथापि वंचनाने प्रमाण कमी करण्याची गती मंदावण्याची शक्यता आहे.

जागतिकीकरण बाजार व्यवस्थेवर अधिष्ठित आहे. या व्यवस्थेत सर्व आर्थिक घटक स्वतंत्र आहेत. उपभोक्ता तर सार्वभौम आहे. फक्त उत्पादकाला लाभप्रद वाटेल एवढ्या प्रभावीपणे उपभोक्त्याला आपली मागणी बाजारात नोंदवता आली पाहिजे. अर्थात त्याच्याजवळ विपुल क्रयशक्ती असावी लागते. अन्यथा बाजार व्यवस्था त्याची नोंदही घेत नाही. उत्पादकाच्या बाजूने लाभ हा प्रेरणास्रोत आहे. अधिकाधिक कार्यक्षम तंत्राचा आग्रह ही त्याची परिणति आहे. परिणामत: भांडवल प्रत्यक्षपणे आणि अधिकाधिक आक्रमकपणे श्रमाशी संघर्षशील बनते अतिरिक्त उत्पादन आणि अतिरिक्त श्रम ही व्यवस्था सातत्याने निर्माण करते. याचा अर्थ एका बाजूने क्रयशक्ती नसणाऱ्यांची नोंद न घेणारी तर दुसऱ्या बाजूने क्रयशक्ति नसणाऱ्यांची संख्या वाढविणारी ही व्यवस्था असल्यामुळे मानवी विकास वंचनाचे प्रमाण घटवण्याच्या दृष्टिने तिच्यात अंगभूत प्रतिकूलता आहे. मानवी कल्याण हा या व्यवस्थेच्या कार्यक्रमपत्रिकेवर असू शकणारा विषयच नाही.

जागतिकीकरणात राज्याचे उत्पन्न व खर्च दोन्ही कमी करण्याचे धोरण आहे. शासनाचा आर्थिक क्षेत्रातील सहभाग न्यूनतम करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न आहेत. याशिवाय विकसनशील देशातील बाजारावर, संसाधनांवर, श्रमांवर श्रीमंत देशांचे, बहुराष्ट्रीय उत्पादन संस्थांचे, आंतरराष्ट्रीय भांडवलाचे वर्चस्व असताना मानवी विकास प्रोत्साहित करण्याबाबत राष्ट्र राज्याची क्षमता कमी होत जाईल.

**7. समारोप**

लोकांचे ज्ञान व कौशल्याचा विकास व प्रभावी वापर करु न शकणारा देश संपन्न होऊ शकणार नाही असा मार्शलचा निर्वाळा होता. कार्यक्षम व समर्पित मानवी शक्ती विकासात सर्वात महत्त्वाचा घटक असल्याचा आर्थर लेविसचा निष्कर्ष होता. बेकारी दारिद्र्यादि प्रश्न मानवी संसाधनांचा अपर्याप्त विकास आणि न्यून वापर यांचा परिणाम असल्याचा अभ्यासकांचे प्रतिपादन होते. दुसऱ्या बाजूने निवडीची कक्षा विस्तारित करणे आणि कल्याण यांची सांगड हा मानवी विकास कल्पनेचा गाभा असून मानवी क्षमतांचा विकास व कार्यांच्या विस्ताराद्वारे तो साध्य होतो हे सर्वमान्य तथ्य आहे. परंतु नफ्याला परमोच्च महत्त्व देणारी जागतिकीकरणाची व्यवस्था समाजाच्या विकासासाठी समर्पित मानवी शक्तीही निर्माण करु शकत नाही आणि मानवी क्षमतांच्या महत्तम वापराचे लक्ष्यही ठेवू शकत नाही. या अन्तर्विरोधी स्थितीतून भारतासारखे देश मार्ग काढण्याचे कौशल्य कसे दाखवतात ते बघायचे.

●●●


**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**अर्थमीमांसा–वैज्ञानिक की कलात्मक ?**

**नी.वि. सोवनी**

**किंमत रु. 250(सूट 10 टक्के)**

अर्थशास्त्राच्या पदवी आणि पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक यांना उपयुक्त संग्राह्य ग्रंथ.

**मिळण्याचे ठिकाण**

**डॉ. व्यं.सु. पाटणकर, फ्लॅट क्र.1, कपिल अपार्टमेंट्स सर्व्हे क्र.29, तेजस सोसायटीजवळ, कोथरूड, पुणे - 29**

# अर्थशास्त्रातील नोबेल - 2002

● **अनिल वर्तक**
*अधिव्याख्याता, सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे.*

**अर्थ**शास्त्रात मान्यता प्राप्त होत असलेल्या दोन शाखांमध्ये भरीव कामगिरी करणाऱ्या तज्ज्ञांना 2002 या वर्षीचे नोबेल पारितोषिक प्रदान करून नोबेल समितीने या विषयाच्या वाढत्या महत्त्वाची दखल घेतली आहे. पारंपरिक अर्थशास्त्रीय सिद्धांत म्हणजे व्यक्तींचे अर्थविषयक निर्णय लाभाच्या हेतूने प्रेरित झालेले असतात व व्यक्ती विवेकी (rational) निर्णय घेऊ शकतात या गृहीतावर आधारलेले होते. तसेच अर्थशास्त्रात नैसर्गिक शास्त्रांप्रमाणे प्रयोगशाळेमध्ये नियंत्रित परिस्थितीत प्रयोग करता येत नाही व खगोलशास्त्र किंवा हवामानशास्त्राप्रमाणे प्रत्यक्षातील आकडेवारीवरच अवलंबून रहावे लागते असा समज होता. परंतु अलिकडच्या काळात प्रायोगिक अर्थशास्त्र (Experimental Economics) या विषयावर बरेच संशोधन होत असून त्यातील निष्कर्षांचा विचार केला तर अर्थशास्त्रातील मूलभूत तत्त्वेच आपणांस बदलावी लागतील असे वाटते.

अशा अपरिचित शाखांमध्ये संशोधन केल्याबद्दल व्हर्नॉन स्मिथ (Vernon Smith) व डॅनिअल काहनेमन (Daniel Kahneman) या दोघा अर्थशास्त्रज्ञांना या वर्षीच्या नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.

**व्हर्नॉन स्मिथ**

1927 साली कन्सास राज्यातील विचीता या गावी व्हर्नॉन स्मिथ यांचा जन्म झाला. विचीता गावाजवळील एका लहानशा शेतावर बालपण गेलेल्या स्मिथ यांनी महामंदीचा काळ अनुभवला या काळात त्यांच्या कुटुंबाची परवड झाली.

1943 मध्ये प्रतितासी 60 सेन्टस अशा पगारावर बोइंग कंपनीत नोकरीस लागलेल्या व्हर्नॉन स्मिथ यांनी शालेय शिक्षणदेखील चालूच ठेवले. 1945 साली त्यांनी कॅलिफोर्निया इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी येथून इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग या विषयात बी.एस. ही पदवी संपादन केली. त्यानंतर कन्सास विद्यापीठातून 1951 साली अर्थशास्त्रात एम.ए. ही पदवी त्यांनी प्राप्त केली. 1955 साली हार्वर्ड विद्यापीठातून पीएच.डी. संपादन केल्यावर परड्यू विद्यापीठात ते शिकवण्यासाठी रूजू झाले.

परड्यू विद्यापीठातच त्यांना असे लक्षात

आले की विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष बाजारातील व्यवहार कसे पार पडतात व त्याच्या प्रेरणा काय असतात हे प्रयोगाच्या साहाय्याने दर्शविता येईल. चेंबर्लीनने केलेल्या प्रयोगांपासून सुरुवात करून त्यात सुधारणा करून त्यांनी प्रायोगिक अर्थशास्त्राला एक स्वतंत्र शाखेचा दर्जा प्राप्त करून दिला.

स्मिथ यांनी भांडवल सिद्धांत, वित्त, नैसर्गिक साधनधन अर्थशास्त्र अशा विविध शाखांमध्ये काम केलेले असले तरी प्रायोगिक अर्थशास्त्र या शाखेतील त्यांचे काम महत्त्वाचे आहे. या शाखांमध्ये त्यांनी सुमारे 200 लेख व पुस्तके प्रकाशित केली आहेत. अमेरिकन इकॉनॉमिक रिव्हयू, जर्नल ऑफ रिस्क ॲंड अनसरटन्टी अशा अनेक नामवंत नियतकालिकांच्या संपादक मंडळावर सदस्य म्हणून काम करीत आहेत.

पंच्याहत्तर वर्षांचे व्हर्नॉन स्मिथ व्हर्जिनियातील जॉर्ज मॅसन विद्यापीठातील आंतरशाखीय विभागात कार्यरत आहेत. अर्थशास्त्रातदेखील परिस्थिती नियंत्रित करून प्रयोग करता येऊ शकतात व नैसर्गिक शास्त्रांप्रमाणे प्रयोगातून काढलेल्या निष्कर्षांचा उपयोग प्रत्यक्ष व्यवहारांसंबंधी निर्णय घेताना होऊ शकतो हे स्मिथ यांनी गेल्या 50 वर्षांपासून विविध प्रयोगांच्या माध्यमातून सिद्ध करून दाखविले.

स्मिथचे सर्वात महत्त्वाचे काम बाजारयंत्रणेसंबंधी आहे. नाविन्यपूर्ण अशा प्रयोगांद्वारे त्याने या विषयातील संशोधनाचा पाया रचला. त्यातले काही प्रमुख प्रयोग म्हणजे (1) स्पर्धायुक्त बाजार (स्मिथ 1962),(2) निरनिराळ्या प्रकारच्या लिलावांची चाचणी (स्मिथ 1965,1976,1980) आणि (3) प्रलोभित मूल्य पद्धतींचे (induced value method) संकल्पचित्र.

प्रायोगिक अर्थशास्त्रातील पहिल्या शोधनिबंध लिहिण्याचे श्रेय स्मिथ यांना आहे. हा निबंध लिहिण्याची प्रेरणा त्यांना हार्वर्ड विद्यापीठातील चेंबरलीन यांच्या प्रयोगातून मिळाली. चेंबरलीनच्या प्रयोगात, भाग घेणाऱ्या व्यक्ती जोडी-जोडीने सौदा (Pairwise bargaining) करतात. स्मिथला असे लक्षात आले की प्रयोगाचे स्वरूप जर प्रत्यक्ष व्यवहारातील बाजाराच्या स्वरूपाच्या जवळपास असते तर चेंबर्लीन यांचे निष्कर्ष अधिक निश्चित स्वरूपाचे (compelling) आले असते.


चेंबर्लीनच्या प्रयोगातील त्रुटींचा विचार करून त्याने आपल्या प्रयोगाची आखणी निश्चित केली. प्रयोगातील व्यक्तिंची संभाव्य विक्रेते व संभाव्य खरेदीदार (Potential buyers and sellers) अशी विभागणी करून, अनेक वस्तूंच्या बाजारात व वित्तिय बाजारात वापरली जाणारी दुहेरी मौखिक लिलाव पद्धत त्यांनी वापरली. प्रजाजनांना (Subjects) त्याने स्वैररित्या (randomly) खरेदीदार व विक्रेता अशा भूमिका दिल्या. प्रत्येक ग्राहक व विक्रेत्याला वस्तुंचे एक एक नग दिले व खरेदीची कमाल किंमत (W) तसेच विक्रीची किमान किंमत (V) ठरवायला सांगितले, ही विक्रेता राखीव किंमत (reservation price) इतर ग्राहकांना किंवा विक्रेत्यांना ज्ञात नव्हती. प्रत्यक्षातील किंमत (P) कमाल खरेदी किंमतीपेक्षा (W) कमी असेल तर (W-P) हा ग्राहकाचा फायदा व प्रत्यक्षातील किंमत (P) किमान विक्री किंमतीपेक्षा जास्त असेल तर (P-V) हा विक्रेत्याचा फायदा. ग्राहकाला W पेक्षा जास्त किंमतीला खरेदी करायला व विक्रेत्याला V पेक्षा कमी किंमतीला विकायला परवानगी नव्हती.

संभाव्य खरेदीदार व विक्रेत्यांनी दिलेल्या या विक्रेता राखीव किंमतीच्या (reservation price) माहितीनुसार स्मिथने मागणी व पुरवठा वक्र काढला (आकृति 1- डावीकडील भाग). मागणी व पुरवठा

वक्रांच्या छेदनबिंदुपाशी त्याला स्पर्धायुक्त बाजारातील समतोल किंमत मिळाली (सैद्धांतिक किंमत). अर्थात भाग घेणाऱ्या व्यक्तिंना ही सर्व माहिती नव्हती आणि त्यामुळे समतोल किंमतीची कल्पना त्यांना नव्हती.

स्मिथने नंतर जो प्रयोग केला त्यात ग्राहकांना व विक्रेत्यांना प्रत्यक्ष बोली लावावयास सांगितले व ज्या वेळी ग्राहकांच्या व विक्रेत्यांच्या बोलीत समानता येई त्यावेळी वस्तुंचा व्यवहार पार पडत असे. अशा प्रकारे व्यवहार (Transactions) केल्यावर स्मिथला असे लक्षात आले की प्रयोगातून आलेली समतोल किंमत, सैद्धांतिक किंमतीच्या आसपास आहे. हाच प्रयोग पुन्हा पुन्हा केल्यावर स्मिथला असे लक्षात आले की प्रत्येक पुढचा प्रयोग प्रत्यक्ष व्यवहारात झालेल्या किंमतीच्या वाटपातील प्रमाण विचलन (Standard Deviation) कमी होत गेले आहे (आकृति 1 उजवीकडील भाग) प्रयोगाच्या प्रत्येक टप्प्यात प्रजाजन (subject) हे शिकल्यामुळे हे घडले.

लिलाव (Auction) हा बाजाराचा प्रकार प्रामुख्याने कच्चा माल, रोखे बाजार व इतर वित्तीय साधनांच्या बाबतीत प्रामुख्याने आढळतो. अलिकडच्या काळात अनेक शासकीय उद्योगांचे खाजगीकरण करताना या बाजाराच्या प्रकाराचा अवलंब केला जात आहे. परंतु खाजगीकरणासाठी सुचविण्यात आलेली लिलावाची पद्धत अत्यंत गुंतागुंतीची असल्यामुळे निष्कर्ष काय येतील याचा आगाऊ अंदाज बांधणे खूप अवघड असते. लिलावाचे देखील अनेक प्रकार आहेत. आर्थिक सिद्धांताद्वारे लिलावाच्या निरनिराळ्या प्रकारात काय निष्कर्ष निघू शकेल याचा अंदाज बांधता येतो. परंतु हे अंदाज आपणांस प्रत्यक्ष व्यवहारात तपासून बघता येत नाहीत. स्मिथने केलेल्या प्रयोगाद्वारे हे अंदाज त्याला पडताळून पहाता आले आणि लिलावाचा




(आकृति1)

प्रकार व सरासरी विक्री किंमत यांच्यात निश्चित असा संबंध त्याला आढळून आला.

ऑस्ट्रेलियातील उर्जाबाजाराचे खाजगीकरण करताना स्मिथने सुचविलेल्या प्रयोगांचा खूप प्रभावीपणे उपयोग करण्यात आला. विमानतळावर विमान उड्डाण व प्रस्थानाच्या वेगवेगळ्या वापरण्याच्या वेळेच्या बाबतीत (airtime slots) तसेच अन्य अनेक ठिकाणी धोरण आखण्यासाठी या तंत्रांचा उपयोग होऊ शकतो. नियंत्रित प्रयोग करून त्याचा उपयोग धोरण आखण्यासाठी होऊ शकतो.

या प्रयोगातील अडचण अशी की प्रत्यक्ष व्यवहारातील किंमतीचे आकारमान (magnitude) व प्रयोगशाळेमध्ये देऊ केलेल्या किंमती यांच्यात खूप फरक असतो तसेच निवडलेल्या व्यक्तींना जरी आपण विशिष्ट भूमिका देऊ केल्या तरी त्यांचे वैयक्तिक कल/अग्रक्रम, कळत-नकळतपणे त्यांच्या निवडीतून प्रकट होत असतात. हे कल कसे काढून टाकावेत तसेच प्रयोग निष्पक्षपणे (unbiased) होण्यासाठी कोणत्या पद्धती वापराव्यात याबाबतची पद्धतशीर मानके देखिल स्मिथने विकसीत केली.

प्रायोगिक अर्थशास्त्र या विषयाची शास्त्रशुद्ध पायाभरणी करण्याच्या बाबतीत देखील स्मिथचे काम महत्त्वाचे आहे. अमेरिकन इकॉनॉमिक रिव्ह्यूमधील अत्यंत महत्वाच्या अशा लेखात (प्रायोगिक अर्थशास्त्र प्रलोभित मूल्य सिद्धांत 1976)-स्मिथ यांनी अर्थशास्त्रीय प्रयोग, प्रयोगशाळेमध्ये कसे करावेत याचे अत्यंत व्यावहारिक व तपशीलवार मार्गदर्शन केले आहे.

**डॅनिअल काहनेमन**

डॅनिअल काहनेमन यांचा जन्म 1934 साली इस्त्रायलमधील अव्हीव या शहरात झाला. 1954 साली जेरुसलेम येथील हिब्रु विद्यापीठातून त्यांनी मानसशास्त्र व गणित हे विषय घेउन बी.ए. पदवी संपादन केली. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेला रवाना झाले. बर्कले विद्यापीठातून 1961 साली मानसशास्त्रात त्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली.

इस्त्रायल व अमेरिका अशा दोन्ही देशांचे नागरिकत्व असणाऱ्या काहनेमन यांनी हेब्रु युनिव्हर्सिटी जेरुसलेम, ब्रिटीश कोलंबिया विद्यापीठ कॅनडा, बर्कले विद्यापीठ, मिशिगन विद्यापीठ, हार्वर्ड विद्यापीठ व कॅम्ब्रिज विद्यापीठ अशा विविध ठिकाणी प्राध्यापक म्हणून काम केले आहे. 1993 सालापासून ते प्रिन्सटन विद्यापीठात मानसशास्त्र तसेच पब्लिक अफेअर्सचे प्राध्यापक म्हणून काम करीत आहेत.

काहनेमन यांनी अनेक लेख व पुस्तके लिहीली असून ते जर्नल ऑफ रिस्क अँड अनसरटेन्टी, थिंकींग अँड रिझनिंग, अर्थशास्त्र आणि तत्वज्ञान अशा विविध नियतकालीकांवर संपादन मंडळाचे सदस्य म्हणून काम करीत आहेत.

सत्तरवर्षिय डॅनिअल काहनेमन यांचा जन्म इस्त्रायल येथे झाला असून अमेरिका व इस्त्राइल अशा दोन्ही देशांचे ते नागरिक आहेत. प्रिनस्टन विद्यापिठाच्या मानसशास्त्र विभागात ते कार्यरत आहेत आणि व्यक्तींच्या निर्णय प्रक्रियेत मानसशास्त्राचा खूप मोठा प्रभाव असतो या बद्दल मूलभूत संशोधन केल्याबद्दल त्यांना या वर्षीचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. पारंपरिक अर्थशास्त्रीय सिद्धांत अर्थपरायण मानव (homo-economicus) म्हणजे व्यक्तींचे अर्थविषयक निर्णय स्वार्थी हेतूने प्रेरित झालेले असतात व व्यक्ती अर्थशास्त्रीय परिस्थितीचे आकलन करून त्यांच्या उद्दिष्टानुसार योग्य असा निर्णय घेऊ शकतात असे गृहित धरले जाते. ह्याच गृहिताचा वापर अपेक्षित उपयोगिता

सिद्धांतात करण्यात आला आहे. अपेक्षित उपयोगिता सिद्धांत हा अर्थशास्त्रातील एक पायाभूत सिद्धांत समजला जातो की त्याच्यावर अर्थशास्त्रातील अनेक निष्कर्ष, प्रतिमाने अवलंबून आहेत.

मानसशास्त्रामध्ये विशेषत: बोधत मानसशास्त्रामध्ये cognitive Psychology व्यक्तीच्या निर्णयप्रक्रियेत अनेक घटकांचा लक्षणीय प्रभाव असतो हे लक्षात घेतले आहे. हे घटक म्हणजे व्यक्तीची समज तसेच व्यक्तिच्या श्रद्धा किंवा त्याची मानसिक प्रतिमाने की ज्याच्या द्वारे वेगवेगळ्या परिस्थितीचा तो अर्थ लावत असतो. व्यक्तिच्या भावना, त्याच्या मनाच्या अवस्था व त्याचा दृष्टीकोन यांचाही त्याच्या निर्णय प्रक्रियेवर परिणाम होत असतो. पूर्वी घेतलेल्या निर्णयांच्या स्मृति व त्यांचे परिणाम, ज्यांना बोधन मानसशास्त्रामध्ये खूप महत्त्वाचे स्थान आहे, त्यांचाही व्यक्तीच्या निर्णय प्रक्रियेवर परिणाम होत असतो.

काहनेमन व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या सखोल संशोधनामधून व्यक्तीच्या वर्तनासंबंधी खूपच पुरावा आता उपलब्ध झाला आहे की ज्यामुळे तर्कसंगत वर्तन ह्या अर्थशास्त्रातील गृहिताबद्दल शंका घ्यायला आता जागा झाली आहे. अनेक अभ्यासांमुळे हे आता लक्षात येत आहे. प्रत्यक्ष व्यवहारातील परिस्थितीत अनेक घटक दुर्लक्षित करता येणार नाही.

काहनेमन व ट्वेरस्की यांच्या असे लक्षात आले की, सर्व साधारणपणे, व्यक्ति निर्णय घेताना परिस्थितीचा सर्वांकष विचार करू शकत नाहीत व अनेक वेळेला तो अंदाजपंची निर्णय घेतात ज्यात अनेक वेळेला पद्धतशीरपणे अभिनति चा अंतर्भाव होतो.

निरनिराळ्या परिस्थितीत व्यक्ती कल कसा दाखवितात याची अनेक उदाहरणे काहनेमन व ट्वेरस्की यांनी दिली आहेत. एका प्रयोगात त्यांना असे दिसून आले की, व्यक्ती नमुन्याचा आकार लहान असो वा मोठा दोन्ही नमुना आकाराला संभवनीय वितरण लागू होते असे गृहित धरण्यात येते. एखाद्या विशिष्ट दिवशी हॉस्पीटलमध्ये 60 टक्के मुले जन्माला येण्याची शक्यता लहान अथवा मोठ्या हॉस्पिटलच्या बाबतीत सारखीच असते असे त्यांना एका प्रयोगात आढळून आले. नमुन्याचे आकारमान वाढले की नमुन्याची सरासरी कमी होते हे त्यांनी लक्षात घेतले नाही.

संभाव्य अंदाज बांधणीत एक कल म्हणजे माहितीची उपलब्धता व्यक्ती जी माहिती ठळक असते किंवा सहज लक्षात राहण्यासारखी असते तिच्या बाबतीत प्रमाणाबाहेर शक्यता व्यक्त करतात. आपल्या ओळखीच्या व्यक्तीच्या बाबतीत हिंसाचाराचा प्रकार घडला असेल तर व्यक्ती आपल्या शहरामध्ये हिंसाचाराचा गुन्हा घडण्याची जास्त शक्यता व्यक्त करतात. जर इतर माहिती उपलब्ध असली तरी, अपरिचित माहितीपेक्षा परिचित माहितीच्या बाबतीत व्यक्ती जास्त शक्यता व्यक्त करतात मानवी निर्णयशक्तीच्या बाबतीतील या सगळ्या पुराव्यांवरून असे लक्षात येते की, व्यक्तींच्या निर्णयप्रक्रियेत आपल्याला पद्धतशीर कल दिसून येतो.

काहनेमन व ट्वेरस्की यांना असेही लक्षात आले की, एखादा निष्कर्ष निव्वळ स्वरूपात बघण्यापेक्षा तो एखाद्या निर्देश स्तराशी (reference level) तुलना करता किती भिन्न आहे यात लोक रस दाखवतात. अशा अनेक पुराव्यातुन काहनेमन व ट्वेरस्की यांनी पारंपरिक उपयोगीता सिद्धांतातील त्रुटी दाखविल्या आहेत. अर्थात केवळ या त्रुटी दाखवून ते थांबले नाहीत तर एका महत्त्वाच्या लेखा भाविकालदर्शन सिद्धांत-जोखीम स्थितीत निर्णयाचे विश्लेषण (1979) द्वारे त्यांनी पर्यायी रचना देखिल उपलब्ध करून दिली आहे. थोडक्यात काहनेमन व

स्मिथ यांनी दोन वेगवेगळ्या पण नजिकच्या शाखांमध्ये संशोधन करून अर्थशास्त्राला एक वेगळे प्रमाण दिले आहे. या दोन शाखांमध्ये नजिकच्या कालावधीत आणखी संशोधन होईल व अर्थशास्त्रातील किचकट समस्यांची उत्तरे शोधण्यास मदत होईल असा विश्वास वाटतो.

### काहनेमन यांचे काही निवडक ग्रंथ


Kahneman D and Amos Tversky ed. [2000] Choices.Values, and Frames, Cambridge University Press, Cambridge.

Kahneman. D.ed. {1998} Well-Being. The Foundations of Hedonic Psychology.

Kahneman. D.ed. {1982} Judgment under Uncertainty : Heuristics and Biases by.


### स्मिथ यांचे काही निवडक ग्रंथ


Smith. V {1991} Papers in Experimental Economics Bargaining and Market. Smith V. {2000} Behavior Essays in Experimental Economics.

Miller R and Smith V {2000} Paving Wall Street : Experimental Economics and the Quest for the Perfect Market.

Burnham.T. Edward O. Wilson, Brandenburger. A. Smith V. Essays on Genetic Evolution and Economics.


### काहनेमन यांचे संशोधनपर लेख


Kahneman D., J. Knetsch, and R. Thaler

(1986), "Fairness and the assumptions of economics", Journal of Business 59, S284-S300.

Kahneman D., J. Knetsch, and R. Thaler (1990),"Experimental tests of the endowment effect and the Coase theorem", Journal of Political Economy 98, 1325-1348.

Kahneman D. and D. Lovallo (1993)," Timid choices and bold forecasts : A cognitive perspective on risk taking", Management Science 39, 17-31.

Kahneman D. And A. Tversky (1972),"Subjective probability: A Judgment of representativeness", Cognitive Psychology 3, 430-454.

Kahneman D. and A. Tversky (1973), "On the Psychology of Prediction", Psychological Review 80, 237-251.

Kahneman D. and A. Tversky (1979), "Prospect theory: An analysis of decision under risk", Econometrica 47, 263-291.

Kahneman D, and A. Tversky,eds.(2000), Choices, values and frames, Cambridge University Press, Cambridge.


### स्मिथ यांचे संशोधनपर काही लेख


Smith V.L. (1962),"An experimental study of competitive market behaviour", Journal of Political Economy 70, 111-137.

Smith V.L. (1965),"Experimental auction markets and the Walrasian hypothesis",Journal of Political Economy 73, 387-393.

Smith V.L. (1973),"Notes on some literature in experimental economics", Social Sciences working paper No. 21, California Institute of Technology.

Smith V.L. (1976 a) "Experimental Economics Induced Value theory", American Economic Review, Papers and Proceedings, 274 - 279.

Smith V.L. (1976 b),"Bidding and auctioning institutions:Experimental results", in Y. Amihud (ed.) Bidding and Auctioning for Procurement and Allocation, New York University Press. New York.

Smith V.L. (1979a), "An experimental comparison of three public good decision mechanisms", Scandinavian Journal of Economics 81, 198-215.

Smith V.L. (1979b), "Incentive compatible experimental processes for the provision of public goods", in V.L. Smith(ed.), Research in Experimental Economics, JAI Press. Greenwich, C T.

Smith V.L. (1979c),"Indirect revelation of the

demand for public goods : An overview and critique", Scottish Journal of Political Economy 26, 183-189.

Smith V.L. (1980),"Experiments with a decentralized mechanism for public good decisions", American Economic Review 70, 584-599.

Smith V.L. (1982),"Microeconomic systems as an experimental science", American Economic Review 72, 923-955.

Smith V.L.(1991a),"Rational choice-the contrast between economics and psychology", Journal of Political Economy 99,877-897.

Smith V.L.(1991b), Papers in Experimental Economics, Cambridge University Press, Cambridge.

Smith, V.L. (2000), Bargaining and Market Behavior : Essays in Experimental Economics, Cambridge University Press, Cambridge.

Tversky A. And Kahneman (1971),"Belief in the law of small numbers", Psychological Bulletin 76, 105-110.

Tversky A. and D. Kahneman (1973), "Availability : A heursistic for judging frequency and probability", Cognitive Psychology 5, 207-232.

Tversky, A. and D. Kahneman (1974),"Judgment under uncertainty : Heuristics and biases", Science 185, 1124-1131.

Tversky, A. and D. Kahneman (1982), "Judgment of and by representativeness", in Kahneman, D., P. Slovic, and A. Tversky (eds.). Judgment Under Uncertainty : Heuristics and Biases, Cambridge University Press, Cambridge.

Tversky A. and D. Kahneman (1986), "Rational choice and framing of decisions", Journal of Business 59, S252-278.

Tversky A. and D. Kahneman (1991),"Loss aversion in riskless choice : A reference-dependent model", Quarterly Journal of Economics 106, 1039-1061.

Tversky A. and D. Kahneman (1992)," Advances in prospect theory : Cumulative representation under uncertainty", Journal of Risk and Uncertainty 5, 297-323.

● ● ●

## अधिवेशन नोंदणी शुल्कातील बदल

सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळाचे, सोनोपंत दांडेकर कला, व्ही.एस.आपटे वाणिज्य आणि एम. एच. मेहता विज्ञान महाविद्यालय, पालघर, जि. ठाणे येथे दिनांक 23 नोव्हेंबर ते 25 नोव्हेंबर 2003 या दरम्यान संपन्न होणाऱ्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सत्ताविसाव्या अधिवेशनाचे नोंदणी शुल्क रु. 500/- वरुन 450/- करण्यात आले आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व सदस्यांनी याची कृपया नोंद घ्यावी.

**प्रमुख संपादक**
**'अर्थसंवाद'**

# आरक्षणाने सामाजिक समता प्रस्थापित झाली कां ?

● **माधव गायकवाड**
*अर्थशास्त्र विभाग, स.भु.कला, वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद.*

**आ**धुनिक काळात विकासाचे अर्थशास्त्र या अर्थशास्त्राच्या शाखेला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे आर्थिक विकासाच्या कक्षेत येणाऱ्या अनेक सामाजिक घटकाकडेही तज्ज्ञांचे लक्ष वेधले जात आहे. मानव विकास अहवालानुसार आर्थिक विकासात लोकांना प्राप्त होणाऱ्या संधी, दीर्घ आयुष्य आणि निरोगी जीवन, शिक्षण, चांगले राहणीमान, तसेच राजकीय स्वातंत्र्य, मानवी हक्कांचे रक्षण, स्त्री-पुरूष समानता, आर्थिक आणि सांस्कृतिक समानता इत्यादी घटकांचा समावेश करण्यात येतो. 'आरक्षण' ही संकल्पना वरील अपेक्षित परिवर्तन घडवून आणण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. इतकेच नव्हे तर राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या व्यूहरचनेचा तो एक अनिवार्य भाग आहे. सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणूनही आरक्षणाकडे पाहिले पाहिजे.

धर्म निरपेक्ष राष्ट्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतीय समाजाची रचना चातुर्वण्यावर आधारित आहे आणि जातीयता व अस्पृश्यता हे चातुर्वर्ण्य समाज व्यवस्थेचे अपत्य आहे ही बाब आता जगमान्य झाली आहे. भारतात जन्मावरून जात व जातीच्या आधारे व्यवसाय निश्चित होतो. त्यामुळे समाजाचे व्यवसायावरून दोन प्रमुख प्रकारात विभाजन झालेले आहे. (अ) उच्च जातीय : यात ब्राह्मण व इतर काही स्पृश्य हिंदूचा समावेश होतो व (ब) कनिष्ठ जातीय : 2399 अनुसूचित जाती तेवढ्याच जमातींचा व त्या बरोबर 3373 इतर मागासवर्गीय जातीचाही समावेश होतो. कनिष्ठ जातीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचीतजमाती या अस्पृश्य मानल्या जातात. समाजातील साफसफाई, अप्रतिष्ठेची, आर्थिक कष्टाची, किळसवाणी, कमीमोबदला देणारी कामे त्यांना नेमून देण्यात आली. तर प्रतिष्ठेची, मानापानाची, कमी कष्टाची अधिक मोबदला देणारी कामे उच्च जातीय लोकांच्या हाती राहिली. त्यामुळे समाजात सामाजिक विषमतेतून आर्थिक असमानता व आर्थिक असमानतेतून राजकीय विषमता निर्माण झाली. वास्तविक पहाता प्रत्येक व्यक्ती जन्मत: स्वतंत्र असते. जन्मत: मिळालेल्या स्वातंत्र्याचा संकोच झाल्यास मात्र व्यक्तीच्या विकासात व पर्यायाने राष्ट्राच्या विकासात अडथळा निर्माण होतो पण

भारतात मात्र व्यक्तीचे सामाजिक आर्थिक राजकीय व शैक्षणिक जीवन जातीव्यवस्थेच्या व रूढी परंपरांच्या मजबूत तटबंदीनी बंदिस्त झालेले आहे. म्हणून राष्ट्राच्या विकासाची गती मंदावली. अस्पृश्य समाजात निसर्गतः, जन्मतः मिळालेल्या स्वातंत्र्याच्या वापर करण्याचीही कुवत राहिली नाही, अशा वेळी एखादा कृत्रिम आधार निर्माण करून त्यांना जन्मतःच मिळालेले आपले अधिकार व स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी उपयुक्त वातावरण निर्मिती करणे आवश्यक असते त्यासाठी भारतात काही प्रयत्न करण्यात आले. दुर्बल घटकांच्या स्वउन्नतीसाठी काही विशेष सवलती (संधी) उपलब्ध करून देण्यात आल्या त्यालाच आज आपण रूढार्थाने आरक्षण असे म्हणतो. म्हणजेच हजारो वर्षापासून समाजातील दुर्बल (अस्पृश्य) घटकांना आपले अधिकार उपभोगता आले नव्हते ते उपभोगता यावेत यासाठी निर्माण करून दिलेली विशेष संधी म्हणजे आरक्षण होय. आरक्षण ही संकल्पना जाती निहाय असल्यामुळे ती सामाजिक आहे. शासनाकडून राबविली जात असल्यामुळे ती राजकीय आहे तर आर्थिक सुधारणेसाठी असल्यामुळे ती आर्थिक दृष्टया देखील महत्वाची आहे. त्यामुळे आरक्षण धोरणाचे परिणाम जसे समाजाच्या विविधांगावर जाणवतात तसे त्याचे पडसादही समाजमनावर पडतात. परिणामतः आपोआपच समाज हा आरक्षण विरोधी व आरक्षण पूरक वर्गात विभागला जातो. गेल्या 100 ते 125 वर्षाचा आरक्षण धोरणाचा इतिहास बघता या दोन्ही वर्गात सतत संघर्ष राहिलेला आहे. वेळ प्रसंगी रक्तरंजित लढेही लढले गेले आहेत. पण आरक्षण धोरणा विरोधात असणाऱ्या लोकांच्या हाती आरक्षण धोरण राबविण्याची सत्ता असल्यामुळे आरक्षण धोरणाच्या माध्यमाने पारंपरिक समाज व्यवस्थाच टिकवून ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे का ? याचा शोध घेणे या निबंधाचा हेतु आहे.

**आरक्षण संकल्पनेचे समर्थक :**

विषमतेने ग्रासलेल्या समाजात संधीची विषमता निर्माण करणे आवश्यक असते व ही विषमता आरक्षण धोरणामुळे वैधानिक ठरते. यावर म. फुलेंचा विश्वास होता म्हणूनच त्यांची विविध ठिकाणी निवडक जातींना आधी प्राधान्य द्यावे व पुढारलेल्या जातीचा नंतर विचार करावा असे सूचित केले त्यामुळे हजारो वर्षापासून सामाजिक आर्थिक व राजकीयदृष्टया अस्पृश्य राहिलेल्या बहुजन समाजाला, त्यांच्या जातीला सामाजिक न्याय मिळेल. याचा अर्थ प्रचलित असलेल्या आरक्षण धोरणाची सुरूवात राज्य घटनेच्या अंमलबजावणीनंतर जरी झालेली असली तरी म. जोतिबा फुलेंनी या संकल्पनेचा उल्लेख करून विशेष मागणी केली होती ही बाब स्पष्ट होते.

फुलेंनी सुचविलेल्या आरक्षण धोरणाची संकल्पना नंतरच्या काळात छत्रपती शाहू महाराजांनी प्रत्यक्ष राबविली आणि त्यांनी समाज विकास तसेच परिवर्तनाचे कार्य केले. जुलै 1902 मध्ये 50% जागावर आरक्षणा विषयीचा अध्यादेश काढून त्यांनी आरक्षण धोरणाला राजकीय पाठिंबा जाहीर केला. त्यांच्या अध्यादेशाचे पडसाद पुढे देशात उमटले. परिणाम स्वरुप 1918 साली म्हैसुर राज्यामध्ये, 1921 साली मद्रासमध्ये, 1925 साली मुंबई राज्यामध्ये आरक्षण जाहीर करण्यात आले व सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या पर्वाला सुरुवात झाली.

1920 नंतर भारतीय समाजकारण व राजकारणात डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा प्रवेश झाला. डॉ. आंबेडकरांनी जातीव्यवस्थेचे चटके स्वतः सोसलेले होते. भारतीय समाज व्यवस्थेत श्रेष्ठ कनिष्ठांची भावना असून अस्पृश्य लोकांची अवस्था गुलामापेक्षाही वाईट आहे. त्याला या दुष्ट चक्रातून बाहेर काढण्याचा एकच मार्ग आहे तो म्हणजे

आरक्षण असे डॉ. आंबेडकर म्हणतात. कारण आरक्षणामुळे, आर्थिक विकास, सामाजिक समता, व्यावसायिक गतिशीलता, राजकीय प्रगल्भता व सांस्कृतिक सहिष्णुता प्रस्थापित होते. म्हणूनच ते म्हणतात राखीव जागा हे क्रांतीकारक हत्यार असून ते केवळ खासदार, आमदार, सरपंचपद, देत नाही तर जातीव्यवस्थेचा पिरॅमिड चढण्यासाठी शिडीचे कार्य करते.''

**भारतीय राज्यघटना व आरक्षण :**

अनेक मूर्त व अमूर्त प्रयत्नांचा परिपाक म्हणजे 15 ऑगस्ट 1947 साली देशाला मिळालेले स्वातंत्र्य होय. राष्ट्राच्या भविष्यकालीन वाटचालीचा निश्चित आराखडा म्हणून 26 जाने. 1950 रोजी भारतीय राज्यघटनेचा स्वीकार करण्यात आला. राज्याच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक विकासासाठी काही निश्चित नियमांची आवश्यकता असते. त्या नियमांच्या सर्वमान्य समुच्चयालाच राज्यघटना असे म्हटले जाते. भारतीय राज्यघटनेच्या लिखित प्रतिज्ञापत्रातच आम्ही शपथ घेतलेली आहे की, सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता प्रस्थापित करण्यासाठी वचनबद्ध आहोत. याचा अर्थ संधीची समानता, व्यावसायीक गतिशीलता, सामाजिक न्याय बंधुता, इत्यादी बाबींना घटनात्मक संरक्षण देणाची आम्ही हमी दिलेली आहे. ज्यामुळे समाज परिवर्तन व गतिशीलता या तत्त्वांना पूरक वातावरण प्राप्त होईल. विषमतेने बरबटलेल्या समाजात संधीची समानता न मिळणे हेही योग्य होणार नाही. याची जाणीव घटना कर्त्यांना होती म्हणून घटनेत मुद्दाम कलम क्र.330 व कलम क्र. 332 समाविष्ट केलेले आहे. या अंतर्गत लोकसभेत व विधानसभेत अनुसूचित जाती अनु. जमातींना काही जागा राखीव ठेवलेल्या आहेत. अलिकडेच 1992 साली 73वी व 74वी घटनादुरुस्ती करण्यात आली. त्यात कलम 243 घ. व क्र. 43 प्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखिल अनु. जाती जमातींना राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत. केवळ राजकीय अधिकार देवून चालणार नाही तर त्या राजकीय पदांसाठी योग्य व्यक्ती मिळण्यासाठी अनुकूल वातावरण निर्मिती व्हावी म्हणून घटनेतील कलम क्र. 46 नुसार राज्यातील अनुसूची जाती/जमातीच्या लोकांच्या विकासाची जबाबदारी शासनावर सोपविलेली आहे. एवढेच नव्हे तर कलम 335 नुसार संघराज्य किंवा राज्य यांच्या कारभाराच्या सेवामध्ये पदावर नियुक्ती करताना अनुसूचीतजाती व अनुसूचीत जमातीच्या लोकांच्या नियुक्तीची तरतुद केलेली आहे. म्हणजेच राज्यघटनेत अनु. जाती, व अनु. जमातीच्या व्यक्तीच्या विविध हक्कांची तरतूद केली आहे. याचा अर्थ भारतीय राज्य घटनेत अनुसूचीतजाती, अनुसूचित जमातीच्या लोकांच्या सामाजिक आर्थिक राजकीय व सांस्कृतिक विकासाची जबाबदारी सरकारने घेऊन पारंपरिक समाजातील अनिष्ठ रुढी नाकारतांना नवसमाज निर्मितीची प्रक्रिया सुरु केली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या 56 वर्षात घटनेच्या अमलानंतर 53 वर्षात अनुसूचित जाती जमातीच्या संदर्भात आरक्षण ठेवून देखिल आवश्यक परिवर्तन पाहिजे तेवढे झाले नाही हेच पुढील आकडेवारीवरुन निदर्शनास येते.

**आरक्षण आणि वास्तव :**

भारतात अनुसूचित जाती व जमातीचे मिळून एकूण 24% लोक राहतात. पैकी अनु. जातीचे 38% व अनुसूचीतजमातीचे 30% लोक साक्षर आहेत. त्यातही माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण (अनुसूचीतजाती व जमातीचे) अनुक्रमे 79.88% व 86.72 % एवढे आहे याचा

अर्थ केवळ 13% ते 20% विद्यार्थीच उच्चमाध्यमिक शिक्षणापर्यंत पोहचतात. बाकी 80% विद्यार्थी पारंपरिक व्यवसायाकडे वळतात. शिक्षण सुटलेले लोक शेतमजूर किंवा शेतीवर आधारित व्यवसाय करतात कारण अनुसूचित जातीच्या केवळ 25% लोकांकडेच शेती आहे बाकी सर्व पारंपरिक व्यवसाय करतात त्यात 49% लोक शेतमजुर आहेत ज्यांच्या हाती हमखास उत्पन्न देणारे कोणतेही साधन नाही त्यामुळे उदरभरणासाठी मिळेल ते कनिष्ठ स्वरुपाचे काम त्यांना करावे लागते. याचा अर्थ अनुसूचितजातीचे 76 .22%लोक अनुसूचितजमातीचे 87% लोक पारंपरिक जातीनुसार व्यवसाय करतात. (तक्ता क्र. 1 पहा)

घटनेतील तरतुदीनुसार शासकीय नोकऱ्यांमध्ये अनुसूचितजाती जमातीच्या लोकांसाठी काही जागा आरक्षित केलेल्या आहेत. शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांचे प्रथम श्रेणी, द्वितीय श्रेणी, तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी असे वर्गीकरण केले जाते. प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणी कर्मचाऱ्यांना (अधिकाऱ्यांना) इतर श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या तुलनेत जास्त वेतन असते. त्यांना सरकारी वाहन, सरकारी बंगला, व निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याचा विशेष अधिकार असतो. तृतीय श्रेणी कर्मचारी हा कमी वेतनावर कारकूनी स्वरुपाचे काम करणारा असतो. तर चतुर्थ श्रेणीत शिपाई व सफाई कामगाराचा समावेश होतो. केंद्र सरकारच्या ''अ दर्जाच्या श्रेणीत अनुसूचित जमातीचे केवळ 10% लोक तर अनुसुचित जातीचे केवळ 3% अधिकारीच आहेत. अ दर्जाकडून ब,क,ड श्रेणीच्या कर्मचाऱ्यांत अनु.जाती व जमातीचे प्रमाण वाढत गेले आहे या क्षेत्रात अनु.जाती जमातीचे कर्मचारी नियोजित आरक्षित जागेपेक्षा जास्त संख्येत आहेत. अ व ब दर्जाचे (प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणी) अधिकारी उच्च जातीय आहेत. तर क व ड दर्जाचे (तृतीय व चतुर्थ) श्रेणीमध्ये बहुतांशी कर्मचारी अनुसूचित जाती जमातीचे आहेत. म्हणजेच त्यांना पारंपरिक व्यवसायच शासकीय सेवेतही करावा लागतो. (पहा तक्ता क्र. 2)

व्यावसायिक गतिशीलता व सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. महात्मा जोतिबा फुलेंनी वस्तीशाळांची संकल्पना मांडून बहुजनांसाठी बहुजन शिक्षकच नेमण्याचे सुचविले होते, ज्यामुळे असे बहुजन समाजातील शिक्षक जबाबदारीने आणि आत्मीयतेने शिक्षण देण्याचे व समाज परिवर्तनाचे काम करतील पण गेल्या 50 वर्षात तसे झाले नाही. उलट अनु.जाती अनु.जमातीतील नियुक्त शिक्षकांना देखिल अपमानास्पद वागणूक मिळाल्याचे अनेक दाखले उपलब्ध आहेत. देशातील एकूण शालेय शिक्षणात अनुसूचित जातीच्या शिक्षकांचे प्रमाण फक्त 9% व अनु.जमातीचे केवळ 5.74% एवढेच आहे. त्यातही माध्यमिक स्तरावर अनु.जाती जमातीच्या शिक्षकांचे प्रमाण अनुक्रमे 6% व 4% एवढेच आहे. म्हणजेच प्राथमिकपेक्षा माध्यमिक स्तरावर अनु.जातीजमातीचे शिक्षक कमी आहेत. माध्यमिक स्तरावर अनु.जाती जमातीच्या विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण देखील माध्यमिक स्तरावरच जास्त आहे याचा अर्थ शिक्षकांची नियुक्ती व अनु.जाती जमातीच्या विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण यात सहसंबंध असला पाहिजे. (पहा तक्ता क्र. 3)

प्राथमिक स्तरावर ग्रामीण भागात काम करणाऱ्या शिक्षकात अनु.जाती जमातीच्या शिक्षकांचे प्रमाण अनुक्रमे 13% व 9% एवढे आहे. तर शहर विभागात ते 7% व 3% एवढेच आहे. याचा अर्थ अनु.जातीजमातीच्या शिक्षकांचे ग्रामीण भागातील प्रमाण अधिक आहे. ही नियुक्ती अ दर्जाच्या अधिकाऱ्याकडून केली जाते हे वेगळे सांगणे नलगे. प्राथमिक स्तरावर ग्रामीण भागात अनु.जाती

जमातीच्या शिक्षकांचे प्रमाण 13% एवढे आहे तर माध्यमिक स्तरावर शहरी विभागात त्यांचे प्रमाण केवळ 8% एवढे आहे. यावरुन असे म्हणता येईल की, कमी पगाराच्या व कमी दर्जाच्या ठिकाणी अनुसूचितजाती/अनु.जमातीचे जास्त शिक्षक आहेत तर जास्त वेतनाच्या व उच्च दर्जाच्या ठिकाणी त्यांचे प्रमाण नगण्य आहे.

1991 पासून देशातील आर्थिक परिस्थिती व धोरणात आमुलाग्र बदल होत आहेत. निर्गुंतवणुकीच्या नावाखाली सार्वजनिक उद्योग मोडीत काढले जात असल्यामुळे त्या क्षेत्रातील अनु.जाती जमातीसाठी असणाऱ्या रोजगार संधी व आरक्षण संधी कमी होत आहेत. या विरोधात न्यायालयात न्याय मागणीसाठी गेल्यास तेथेही फारसे समाधानकारक चित्र नाही. 15 मार्च 2002 रोजी अनु.जाती जमातीच्या अभ्यास समितीने अहवाल दिलेला आहे की, उच्च न्यायालयातील एकूण 481 न्यायाधिशांपैकी केवळ 15 न्यायाधिश अनु.जाती जमातीचे आहेत. एकूण न्यायाधिशात हे प्रमाण केवळ 3% आहे. वास्तविक हे प्रमाण 24% हवे.

केवळ केंद्रशासनाच्या सेवेमध्येच आरक्षणाची पूर्तता झाली नाही असे म्हणणे योग्य होणार नाही. देशातील एकाही राज्याने गेल्या 56 वर्षात आरक्षित असलेले पदे पूर्ण भरलेली नाहीत. त्यातही 'अ' व 'ब' दर्जाच्या अधिकाऱ्यात याची पूर्तता अत्यंत कमी झालेली आहे. तर 'क' व 'ड' दर्जाच्या नोकऱ्यात मात्र अनु.जाती जमातीचे लोक नियमाने ठरवून दिलेल्यापेक्षा जास्त आहेत. याचा अर्थ पारंपरिक सेवाच ते लोक शासकीय सेवेतही करीत आहेत.

तक्ता क्र. 4 मध्ये अनु.जाती जमातीचे लोक व राज्यनिहाय नियोजित आरक्षण व प्रथम द्वितीय, तृतिय व चतुर्थ श्रेणीत अनु.जाती जमातीची केलेली भरती दाखविलेली आहे. एकूण 30 राज्ये व केंद्रशासीत प्रदेशांपैकी एकाही राज्यात 'अ' दर्जाच्या व 'ब' दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती नियोजित आरक्षित वाट्या (quota) एवढी करण्यात आली नाही. याउलट 'क' व 'ड' दर्जाच्या कर्मचाऱ्यात मात्र नियोजित आरक्षित कोट्यापेक्षा जास्तीचे प्रमाण अनु.जाती जमातीचे आढळते. महाराष्ट्रासारख्या फुले-शाहू,आंबेडकरांची परंपरा लाभलेल्या राज्यातही हे चित्र फारसे समाधान कारक नाही. महाराष्ट्रात अनु.जातीसाठी 13% तर जमातीसाठी 7% आरक्षण कोटा आहे. प्रथम श्रेणी अधिकाऱ्यामध्ये अनु.जाती 7% तर जमाती साठी आरक्षित असलेल्या जागा केवळ 2% एवढ्याच भरलेल्या आहेत. द्वितीय श्रेणीत अनुक्रमे ते 8% व 3% तर तृतीय श्रेणीत ते 13% व 5% एवढे आहे. एवढेच नाही तर चतुर्थश्रेणीत मात्र अनु.जाती व जमातीचे लोक अनुक्रमे 21% व 8% अशा रीतीने नियोजित आरक्षणापेक्षा जास्त आहेत. याचाच अर्थ आरक्षण धोरणाच्या नावावर पारंपरिक समाज व्यवस्थाच टिकवून ठेवण्याचा प्रयत्न भारतीय समाज व्यवस्थेत झालेला आहे असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. भारतामध्ये खऱ्या अर्थाने आरक्षण धोरणाची अंमलबजावणी 1950 पासून सुरू झाली पण शिक्षणाच्या अभावामुळे व दारिद्र्यामुळे आरक्षित जागा भरण्यासाठी लगेचच लायक लोक मिळाले नाहीत. 1970-75 या काळात अनु.जाती-जमातीची पहिली शिक्षित पिढी बाहेर पडली तो पर्यंत लायक उमेदवार मिळाले नाहीत ही सबब दाखवून आरक्षित जागेवर खुल्या प्रगर्वातील उमेदवारांच्या नियुक्त्या केल्या गेल्या. 1980 नंतर जेव्हा अनु.जाती जमातीचे लोक शिकून नोकरी करण्यायोग्य झाले तेव्हा खाजगीकरण व जागतिकीकरण्याचा घाट घालून आरक्षण धोरणालाच सुरुंग लावले गेले. याचा अर्थ स्वातंत्र्यानंतर समाजपरिवर्तनाचे व आर्थिक विकासाचे साधन म्हणून आरक्षण धोरणाचा स्वीकार

केला नाही. तर घटनात्मक तरतुद म्हणून आरक्षणाची अपुऱ्या प्रमाणात अंमलबजावणी केली. मोक्याच्या व अधिकाराच्या जागेवर उच्च जातीय लोक तर कनिष्ठ स्वरुपाच्या सेवा देण्याच्या कामाच्या ठिकाणी अनु.जाती/जमातीचे लोक निवडले गेले हे कटू सत्य आहे.

केंद्र शासनातून अटलबिहारी वाजपेयी, महाराष्ट्र राज्यातून उपमुख्यमंत्री छगन भुजबळ आर्थिक दृष्टया मागासलेल्या उच्च जातीय लोकांनाही आरक्षण देण्याची भाषा बोलत आहे. ही बाब स्वागतार्ह आहे पण गेल्या पन्नास वर्षात अनु.जाती/जमातीचे आरक्षण भरण्याची अट पूर्ण होवू शकली नाही ती अट आता उच्च जातीयांसाठी खाजगीकरण, उदारीकरण व वैश्विकरणाच्या या काळात शक्य आहे का? की आरक्षणासारख्या प्रभावी समाजपरिवर्तनाच्या साधनाचा राजकीय पोरखेळ होणार हे काळच ठरविल.

## संदर्भ सूची


फडके, यशवंत दिनकर (संपा.) : महात्मा फुले समग्रवाङ्मय (पहिली आवृत्ती) 1991

जाधव रमेश : लोकराज शाहू छत्रपती (प्रथम आवृत्ती 1997)

पंडित, नलिनी : आंबेडकर

भारत सरकार : भारताचे संविधान (सुधारीत आवृत्ती 1999)

प्रकाश लोईस : अनु.जाती-जमाती आरक्षण वाद-विवाद (इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली )


**तक्ता क्र. 1**

**भारतीय अनु.जाती/जमाती बाबतची सामाजिक,आर्थिक माहिती**

| अ.क्र. | विवरण | अनु.जाती | अनु.जमाती |
|---|---|---|---|
| 1 | लोकसंख्या | 16.48 | 8.08 |
| 2 | साक्षरता | 37.82 | 29.60 |
| 3 | पुरूष | 49.91 | 40.65 |
| 4 | महिला | 23.76 | 18.19 |
| 5 | माध्यमिक शाळेतील गळतीचे प्रमाण | 79.88 | 86.72 |
| 6 | शेती व्यवसाय | 25.44 | 54.50 |
| 7 | शेतमजूर | 49.04 | 32.69 |
| 8 | शेती व शेतीवर आधारित व्यवसाय | 76.22 | 87.00 |

स्रोत : ईकॉनॉमिक अँड पोलिटिकल विकली 2 जून 2002 पृष्ठ क्र. 2476

**तक्ता क्र.2**

**केंद्र सरकारच्या सेवेतील अनु.जाती/जमातीचे प्रतिनिधीत्व**

| श्रेणी | एकूण पदे | अनु.जातीची भरलेली पदे | टक्केवारी | अनु.जमातीची भरलेली पदे | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| प्रथमश्रेणी | 60,067 | 6,135 | 10.21 | 1,840 | 3.06 |
| द्वितीयश्रेणी | 94,111 | 11,649 | 12.38 | 2,840 | 3.02 |
| तृतीयश्रेणी | 19,59,477 | 3,14,995 | 16.08 | 1,22,903 | 6.27 |
| चतुर्थश्रेणी | 8,18,748 | 1,76,368 | 21.54 | 54,931 | 6.71 |
| सफाई कामगार | 15,51,137 | 61,149 | 39.42 | 12,812 | 8.26 |

स्रोत : इँकॉनॉमिक अँड पोलिटिकल विकली 2 जून 2००2 पृष्ठ क्र. 2476

**तक्ता क्र. 3**

**अनु. जातीजमातींनुसार शालेय शिक्षकांचे वर्गीकरण (कंसातील आकडे %)**

| अ.क्र. | एकूण शिक्षक | अनु.जातीचे शिक्षक | अनु.जमातीचे शिक्षक |
|---|---|---|---|
| 1. प्राथमिक शाळा | | | |
| अ) ग्रामीण | 12,75,218 | 1,59,275 (12.49) | 1,14,933 (9.01) |
| ब) शहरी | 3,48,161 | 24,592 (7.06) | 9,213 (2.65) |
| क) एकूण | 16,23,379 | 1,83,840 (11.32) | 1,24,146 (7.65) |
| 2. उच्च प्राथमिक शाळा | | | |
| अ) ग्रामीण | 7,90,271 | 78,063 (9.88) | 61,921 (7.84) |
| ब) शहरी | 33,946 | 23,151 (6.82) | 10,805 (3.18) |
| क) एकूण | 11,29,747 | 1,01,214 (8.96) | 72,726 (6.44) |
| 3.माध्यमिक शाळा | | | |
| अ) ग्रामीण | 5,32,328 | 38,070 (7.15) | 21,794 (4.09) |
| ब) शहरी | 2,97,077 | 15,535 (5.23) | 7,839 (2.64) |
| क) एकूण | 8,29,405 | 53,608 (6.46) | 29,633 (3.57) |
| 2. उच्च माध्यमिक शाळा | | | |
| अ) ग्रामीण | 2,47,584 | 18,802 (7.59) | 8,013(3.24) |
| ब) शहरी | 3,67,440 | 19,726 (5.37) | 6,552(1.78) |
| क) एकूण | 6,15,024 | 38, 531 (6.26) | 14,565 (2.37) |

स्रोत : इँकॉनॉमिक अँड पोलिटिकल विकली 2 जून 2००2 पृष्ठ क्र. 2476

### तक्ता क्र.4

### जिल्हा निहाय आरक्षित कोटा व प्रत्यक्ष कार्यवाही (टक्केवारीत)

| अ.क्र. | राज्य | लोकसंख्या | | नियोजित आरक्षण | | प्रत्यक्ष भरलेले आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनुजाती | अनुजमाती | अनुजाती | अनुजमाती | अ श्रेणी | | ब श्रेणी | | क श्रेणी | | ड श्रेणी | |
| | | | | | | अ .जा. | अ .जा. | अ .जा. | अ .जा. | अ .जा. | अ .जा. | अ .जा. | अ .जा. |
| 1 | आंध्रप्रदेश | 14.87 | 5.93 | 15 | 06 | 3.99 | .70 | 5.52 | .80 | 19.40 | .94 | 15.81 | 2.68 |
| 2 | गुजरात | 7.15 | 14.22 | 07 | 14 | 9.64 | 5.91 | 11.49 | 4 | 17.68 | 8.98 | 41.62 | 17.78 |
| 3 | हरियाना | 19.07 | - | 20 | - | 5.60 | - | 4.70 | - | 8.0 | - | 26.20 | - |
| 4 | हिमाचल प्रदेश | 24.62 | 4.61 | 22 | 05 | 5.40 | 3.90 | 7.80 | 3.70 | 12.00 | 3.40 | 20.5 | 5.80 |
| 5 | कर्नाटक | 15.07 | 4.91 | 15 | 03 | 12.23 | 1.79 | 8.06 | 1.49 | 11.20 | 1.57 | 18.58 | 3.28 |
| 6 | मध्यप्रदेश | 14.10 | 22.97 | 15 | 20 | 2.13 | 1.94 | 5.31 | 2.44 | 9.17 | 9.45 | 11.75 | 8.67 |
| 7 | महाराष्ट्र | 7.14 | 9.19 | 13 | 07 | 6.90 | 2.29 | 7.91 | 2.28 | 12.83 | 5.02 | 21.20 | 7.45 |
| 8 | पंजाब | 26.87 | - | 25 | - | 9.23 | - | 12.39 | - | 9.56 | - | 14.38 | - |
| 9 | राजस्थान | 14.07 | 12.21 | 16 | 12 | 7.90 | 2.78 | 9.80 | 8.70 | 9.02 | 7.71 | 22.65 | 11.43 |
| 10 | तामिळनाडू | 18.35 | 1.07 | 18 | 01 | 7.00 | .40 | 14.30 | .10 | 13.70 | 0.10 | 16.60 | .40 |
| 11 | उत्तरप्रदेश | 21.16 | 5.63 | 21 | 02 | 7.40 | .45 | 7.11 | 0.37 | 13.66 | .42 | 17.58 | .50 |

स्रोत : ईकॉनॉमिक अँड पोलिटिकल विकली 2 जून 2002 पृष्ठ क्र. 2476

# जे.आर. हिक्स यांच्या विचारांचा आढावा

● श्री. प्र. कुळकर्णी
*भूतपूर्व प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग, सी. पी. अॅन्ड बेरार, नागपूर*

**को**णत्याही विचारांचा मागोवा घेतांना त्या विचारांवरील पूर्वप्रभाव लक्षात घेणे उचित ठरावे. जे. आर. हिक्स यांच्या विचारांवर ऑस्ट्रीयन परंपरेचा व त्यातही लुसाना शाखेचा प्रभाव अधिक आहे. हा प्रभाव सार्वसमतोल विश्लेषणाच्या संदर्भात विशेष जाणवतो. परंतु ऑस्ट्रीयन परंपरेचा स्वीकार करतांना हिक्स यांनी मार्शलच्या अर्थशास्त्राशी नाते तोडले नाही. उलट पॉल न्यूमन म्हणतात त्याप्रमाणे ''मार्शल आणि परेटो यांच्यात हिक्सच्या योगदानामुळे सुरेख संगम साधला गेला''. एकूणच समन्वय हा हिक्स यांचा स्थायीभाव आहे. पण हा समन्वय म्हणजे केवळ विचारांची एकत्र पुन:मांडणी नाही. त्यांच्या लेखनात या मांडणीतून नवे स्पष्टीकरण, नवा निष्कर्ष या गोष्टी अनुभवास येतात. हिक्स हे वॉलराचे व्यासंगी अनुयायी आहेत. त्यांनी वॉलराच्या कल्पना घेऊन आपली विश्लेषणाची साधने अद्ययावत केली. त्यामुळे, ''वितरण आणि तांत्रिक क्षेत्रातील प्रगतीच्या संदर्भात वाचकाला जे जे हवे ते सर्व हिक्स यांच्या लेखनात सापडते....(विश्लेषण) तंत्राची श्रेष्ठता येथे परमोच्च अवस्थेला गेली आहे.'' हा अभिप्राय अत्यंत विचक्षण समीक्षक शुम्पीटरचा आहे.

वॉलरा आणि लुसाना यांच्या परंपरेव्यतिरिक्त, हिक्सच्या विचार मंथनाला लंडन स्कूलमधील कॉलडोर, हायेक आणि अॅलन या त्यांच्या सहकाऱ्यांचा मोठा हातभार लागला. 'व्हॅल्यू अँड कॅपिटल' या ग्रंथाबाबत हिक्स सांगतात ''ग्रंथातील संकल्पनांचे बीजारोपण लंडन स्कूलमध्ये झाले. (सहकाऱ्यांपैकी) प्रत्येकाला या पानांमध्ये स्वत:चे विचार आढळतील''. हिक्सच्या विचारांचा बराचसा विकास हा वैचारिक देवाणघेवाण आणि चर्चा या माध्यमातून झाला. हे विचार विकसत होत असताना अशी उदार मदत उपकारक ठरते. स्त्राफाची अमूल्य मदत हिक्स यांना झाली.

हिक्स सांगतात की जनरल थिअरी या ग्रंथाचा अभ्यास होण्यापूर्वी त्यांचे विचार त्यांचे सुप्तरुपात होते.'' पण कालक्रमात ''केन्सने आम्हा सर्वांवर मात केली''असे त्यांनी नोंदविले आहे. विचार स्वतंत्रपणे सुचल्याचा संकेत केल्यावर ते म्हणतात ''माझ्या हाताशी जर केन्स यांचा जनरल थिअरी हा ग्रंथ नसता तर माझ्या ग्रंथाचा (''व्हॅल्यू अँड

कॅपिटल'चा) उत्तरार्ध वेगळा राहीला असता.'' आपले विश्लेषण केन्सच्या तुलनेत बाळबोध वाटते पण पद्धतशीरपणा हा बाळबोध लेखनाचा गुण असतो यावर भर देऊन ते लिहितात '' त्यांची (केन्सची) अनेक अपूर्ण स्पष्टीकरणे मी सुस्पष्ट केली.''

मुद्दा केवळ ऋण मान्य करण्याचा नाही. प्रश्न आहे तो केन्सप्रणीत अर्थशास्त्राच्या संदर्भात हिक्स यांचे स्थान कोणते आहे हा होय. त्यांनी केन्सला केवळ परिपूरकत्व प्रदान केले की त्यात काही नवीन अर्थपूरक भर टाकली, ज्यामुळे वेगळे विचार किंवा नवे तत्त्वज्ञान निर्माण झाले ? काहींच्या मते ते केवळ परिपूरक विचार मांडतात तर शुम्पीटरच्या मते हिक्सने केन्सच्या विचारांना वेगळा अर्थ प्राप्त करून दिला. या मुद्याच्या पुष्ट्यर्थ ते C = f{Y} Hence, S = f {Y} हे प्रमेय हिक्सच्या परिभाषेत S = f {Y, I} असे होते हे उदाहरण देतात. म्हणण्याचा अर्थ हिक्स C,Y,S आणि I यातील परस्पर संबंधांचे संपूर्णत: वेगळे दालन उघडतात. शिवाय S = f {Y,I} हे समीकरण कसे वेगळे व उपयुक्त आहे हे एलएम वक्रांनी हिक्स सिद्ध करतात.


हिक्स आणि केन्स या दोघांच्या संदर्भात शुम्पीटर एक अभिनव श्रेय हिक्स यांना देतात. ते म्हणतात, ''arguments of Hicks in less friendly hands (than those of Hicks) would have turned into more damaging criticisms (of Keynes).'' या वाक्यातून केन्सपेक्षा वेगळे किंवा नवीन विचार हिक्स यांनी सुचविले असा सूक्ष्मार्थ प्रतीत होतो. प्रश्न आहे तो, या त्रुटींमुळे केन्सच्या अर्थशास्त्राने दिलेली दृष्टी (vision) असत्य आणि अनुपयुक्त ठरते काय ? किंवा केन्सने परंपरागत अर्थशास्त्रात क्रांती केल्याचे मानले जाते तसे किंवा केन्सला नवअर्थशास्त्राचे जनकत्व मिळते तसे नवीन काही हिक्स देतात काय ?

केन्सचा भावात्मक प्रभावाचा काळ इ.स. 1936 ते 1984 असा मानायला हरकत नाही. इ.स. 1984 पासून शासकीय हस्तक्षेपाचे तत्त्व आणि संरक्षणवाद या केन्सप्रणित बाबी जागतिक अधिकोष आणि आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी यांच्या संरचनात्मक कार्यक्रमाने मर्यादित केल्या, इतकेच नव्हे तर त्या नाकारल्या. राष्ट्रीय शासनांना कल्याण कार्यापासून परावृत्त करणारे कार्यक्रम या जागतिक वित्तीय संस्थानी दिले आणि आंशिक किंवा संपूर्ण नियोजनाची कल्पना जवळजवळ विसर्जित केली. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण यावर पुन्हा भर दिला. इ.स. 1984 नंतर, अर्थशास्त्र आणि अर्थनीती यात बरेच बदल झाले. पण निश्चितच हा बदल क्रांतीकारक किंवा आमूलाग्र बदल नाही. कारण त्यामागे असणारे सैद्धांतिक आधार नवीन नाहीत; हेतू नवीन नाहीत; व त्यांचे निर्माते पाश्चिमात्य विकसित देशही नवीन नाहीत स्पर्धा आणि व्यक्तिस्वातंत्र्य हे ॲडम स्मिथ प्रणीत भांडवलशाहीचे आधार होते. तेच आधार जागतिक अधिकोष आणि मुद्रानिधी यांच्या अहवालात आढळतात. स्पर्धेवर भर देणारी जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण ही तत्त्वे स्पर्धेऐवजी प्रचंड अल्पाधिकाराला बळकटी देतात आणि व्यक्तींचेच नव्हे तर देशांचेही सार्वभौमत्व मर्यादित करतात. मौजेची बाब ही की ॲडम स्मिथच्या मुक्त व्यवस्थेत एकाधिकार किंवा संगनमत बसत नाही. ते ठामपणे म्हणतात ''ज्या वेळी दोन उत्पादक एकत्र येतात त्या वेळी त्यांचा संवाद हा भाववाढ करण्याचे लोकहितविरोधी कारस्थान'' समजावे. ॲडम स्मिथ आग्रही सिद्धांतवादी नव्हते. त्यांच्यासाठी अनिर्बंध अर्थव्यवस्था ही संकल्पना एका प्रणालीचे आधारतत्त्व होते - अपरिवर्तनीय नियम नव्हे. मात्र नवसुधारणांचा तो अपरिवर्तनीय नियम आहे. तो आंतरराष्ट्रीय वित्तीय

सामर्थ्यबळाने नि दबाव तंत्राने राबविल्या जातो. सार्वभौम राष्ट्रांच्या विकासाच्या प्रतिमानांपासून तो आर्थिक अंदाजपत्रकांपर्यंत सर्वत्र परिणाम करणारा हा तथाकथित नवीन जागतिक कार्यक्रम किंवा न्यू डिल ते न्यू इकॉनॉमिक वर्ल्ड हे परिवर्तन सन 1929 पूर्वीचेच आर्थिक तत्त्वज्ञान कायम करते. ॲडम स्मिथ ते पुन्हा ॲडम स्मिथ ! स्मिथचे स्पर्धायुक्त मुक्त जग ते जागतिक अधिकोष आणि मुद्रानिधीचे अल्पाधिकारयुक्त मुक्त (?) जग !

हिक्स किंवा अन्य कोणी मंडळींनी या बदलांना आमूलाग्र छेद देऊ शकणारी सुधारणा केन्सच्या विचारात केली किंवा स्वत:चा एखादा नव-अर्थवाद दिला असेही म्हणता येणार नाही. त्यामुळे, आजसुद्धा ॲडम स्मिथ, कार्ल मार्क्स आणि केन्स हे वैचारिक क्रांतीचे तीन टप्पे कायम आहेत. त्यात स्वीकार-नकार किंवा वैचारिक विरोध विकास प्रक्रियेत (मार्क्स व हेगेल दोन्ही अर्थांनी) काही बदल घडणे इतिहाससिद्ध वास्तव आहे. पण जे बदल झाले ते प्रामुख्याने विश्लेषण तंत्रात झाले. आणि त्या क्षेत्रात हिक्स यांचे काम अनमोल आहे. या पार्श्वभूमीवर हिक्स यांच्या योगदानाची काही मान्यताप्राप्त वैशिष्ट्ये अशी :

1. त्यांचे उपयोगिता सिद्धांताचे सीमांत पर्यायिता दरात रुपांतर सर्व समान प्रयत्नांपेक्षा अधिक श्रेष्ठ गणले जाते. हिक्स यांच्या मते, हा केवळ रूपांतर प्रकार नाही तर तो (मागणी) सिद्धांताचा एक भावात्मक (पॉझिटीव्ह) आधार आहे. या आधाराचे समर्थन करतांना ते म्हणतात : ''उपयोगिता नियमाचा एकमेव आधार म्हणजे अनुभव. तो आधार घेऊन सीमांत पर्यायता कल्पना मांडता येईल व उपयोगिता नियमाप्रमाणे तिला स्वीकृती मिळेल. पण तो काही शास्त्रीय आधार ठरणार नाही. या नियमाचा संबंध बाजारपेठेशी आहे व बाजारातील स्थिती बदलताच उपभोक्त्याचे संतुलन बदलते. संतुलनाच्या ठिकाणी किंमत गुणोत्तर व पर्यायिता दर समान असणे आवश्यक आहे. पण एवढ्यानेच भागत नाही. तटस्थता वक्र सातत्याने आसांशी बहि:र्गोल असणे आवश्यक आहे. जसे आकृतीत दाखविल्याप्रमाणे q या बिंदूत सी.प. दर आणि किंमत गुणोत्तर समान आहेत, तटस्थता वक्र किंमत रेषेला स्पर्श करतो. पण येथे सी.प. दर वाढता आहे आणि हे संतुलन महत्तम नव्हे तर न्यूनतम पातळीचे आहे. त्यामुळे संपूर्ण वक्रासाठी बहि:र्गोल आकार गृहीत मानणे संयुक्तिक आहे.'' स्पष्ट आहे की, बहिर्गोल आकार केवळ तांत्रिक गृहीत आहे.




हिक्सच्या स्पष्टीकरणाकडे दुर्लक्ष करून ऱ्हाससमान सीमान्त पर्यायिता दर हा ऱ्हाससमान सीमान्त उपयोगिता नियमाचेच वेगळे स्वरूप आहे, त्यात नवीन काही नाही, कारण उपयोगितेचे मोजमाप करून किंवा न करून एकच निष्कर्ष निघतो तो म्हणजे डावीकडून उजवीकडे उताराचा मागणी वक्र असे मानणारे अर्थशास्त्रज्ञ आहेत. या टीकाकारांच्या मते या दोन दृष्टिकोनात बदल आहे तो केवळ अभिव्यक्तीचा. हिक्स यांना त्याची जाणीव आहे. प्रश्न आहे, ही अभिव्यक्ती स्वयमेव एक क्रांतिकारक बदल ठरते का ?

2. विचारांती हा दावा मोठ्या प्रमाणात सत्य असल्याचे दिसून येते. कारण या अभिव्यक्तीने एक


नवीन तंत्र दिले, किंबहुना नवीन भाषा जन्माला घातली, उपभोग संतुलनाच्या कक्षा रुंदावल्या. एकाच वेळी उत्पन्न आणि प्रतिस्थापन परिणाम स्पष्ट केले. शिवाय स्वत: हिक्सने परेटोच्या मूळ 'दोन वस्तू' प्रतिमान मुद्रा आणि एक वस्तू असे प्रतिमान आणून एकाच वेळी अनेक समीकरणे मांडण्यातून अनेक अ-गणितींची सुटका केली. एक नवा आयाम प्रतिस्थापनाला आला. सुगमता आली. ही सुगमता अर्थात वस्तु विभाज्यतेचे अवास्तव गृहीत, सातत्य (continuity) आणि बराच काल्पनिक अंश असलेली पसंती श्रेणी या आधाराने येते. शिवाय मुद्रेत अनेक वस्तू एकत्र करण्याने स्थूल रूपात प्रश्न सुटतो. पण एखादी क्ष वस्तू आणि मुद्रेत व्यक्त झालेल्या अन्य वस्तू एकत्रपणे असा विचार उपभोक्ता करतो की क्ष आणि तिचा जवळचा पर्याय य असा मर्यादित विचार करतो ? दोन्ही विचार एकाच निष्कर्षाला नेतील का ? असे प्रश्न उद्‌भवतातच.

भूमितीचा वापर, सातत्य (continuity) गृहीत मानल्याशिवाय करता येत नाही. वास्तवात अखंडता किंवा सातत्य नसते या आक्षेपाची दखल हिक्स घेतात. पर्याय म्हणून भूमिती आणि अर्थमिती यांचा संयुक्त वापर अधिक संयुक्तिक व उपयुक्त मानतात. प्रत्येक पायरी अर्थमितीने स्पष्ट करुन स्पष्टीकरणासाठी भूमितीचा वापर करावा असे ते सुचवितात. त्यांची ही सूचना व्यवहार्य व उपयुक्त ठरू शकते. हा समन्वयाचाच प्रयत्न आहे. उपभोक्त्याच्या वागणुकीकडून मागणीकडे जाण्यापेक्षा बाजार मागणीकडून त्याच्या वागणुकीकडे जाणे त्याना मान्य आहे. मात्र सॅम्युएलसनचे अभिव्यक्त पसंती प्रमेय ते पूर्णपणे स्वीकारीत नाहीत. अनिश्चित वैचारिकता किंवा गोंधळाची भूमिका येथे डोकावते.

3. त्यांचे हानीपूर्तीचे तत्त्व आणि तंत्र मात्र प्रभावी ठरले. ते सहज समजण्यासारखे आणि स्लस्ट्की तत्त्वापेक्षा अधिक उपयोगी असल्याचे कॉलडोरसारखे मान्यवर मानतात. खरे आहे की, किंमती (आणि/किंवा) उत्पन्न यात कोणताही बदल झाला असतांना उपभोक्ता किमान बदलपूर्व स्थितीतील समाधान पातळीवर कायम राहण्यासाठी प्रतिपूरक प्रयत्न करण्याची शक्यता अधिक असते. एका नुकसानाची भरपाई दुसरीकडे करण्याची प्रवृत्ती अगदी सहजोद्‌भव आणि नैसर्गिक आहे. म्हणून वास्तविक उत्पन्न परिणाम घटविताना उपभोक्त्याला पूर्वीच्या समाधान पातळीवर पोहचविण्याचा प्रयत्न स्वाभाविक व तंत्रदृष्टचा सुलभ वाटतो. पण ती केवळ किमान स्थिती असते. या तुलनेत उपभोक्त्याला पूर्वीचे परिमाण (हा पूर्व समाधानाचा बिंदूही असतो.) खरेदी करणे शक्य होईल अशा पातळीला पोहचविण्याचा स्लट्स्कीचा प्रयत्न अधिक वस्तुनिष्ठ वाटतो. कारण किमान पूर्वी इतके किंवा त्यापेक्षा जास्त समाधान मिळवून उपभोक्ता सापेक्ष किंमत बदलाची भरपाई करू शकतो हे त्यातून सिद्ध होते. जे अधिक संयुक्तिक आहे.

हिक्सने मागणीच्या पुन:र्मांडणीत अंगिकृत केलेल्या पद्धतीला स्लट्स्की तंत्र जवळचे आहे. सोबतच्या आकृतीत तसा एक प्रश्न केला आहे. किंमत कमी झाल्यामुळे वास्तविक उत्पन्नात झालेली वाढ स्लट्स्की तंत्राने घटवून मूळ A परिमाण घेता येईल अशा रीतीने प्राप्त केलेल्या किंमत रेषेवर उपभोक्ता सुसंगतीनुसार A ते E या भागात स्थिरावेल. जो भाग मूळ किंमत रेषेच्या उजवीकडे आहे. महत्तम व पूर्वीपेक्षा अधिक समाधान मिळविण्यासाठी प्रतिस्थापनाचा मार्ग अवलंबून तो A च्या ऐवजी अन्य रचना स्वीकारेल त्याला D म्हणूया. या मुळे हानीपूर्ती तर होतेच व अधिक समाधानही मिळते.

4. कल्याण क्षेत्रात हिक्स यांचे पसंतीश्रेणी तंत्र




उपयुक्त ठरते. अर्थात वैयक्तिक महत्तम समाधानाचे आणि निवडीचे हे तत्त्व समष्टी पातळीला लागू करतांना वैयक्तिक महत्तम समाधानाची बेरीज हे गणितीय समीकरण उपयुक्त नाही. सकल महत्तम समाधानाची अवस्था म्हणजे अधिकांचे अधिक समाधान या अर्थानेच केवळ कल्याण ही बाब साध्य व महत्त्वाची ठरू शकते. अन्यथा कल्याण कल्पनेचा विचार सोडावा लागेल कारण सर्व बाबींवर सर्वांची सहमती असंभव असते (ॲरो सिद्धता). उत्तरादाखल नोबेल विजेते अमर्त्य सेन यांनी कल्याणाला नैतिक आयाम देऊन ''ज्या जगात आपण राहतो ते जग विश्वसनीयतेला पात्र ठरण्यासाठी काही ना काही समान आधार अथवा मागणी असणार व ती सामाजिक नैतिकतेच्या कसोटीवर आधारलेली असणार..... तेव्हा जर समाजातील महत्तम लोकांची सकल स्तरावरील निवड एकाच दिशेने असेल तर ती निवड काहींना अमान्य असली तरी सामाजिक निवड ठरावी. (जर समाजाला बहुसंख्येने निर्णय पद्धती मान्य असेल तर)'' असे लोकशाहीचे सूक्त दिले. प्रत्यक्षात हे साध्य करण्यासाठी दुर्बल समानता (Weak Equity Axiom) सूत्राचा पर्यायी वापर करून संपूर्ण समाधानाच्या जवळपासचे समाधान कसे गाठता येते हे परेटो समिकरणांची पुनःमांडणी करून दाखविले.*

* $[U(y_1)\alpha^{-1}]U'(y_1)-[U(y_2)\alpha^{-1}]U'(y_1)U'(y_2)m)\alpha = 0$
जर $\alpha>0$ तर $m\alpha< 1$ and vice versa. etc.

त्यांनी परेटोच्या तंत्राला कल्याणाचा आयाम दिला आणि हिक्सच्या प्रतिपादनाला अर्थ पुरविला. हिक्स म्हणतात ''What begins as an analysis of the counsumer's choice among consumer goods ends as a theory of economic choice in general.''

पण परेटो-हिक्स-ॲलन तंत्राची किंवा तद्‌भव अभिव्यक्तीची महानता मान्य करण्याची आम्ही घाई तर करीत नाही ना, अशी शंका स्वतः हिक्स आमच्या मनात निर्माण करतात. ते तटस्थता तंत्राला मर्यादित स्वरुपात स्वीकारतात. तटस्थता वक्रांचा आसांशी बहिःर्गोल आकार त्यांना संभ्रमात टाकतो. केवळ तंत्राच्या सोयीसाठी गृहीत रूपाने तो स्वीकारतात. मात्र आपला वस्तुनिष्ठ मागणी वक्र मांडतांना उपभोक्त्याच्या वागणुकीतील सुसंगती नी विसंगती यावर भर देतात. काहींना ही एक कल्पनारम्यता वाटते. प्रस्तुत लेखकाच्या मते ही एका शास्त्रज्ञाची अस्वस्थता आहे. वास्तवाच्या जवळ जाण्याच्या दृष्टीने अनेक विचारांचा समन्वय साधण्याची ती धडपड आहे. या ठिकाणी हिक्स यांच्या सिद्धांताची विस्तृत चर्चा करणे शक्य नसल्याने एवढेच म्हणता येईल की वास्तवातील मागणीच्या जवळपास जाण्याचा प्रयत्न 'रिव्हिजन ऑफ डिमांड थिअरी' ग्रंथाने केला. त्याला परिपूर्ण प्रयत्न म्हणणे चूक होईल. उपभोक्त्याच्या वागणुकीमागे संपूर्ण अविभाज्य समाजव्यवस्था व तिची मानसिकता असते. मागणी केवळ उत्पन्न आणि सापेक्ष किंमती यात बसविता येत नाही. तसेच त्यामागे बुद्धिवाद असतोच असे नाही. उदाहरणार्थ सांप्रत जाहिरात युगात ग्राहक त्या गोष्टी घेतात की ज्या घेण्यास त्यांना भाग पाडले जाते. अत्यावश्यक उपभोगही बाजारपेठांच्या मर्जीने नियंत्रित होतो. उपभोक्त्याचे सार्वभौमत्व-नव्हे एकूण मानवी जीवन-या

बाजारपेठेकडे गहाण आहे. अशा स्थितीत सुसंगती किंवा तथाकथित निर्णयस्वातंत्र्य बाह्य प्रभावांनी नियंत्रित असते, स्वयंमेच्छाधिष्ठित किंवा बुद्धिनिष्ठ नसते. ॲडम स्मिथच्या कल्पनेतील स्वहिताची उपजत वास्तव जाण आणि सहजोद्भवता अभावानेच आढळते. त्यामुळे मागणीचा कोणताही सिद्धांत अपूर्ण आहे. हिक्स त्याला अपवाद नाहीत. हिक्स यांना त्रुटीचे भान आहे. प्रस्तावनेत ते म्हणतात, ''आम्ही माणसाच्या मेंदूत शिरण्याचा प्रयत्न केलेला नाही. त्याच्या बाह्य वागणुकीने ही सुसंगती सिद्ध होते का एवढाच प्रयत्न आहे; ते केवळ एक गृहीत आहे त्याहून अधिक काही नाही..... आमच्या संकलपनेतील आदर्श उपभोक्ता आणि वास्तवातील उपभोक्ता यातील अंतर स्पष्ट करण्यासाठी या सर्व गृहीतांचा उपयोग होऊ शकतो.'' या व्यापक मर्यादेत त्यांच्या पुनर्मांडणीने मागणी वक्राची चाकोरीबद्ध विश्लेषणातून सुटका केली. मनोनिष्ठ (उपयोगिता) नव्हे तर सुसंगत निवडीतून केलेली मागणी कशी असू शकेल हे मांडण्याचे श्रेय निश्चितच त्यांना आहे.

फ्रिज मॅक्लप एक मुद्दा असा उपस्थित करतात की ''हे सर्व केल्याचे'' हिक्सचे श्रेय मान्य करून एखादा वास्तववादी म्हणेल ''केले असेल, त्याचे काय ?'' म्हणजेच ''त्यातून नवीन आर्थिक नीती किंवा तत्त्वज्ञान जन्माला येत नाही. मग या परिश्रमांचे मूल्य कोणते ?'' नीती किंवा तत्त्वज्ञान रोज जन्माला येत नसते तेव्हा उपरोक्त वास्तववाद्याच्या मापाने मग सर्वच लेखन, ''केले असेल त्याचे काय?'' या सदरात मोडते. उत्तर स्वत: मॅक्लप पुरवितात. गृहीतांची संख्या मर्यादित करणे हे या प्रयत्नांचे मोठे श्रेय ते मानतात. समर्थनार्थ ते, बर्ट्रंड रसेल उद्धृत करतात :''Any reduction in number of undefined terms and unproved premises is an improvement since it diminishes the range of possible error and provides a smaller assemblage of hostages for the truth of the whole system'' हा मापदंड वापरून समग्र सत्यशोधनास मदत करणारे हिक्सचे परिश्रम निरर्थक नव्हते ही पावती मॅक्लप देतात. उपलब्ध लक्षावधी ग्रंथापैकी किती ग्रंथांबद्दल हे म्हणता येईल !

5. मूल्य क्षेत्रात हिक्स नवपरंपरागत अर्थशास्त्रज्ञांप्रमाणे वॉलराच्या बैठकीवर आपला मूल्य विचार आधारतात व गतिमान अवस्थेतील संतुलनापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करतात. हिक्स यांच्या मते, वॉलराने समस्यांची मांडणी करतांना गतिमानतेचा विचार केला नाही. वॉलराच्या काळात गणिताचा सर्वसामान्य संतुलनातील उपयोग मर्यादित होता यावर भर देऊन वॉलराची मर्यादा स्पष्ट करतांना (आणि बचाव करतांना) हिक्स मार्शलचे मत उद्धृत करतात: '' असे दिसून येते की अर्थशास्त्रातील शुद्ध गणिताचा उपयोग एखाद्या व्यक्तीला केवळ वेगाने, थोडक्यात व नेमकेपणाने लेखन करण्यापुरता आणि काही विचार स्वत:पुरते लिहिण्यासाठी आहे. शिवाय निष्कर्षासाठी त्याच्या जवळ पुरेसे आणि नेमके तेवढेच आधार असण्याची खात्री करून घेण्यासाठीसुद्धा गणिताचा उपयोग होतो (म्हणजे समीकरणांची संख्या त्याच्याजवळील अज्ञात पदांपेक्षा जास्त किंवा कमी नाही याची निश्चिती करून घेणे एवढाच उपयोग).'' हे केवळ 1890 पर्यंत सत्य आहे, अशी पुस्ती जोडून हिक्स गणिताची क्षमता याहून अधिक असल्याचे आवर्जून सांगतात. अर्थमितीकडे दुर्लक्ष झाल्याची खंत ते एके ठिकाणी व्यक्त करतात.

हिक्स यांनी विनिमय संतुलनाची कल्पना उत्पादन क्षेत्राला लागू केली. तेथेही प्रभावशाली उत्पन्नपरिणाम दुर्लक्षित केला. त्यामुळे त्यांचे उत्पादनाचे संतुलन देखील प्रतिस्थापन परिणामातून साध्य होते. पण उत्पादन घटकाचे पर्यायीत्व


मार्शलप्रणीत अर्थशास्त्रापासून आजतागायत एक चर्चेचा विषय आहे. त्यात गतिमानतेचा घटक येताच त्यासोबत येणारे तांत्रिक बदल लक्षात घेणे आवश्यक ठरते. आधुनिक उत्पादन तंत्रात भांडवलाने प्रत्यक्ष श्रमाचे प्रतिस्थापन पूर्ण लवचिक बनले आहे. (संगणकामुळे ही शक्यता अनंतपट झाली आहे). मनुष्यरहित कारखाने हे आज वास्तवात येत आहेत. लवकरच उत्पादनाच्या घटकांचे स्वरुप आणि रचना ठरविण्याची समस्या अर्थशास्त्राला सोडवावी लागणार आहे. श्रम हा घटक प्रत्यक्षात अभावाने आणि अप्रत्यक्षपणे भांडवली रूपात गुणात्मकतेने मोठ्याप्रमाणावर उपस्थित असेल. ही स्थिती उद्योग क्षेत्रात तरी सहज शक्य दिसते. मग नवीन अर्थशास्त्रज्ञ मूल्य या संकल्पनेचा फेर विचार कार्ल मार्क्सप्रमाणे करणार की मार्क्स ब्लॉगच्या अर्थाने, भांडवल किंवा कोणताही घटक वरकडमूल्य निर्माण करू शकतो ही संकल्पना घेऊन करणार ? श्रम या घटकाचे प्रत्यक्षात जवळपास पूर्ण उच्चाटन झाल्यावर पुढचा प्रश्न येतो तो वाटप कशाचे आणि कोणते ? या अवस्थेत असंख्य बेरोजगारांचे काय ? प्रश्न पोथीनिष्ठ साम्यवादी वाटू शकतो. पण वास्तव आहे. कल्पनेचा खेळ थोडा पुढे नेल्यास अशी अवस्था दूर नाही की केवळ 1 किंवा 2 प्रतिशत लोक उत्पादन साधनाचे मालक आहेत व आधुनिक संगणक तंत्राने अत्यल्प श्रमासह उत्पादन करीत आहेत. मग ग्राहक कोण ? उत्पन्न मिळवते हे 4 ते 5 प्रतिशत लोक अन्य 95 प्रतिशत लोकांचा भार उचलणार का ? हिक्सच्या किंवा कोणाच्याच मूल्य सिद्धांतात याची उत्तरे नाहीत. कारण मूल्य नि वितरणाचे स्वतंत्र कप्पे करून विचार करण्याची चुकीची प्रचलित पद्धत आहे.

अर्थात हिक्स स्वत: असा कोणताही तत्त्वज्ञानात्मक दावा करीत नाहीत. उलट दीर्घकालीन बदलांविषयी बोलतांना ते म्हणतात ''आमच्या गतिमानता सिद्धांताची तपासणी करतांना भांडवलशाही विकासाच्या ऐतिहासिक ज्ञानाचा उपयोग केला तरच आम्ही समाधानकारक आर्थिक तत्त्वज्ञान देऊ शकू.'' शिवाय ''भांडवलशाही सारखी कोणतीही म्हणजे खाजगी किंवा मुक्त उद्योग आणि मुक्त कर्ज पद्धती असणारी व्यवस्था कायम टिकेल हे गृहीत मानणे चूक आहे.'' मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद यापेक्षा वेगळे काय सांगतो !

6. सामान्य संतुलनाचा विचार मांडतांना हिक्स उपरोक्त भूमिकेशी सुसंगत ''परिपूर्ण स्पर्धेत अपरिपूर्ण स्थिरावस्था'' ही संकल्पना मांडतात. सामान्य संतुलनात उत्पन्न परिणाम आणि प्रतिस्थापन परिणाम यांचा सर्वप्रथम उपयोग करण्याचे श्रेय हिक्स यांना जाते (कॉलडोर). हिक्स यांची सामान्य संतुलनाबाबतची धारणा वैयक्तिक अंदाजपत्रकासारखी आहे. वैयक्तिक संतुलन 'क्ष' वस्तुच्या किंमतीचा 'य' वस्तुवर परिणाम इत्यादी, मार्गाने घडत जाते. त्याचेच काहीसे प्रतिबिंब सामान्य संतुलनात त्यांना दिसले.

याच अनुषंगाने, हिक्स यांनी नियंत्रणांचा वापर करून काही किंमती स्थिर ठेवल्यास प्रतिस्थापन परिणामातून सकल मूल्यस्तरात बदल कसा घडतो हे स्पष्ट केले. (आकृती मुळातील)

आकृतीत असे दर्शविले आहे की एखाद्या वस्तूची किंमत OLपातळीला नियंत्रित केल्यावर मागणीत वाढ झाली तरीही बाजार किंमतीत कोणताही बदल होत नाही. मात्र पुरवठा किंमत OM वरून OM इतकी होते. हिक्स या वाढीला छाया किंमत (shadow price) म्हणतात. या वस्तूचे ग्राहक सोडून बाजारपेठेतील अन्य सर्व घटक विशेषत: उत्पादक हा किंमत बदल लक्षात घेऊन आपले व्यवहार निश्चित करील व अंतिमत: होणाऱ्या परिणामाचे सर्वसाधारण नियंत्रण अयशस्वी होईल




असा अभिप्राय ते देतात. हे बदल उत्पन्न परिणामाच्या व्यतिरिक्त असतील. मागणी वाढल्याने या वस्तूचे उत्पादन जास्त होते अर्थात अन्य वस्तूंचे उत्पादन कमी होते, त्यांच्या किंमती वाढतात. तेंव्हा कोणतेही नियंत्रण यशस्वी होण्यासाठी ते सर्व वस्तूंना लागू करणे आवश्यक आहे. पण अशी सार्वत्रिक निश्चित किंमतींची योजना प्रत्यक्षात शक्य आहे का ? या प्रश्नाकडे हिक्स यांचा रोख दिसतो. शिवाय उत्पन्न प्रभाव दुर्बल असतो हे त्यातून सूचित होते.

7. स्थिर आणि गतिमान संतुलनात फरक करतांना हिक्स स्थळ('स्पॉट') आणि भावी ('फ्यूचर') अर्थव्यवस्था हे शब्दप्रयोग करतात. अवास्तव अशा गृहीतांवर त्यांचे विश्लेषण आधारलेले आहे. स्थिर अवस्था हा केवळ भ्रम आहे हे सिद्ध करण्यासाठी हिक्स मागणी पुरवठा बदलातून घडणाऱ्या अल्पकालीन संतुलनाची किंवा अस्थायी संतुलनाची विरोधाभासी कल्पना स्वीकारतात. संबंधीत व्यक्तींना बाजाराचे परिपूर्ण ज्ञान असते ही पाठ्य पुस्तकात आढळणारी कल्पनाही ते स्वीकारतात. हिक्स मानतात की केन्सने वर्णन केल्याप्रमाणे (रोख्यांची) आजची किंमत आणि परिकल्पकांच्या भविष्यकालीन अपेक्षा यातून आजचे वायद्याचे (भविष्य काळात पूर्ण करावयाचे) व्यवहार निश्चित होतात आणि या दोहोतील फरक म्हणजेच वर्तमान आणि भविष्य यात समन्वय साधण्यासाठी बचाव व्यवहार करणाऱ्यांनी परिकल्पकांना दिलेली किंमत असते. ही किंमत जेव्हा खूप जास्त वाटते तेव्हा बचाव व्यवहार करणारे व्यवहार करण्याचे टाळतात.

हिक्स म्हणतात भविष्यकालीन अनिश्चितता भांडवलशाहीत वायद्याच्या व्यवहारावर मर्यादा निर्माण करतात. त्यांच्या मते ही अनिश्चितता कोणत्याही अर्थव्यवस्थेत ''नियोजनाचा अभाव''

निर्माण करू शकते. अगदी समाजवादी अर्थव्यवस्था सुद्धा याला अपवाद नसते. कारण संकटकालीन ध्येये निश्चित असतात तेथे (ती पूर्ण करतांना) प्रश्न केवळ कार्यक्षमतेचा असतो. कार्यक्षमतेच्या बळावर वर्तमान नि भविष्य यात समन्वय साधून सक्तीची दीर्घकालीन स्थिरावस्था निर्माण करता येते. हिक्स म्हणतात '' अशा काळात शहाणा समाजवादी संचालक देखील नियोजनविरहिततेचा शिक्का मारता येईल अशी व्यवस्था अधिक पसंत करील; आणि ही व्यवस्था भांडवलशाहीपेक्षा अधिक श्रेष्ठ असणार नाही'' कारण कल्याण क्षेत्रात, प्रयत्नातून चुका आणि चुकातून सुधारणा("Trial & Error") हा प्रकार असतो. शिवाय हिक्स यांच्या मते, भांडवलशाहीत नियोजित उद्दीष्टांचा समन्वय साधणाऱ्या व्यवस्थेचा संपूर्ण अभाव गृहीत मानणे चूक आहे. जर सर्व अपेक्षा पूर्णांशाने बिनचूक असतील तर असंतुलन निर्माण होण्याचे कारण नाही असे त्यांना वाटते. भविष्यकालीन अंदाजांच्या अपूर्णतेतून निर्माण होणाऱ्या असंतुलनास हिक्स असंतुलन न मानता अपूर्ण संतुलन मानतात. असे असंतुलन फार तीव्र असत नाही ही धारणा ते बाळगतात. त्याच वेळी आपली वायद्याची अर्थव्यवस्था फारशी वास्तवाच्या जवळ नाही हेही मान्य करतात. यावर, अनिश्चिततेचा अभाव आणि सर्व व्यापाऱ्यांच्या ठिकाणी परिपूर्ण दूरदृष्टी गृहीत धरूनच ही संकल्पना मांडली जाऊ शकते अशी टीका प्रा. नाईट करतात. पण अशी गृहीते पूर्वीही करण्यात आली आहेत तेव्हा या गृहीतांसह आपली व्यवस्था सैद्धांतिक कारणासाठी उपयोगी ठरू शकते असे स्पष्टीकरण हिक्स देतात. स्थिर अर्थव्यवस्थेत किंमतींचा बदल झाला तर काय घडेल ही कल्पना करून ते आपल्या दृष्टिकोनाला उपयुक्त बनविण्याचा प्रयत्न करतात.


८. व्याजाच्या क्षेत्रात केन्सप्रमाणेच हिक्स यांनी मौद्रिक दृष्टिकोन स्वीकारला आहे. केन्सचा व्याज दर क्षेत्रातला वास्तविक सिद्धांताचा त्याग योग्य आहे पण त्यांची व्याज दर निश्चितीची रीती मात्र आपण स्वीकारणार नाही अशी प्रस्तावना करून हिक्स आपली व्याजाची संकल्पना मांडतात : पैसा ही केवळ टिकाउ वस्तू नाही. तर ते भविष्यकालीन उपयोगाचे एक सर्वात जास्त सुरक्षित साधन आहे. अन्य सर्व साधने अपूर्ण आहेत त्यात काही ना काही धोका संभव असतो. व्याज या अपूर्णतेची किंमत आहे. अन्य साधने सुरक्षितता घटकाबाबत अपूर्ण असल्याने व्याजदर भावात्मक असतो. ज्यावेळी पैसा या सर्वोत्तम अशा सुरक्षित साधनाची गरज नाही अशी खात्री होते त्यावेळी तो कर्जाने दिला जातो. व्याज या दोन पर्यायातील अस्वस्थतेवर अवलंबून असते (Price of impatience). दीर्घकालीन मौद्रिक दर व अल्पकालीन मौद्रिक दर असे दोन भाग करून ते व्याजाची चर्चा करतात. त्यातील संक्षेप असा :

* दीर्घकालीन दर स्थिर राहण्याकडे प्रवृत्ती असते. अल्पकालीन दर या दरापेक्षा नेहमी कमी असतो व तो सुरक्षित साधनात गुंतवण्यासाठी येणारा खर्च व संभाव्य धोक्याचा विमा या मर्यादेखाली जाणार नाही.

* विक्सेलने मांडलेला नैसर्गिक दर आणि वास्तव मौद्रिक दर यात फरक असून हे दर नेहमीच भिन्न असतात अपवाद केवळ त्यावेळी निर्माण होतो की ज्यावेळी मुद्रेचे मूल्य स्थिर असते. गतिमान अर्थव्यवस्थेत हा संभव कमी असतो.

* केन्सने ऋणनिधी सिद्धान्ताकडे दुर्लक्ष केले. परंतु दोन्ही सिद्धांत महत्त्वपूर्ण असून कोणा एकाची निवड ही केवळ सोयीची बाब आहे.

* निष्कर्ष हा की नजीकच्या भविष्यात बदल घडविण्याच्या दृष्टीने व्याजदर अत्यंत अलक्षणीय




घटक आहे तर धोका हा घटक इतका प्रभावी आहे की तो व्याज दराला दूरच्या काळावर प्रभाव टाकू देत नाही.

व्याज, उत्पन्न आणि भांडवल यांचा संबंध जोडतांना हिक्स यांनी केन्सच्या संकल्पना थोड्या बदलवून घेतल्या. ते अपेक्षित प्राप्तीच्या मालिकेचे वर्तमान मूल्य आणि वटाव दर यांचा संबंध वटाव दर आणि व्याज दर या गुणोत्तराने व्यक्त करतात. हिक्सची मूळ आकृती येथे दिली आहे. आकृतीत अपेक्षित प्राप्तीच्या मालिकेस अनुसरून, प्रत्येक संभाव्य गुणोत्तराला येणारे भांडवली मूल्य (वर्तमान मूल्य) RR या वक्राने दाखविले आहे. यावरून व्याज दर कमी झाल्यास (म्हणजेच वटाव गुणोत्तर वाढल्यास) भांडवली मूल्यात वाढ होते. SS वक्राने उत्पन्न पातळीला असलेले वर्तमान मूल्य दाखविले आहे. A बिंदूत दोन्ही वक्र परस्परांना छेदतात. वटाव गुणोत्तर वाढताच A बिंदू RR रेषेवर उजवीकडे म्हणजे अधिकच्या उत्पन्न पातळीवर सरकणार हे स्पष्ट आहे. अर्थात दोन्ही वक्रांच्या सापेक्ष लवचिकतांवर हे अवलंबून असेल. हिक्स यांनी लवचिकता मापनासाठी अपेक्षित प्राप्तीचा सरासरी काळ ही कल्पना वापरलेली आहे. सरासरी काळ कमी असेल तर व्याज दरातील वाढीने उत्पन्नात वाढ होईल इत्यादी. हे सर्व विस्ताराने लिहिण्याचे कारण वाचकाला यातील मांडणी व केन्सची मांडणी यांची तुलना करता यावी.

सकृत्‌दर्शनी व्याज दर उत्पन्न पातळीच्या संदर्भात निष्प्रभावी घटक असतो हा हिक्सचा निष्कर्ष केन्सप्रमाणेच आहे. पण कारण मिमांसा भिन्न आहे. जसे, केन्सने अल्पकाळात व्याजदराचा वैयक्तिक बचतीवर होणारा परिणाम प्रभावी मानला. व्याज दर बदलताच बचत प्रभावित होते पण घडून येणाऱ्या दोन परस्पर विरोधी प्रतिक्रियांमुळे समष्टी पातळीला एकूण प्रभाव जवळ जवळ शून्य होतो असा तर्क केन्स मांडतात. त्यांच्या मते भांडवली गुंतवण व्याज दरावर नव्हे तर सीमान्त लाभ क्षमतेवर पर्यायाने वस्तुंच्या मागणीवर अवलंबून असते. त्यामुळे व्याजदर स्वयमेव निष्प्रभावी असतो असे केन्स मानतात. हिक्स व्याज दराला पैशाच्या रोख्यातील गुंतवणुकीतील धोक्याच्या संकल्पनेशी जोडतात. अप्रत्यक्षपणे हा संबंध वस्तूगत व्यापाराकडे पोहचतोच. अप्रत्यक्ष संबंधातील दुवे क्षीण असतात हे लक्षात घेतले तर केन्सचा विचार वस्तूगत व्यवहाराच्या जवळचा वाटतो. हिक्सचा विचार शेअर बाजाराच्या उलाढालींशी अधिक जवळचा आहे. तो आधुनिक काळातील प्रत्यक्ष स्थिती दाखवितो. या फरकाव्यतिरिक्त व्याज दर निश्चिती सिद्धांतातही दोघांचे भेद स्पष्ट आहेत. ऋणनिधी आणि रोखता अभिलाषा सिद्धांतांना पर्याय मानणारे हिक्सचे मत ग्राह्य होऊ शकत नाही. कारण ऋणनिधी सिद्धांत पूर्णतः अल्पकालीनही नाही आणि मौद्रिकही नाही.

9. उपयोजित अर्थशास्त्रात (applied economics) अविकसित राष्ट्राच्या रोजगाराचा विचार करतांना (सिलोनच्या संदर्भात) काही मूलभूत आणि उत्तम सूचना त्यांनी केल्या आहेत. लोकसंख्यावाढीला कोणताही विकास अपुरा पडेल ही त्याची धोक्याची सूचना सत्य ठरली आहे. आत्मनिर्भरतेवर भर देणारा विकास त्यांना शक्य वाटत नव्हता. याच लेखात (इ.स.

1964 मध्ये) भारतासारख्या मोठ्या देशाने केवळ देशातच भांडवल निर्माण करण्यावर भर देणे चुकीचे व अपर्याप्त आहे असे मत मांडले. परकीय भांडवलाचा (खाजगी तसे शासकीय उद्योगात) आधार घेणे हा पर्याय अनिवार्य आहे, असे ते सुचवितात. त्यातून निर्माण होणाऱ्या शोधनशेषाच्या समस्यांवर उपाय शोधता येतील ही त्यांची आशावादी धारणा होती. भारताला त्याचे उत्तर सापडले नाही व सन 1990 ला भारतीय शोधनशेष समस्येचा कळस झाला. योग्य तथा अयोग्य नियंत्रणांच्या उच्चाटनात त्याचे पर्यवसान झाले.

10. अविकसित राष्ट्रासमोर आज उभ्या झालेल्या समस्यांचे आणि जागतिक व्यापार संघटनेत राहावे अथवा नाही या यक्ष प्रश्नाचे पूर्वाकलन हिक्स मध्ये दिसते. कधी ना कधी या राष्ट्रांना व्यापारी नियंत्रणे टाकून युरोपियन देशांप्रमाणे एकात्मिक आर्थिक जगाचा हिस्सा बनावा लागेल याची जाणीव त्यांना होती

11. सारांशाने, हिक्सचे सर्व लेखन वाचतांना असे लक्षात येते की, वास्तवातील गुंतागुंतीचे जितके जास्त पैलू एकाच वेळी लक्षात घेता येतील तेवढे घेण्याचा हिक्स यांचा हा प्रयत्न आहे. वास्तवाच्या अधिक जवळ जाणे हे त्यामागचे प्रयोजन आहे. हिक्स हे आपल्या लिखाणात नेहमीच नवनविन कल्पना मांडतात व त्यासंबंधी नवनविन सिद्धांताचे प्रतिपादन करतात.

अर्थशास्त्रीय सिद्धांताच्या क्षेत्रात हिक्स यांचे स्थान कोणते ? केन्सचे अनुयायीत्व, वॉलराचा विस्तार की परेटोची पुनःर्मांडणी, तंत्रसुधारणा की दृष्टिकोन सुधारणा ! हे सर्व तर आहेच परंतु महत्त्वाचे म्हणजे या सर्व प्रयत्नामागचा उद्देश ''अर्थशास्त्राची उपयुक्तता वाढविणे हा आहे.

## संदर्भ सूची


1. Hicks J. R. - Value And Capital, 2nd Ed.; Oxford University Press, Amen House London 1946.

2. Hicks J.R. - Capital And Growth; Oxford University Press, Ely House London, 1965.

3. Hicks J.R. - A Revision Of Demand Theory; Oxford University Press, Ely House London, 1965.

4. Briet, William and Hochman Harold-Ed,- Readings in Microeconomics ; Holt Rinehart And Winston, New York Inc. 1968

5. Meier, Gerald-Leading Issues in Development Economics ; Oxford University Press, New York, 1964.

6. Schumpeter J.A. - (Ed. Elizabeth Schumpeter)- History Of Economic Analysis; 8th print George Allen and Unwin Ltd. London 1972.


●●●

# भागरूपी विकल्प : संपन्नतेचा सोपान

● **शि. ना. माने**
*भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, सातारा.*

## प्रास्ताविक

एखादी नवी संकल्पना निव्वळ सोय म्हणून विशिष्ट ठिकाणी सुरू होते. हळुहळु तिचे सुविधेत रूपांतरण होते. किंवा तसा लोकभ्रम निर्माण केला जातो. अंतिमत: तिचा अतिरेक होऊन तिचे दुर्गुण दिसू लागतात आणि तिच्यात प्रथम सुधारणा करण्याच्या दृष्टिकोनातून व नंतर निरुपाय म्हणून तिला पर्याय शोधण्याच्या हेतुने उपाय सुचविले जातात. भागरूपी विकल्प (Stock option)ही अशीच एक संकल्पना आहे.

व्यवस्थापन गुरु जिम कॉलिन्स त्यांच्या "Good to Great" या प्रसिद्ध पुस्तकात म्हणतात ''आत्मकेंद्रित विलासात रमणे हे ज्या कंपन्यांच्या उच्चाधिकाऱ्यांचे अधिष्ठानमूल्य होते त्या कंपन्या निश्चितपणे उत्कृष्ट नव्हत्या''. दुसऱ्या शब्दात, त्याना त्यांच्या अभ्यासात असे आढळले की, ज्या कंपन्यांचे नेतृत्व विनम्र, काटकसरी व कामसू होते अशा चांगल्या कंपन्या महान झाल्या. त्यांची उपेक्षा करणाऱ्या कंपन्यांचे दिवाळे निघाले. क्रीस्लरचे ली-आयोका, एनॉनचे वित्तीय अधिकारी अँड्र्यु फॅस्टो व उच्चाधिकारी केन्नेथ ले, जी.ई.चे जॅक वेल्च तसेच वर्ल्डकॉम, ग्लोबल क्रॉसिंग, इत्यादी कंपन्या त्याची काही बोलकी उदाहरणे आहेत.

भागरूपी विकल्पाची (येथून पुढे भा.वि.) सुरूवात कधी झाली व ती कोणी केली, याविषयी निश्चितपणे विधान करणे कठीण आहे. परंतु दुसऱ्या जागतिक युद्धानंतर भा.वि. चा हळुहळु वापर करण्यात आला, अशी ढोबळ माहिती मिळते. आज निगम शासन (corporate governance) व संघटनविषयक वर्तन (organizational behaviour) या संकल्पना महत्त्वाच्या मानल्या जातात. त्याचे एक प्रमुख कारण आहे ते म्हणजे भा. वि. च्या माध्यमातून निर्माण होणारा निगम दुर्वर्तनाचा (corporate misbehaviour) प्रस्फोट. पाठ्यपुस्तकातील जिम कॉलिन्सप्रणित गुणसंपन्न नेते प्रत्यक्षात निष्प्रभ ठरत आहेत. आणि त्यांची जागा प्रवक्ते व अधिवक्ते घेत आहेत. विशिष्ट मर्यादेत या संक्रमणाचा संक्षेपात विचार करण्यासाठीच भा.वि. संकल्पनेची येथे निवड

केली आहे.

### अर्थ

बिझनेस एन्सायक्लोपीडिया (1997) मध्ये या संज्ञेचा पुढील अर्थ दिला आहे : ''सर्वसाधारणपणे विकल्प दिला गेला त्यावेळी प्रचलित असलेल्या निर्धारित किंमतीला भविष्यात भाग विकत घेण्याचा हक्क''. उदाहरणार्थ, अ एका कंपनीचा मुख्य कार्यकारी अधिकारी आहे असे समजू. बऱ्याच वर्षांपूर्वी अ ला त्याच्या कंपनीचे प्रति भाग रु. 25 किंमतीला 25,000 भाग खरेदी करण्याचा विकल्प देण्यात आला होता. आज प्रति भाग रु. 50 किंमत असताना अ 1,000 भाग खरेदी करण्याच्या विकल्पाचा वापर करतो. त्यावेळी रु. 50,000 मूल्याच्या भांडवलासाठी (रु. 50 X 1000 भाग) अ केवळ रु. 30,000 (रु. 30 X 1000 भाग) भरतो. अ ला बहाल केलेल्या हक्कानुसार तो सर्व 1000 भाग किंवा त्यांपैकी काही भाग विकू शकतो. समजा, जर अ ने आज सर्व 1000 भाग स्वत:कडे ठेवले, तर त्याला हक्कानुसार मिळालेली रु. 20,000 मूल्याची प्राप्ती (रु.50,000-रु.30,000)अ ची चालू वर्षाची कार्यकारी अधिकारी हानिपूर्ति किंवा क्षतिपूर्ति (executive compensation) मानली जाते. कार्यकारी अधिकारी म्हणून काम करताना अ ला नाजूक निर्णय घ्यावे लागतात. कर्मचाऱ्यांकडून त्यांची चोखपणे व वेळेत कार्यवाही करवून घ्यावी लागते. त्यांच्यात एकोपा निर्माण होईल व तो टिकेल, याची काळजी घ्यावी लागते. येणाऱ्या संकटावर किंवा अनिश्चिततेवर विजय मिळवावा लागतो. उत्पादकता, दर्जा, नवप्रवर्तन, छापनाम महिमा इत्यादींच्या बाबतीत निरंतरपणे प्रतिस्पर्धकाच्या पुढे धावणे अनिवार्य असते. या सर्व बाबी यथासांग पार पाडण्यासाठी कष्ट पडतात. त्याची शारीरिक व बौद्धिक हानी होते. तिची काही अंशी भरपाई करण्याच्या हेतुने भा. वि. अनुदानाची सुरुवात झाली व एक संकल्पना म्हणून ती रूढ झाली. अशाप्रकारे, भा.वि. चे समर्थन करण्यात येते. परंतु ते समर्थन खोडून काढण्याचेही प्रयत्न झाले. ते प्रयत्न व त्यांतून पुढे आलेले काही महत्वाचे आक्षेप यांचाच पुढील परिच्छेदांत विचार करु.

### आक्षेप

कंपनीतील कामगार व दुसरे कर्मचारीही शारीरिक व बौद्धिक हानी कमी-अधिक प्रमाणात सहन करतात. परंतु त्यांच्यासाठी भा.वि. च्या स्वरुपातील हानिपूर्ति सुविधा अस्तित्वात नाही. काही बिनीच्या कंपन्यांतील अधिकाऱ्यांनी व व्यवस्थापकांनी उपरिनिर्दिष्ट उदाहरणात उल्लेखित रु. 20,000 च्या स्वरुपातील मनमानी लाभ उकळले. काही लखपती तर काही करोडपती झाले. म्हणूनच या प्रक्रियेला 'व्यवस्थापकीय भांडवलशाही' (managerial capitalism) व त्या व्यवस्थापक/अधिकारी यांना 'व्यवस्थापकीय भांडवलदार (managerial capitalists) संबोधण्यात आले. भांडवलशाहीचा हा एक नवा अवतार आहे. भा.वि. च्या माध्यमातून जास्तीत जास्त कुशल व कार्यदक्ष मानवरुपी संसाधनांना कंपनीत आकर्षित करुन तेथे त्यांना टिकवून ठेवणे शक्य होते. परंतु या मुद्यावरही जोरदार आक्षेप घेतला जातो. भा.वि. लागू केलेल्या कंपनीतील अधिकारी/व्यवस्थापक यांचा पगार समभागांवर (equities) आधारित असतो. ते समन्यायाला(equity) धरुन नाही. आक्षेपांविषयीच्या या प्रारंभिक व सर्वसाधारण चर्चेच्या अनुषंगाने आता पुढील काही विनिर्दिष्ट (specific) आक्षेपांचे क्रमशः विश्लेषण करु.(1) भा.वि. लागू केलेल्या कंपनीतील अधिकारी व्यवस्थापक यांचे पगार सम भागांवर अवलंबून ठेवल्यामुळे अनिष्ट प्रोत्साहने (perverse

incentives) निर्माण होतात. सम भागांची किंमत जशी वाढते, तशी अधिकाऱ्यांच्या पगारात व संपत्तीत वाढ होते. वाईट मार्गांनी कंपनीच्या सम भागांच्या किंमती कृत्रीमपणे वाढविण्याची शर्यत सुरु होते. कृत्रीम तेजीचा फुगा फुटेपर्यंत तिला आवरता येत नाही. सुरुवातीला उल्लेख केलेल्या कंपन्या व त्यांचे अधिकारी, ही या अनिष्ट प्रोत्साहनांची बोलकी उदाहरणे आहेत.

(2) पहिल्या आक्षेपाचा परिणाम व दुसरा आक्षेप म्हणजे पैसा बाजारात/भांडवल बाजारात निर्माण होणाऱ्या अस्थिरतेच्या लहरी व लाटा. बाजारांचे स्थैर्य भंगते. गुंतवणूक करणाऱ्यांच्या विश्वासाला बाधा निर्माण होते. भंगलेल्या स्थैर्याची पुन:स्थापना करण्यासाठी गुंतवणूकदारांच्या बाजारातील 'कृतिवादावर' (activism) व कार्यशीलतेवर जोर देणारे वैधानिक उपाय सुचविले जातात. परंतु अनुभवाधिष्ठित पुरावा (empirical evidence) असे सांगतो की तथाकथित कृतिवाद विधिबद्ध करता येत नाही (one cannot legislate investors' activism as one cannot legislate good health).

(3) तिसरा व अखेरचा आक्षेप आहे परिव्यय लेखांकनाचे विरुपण (distortion) करण्यासंबंधीचा (cooking the books or fudging the figures). भा.वि.चे लाभार्थी अधिकतर लाभासाठी लेखांकन व लेखापरीक्षण यांची प्रमाणके (standards) धाब्यावर बसविण्याच्या निरनिराळ्या खटपटी करतात. त्या खटपटींचा विशेष म्हणजे भा.वि.ची कंपनीच्या वार्षिक हिशेबपत्रकात खर्चाच्या स्वरुपात नोंद करण्यात होणारी अक्षम्य टाळाटाळ/चालढकल. भा.वि.ची खर्च म्हणून नोंद न केल्यामुळे कंपनीचा नफा कृत्रीमपणे फुगविण्यात येतो. वास्तविक अर्थाने तोट्यातील कंपन्या नफ्यात असल्याचा आभास निर्माण केला जातो. मागील जवळ जवळ 50-55 वर्षांत रुढ झालेल्या भा.वि.ची खर्च म्हणून परिगणना करण्याच्या हेतुने अमेरिकेच्या काही सेनेट-सदस्यांनी प्रथमच जुलै 2002 मध्ये चर्चा घडवून आणली. परंतु ठोस निर्णय झाला नाही. याचे मूलभूत कारण कोणते असावे? निव्वळ 'असावा-नसावा' या दृष्टीकोनातून भा.वि. संबंधातील गुंता सोडविता येणार नाही. या प्रश्नाला महत्त्वाची एक सैद्धांतिक बाजूही आहे. तिचा येथे कमीत कमी शब्दात उल्लेख होणे आवश्यक आहे.

आताच आपण उल्लेख केल्याप्रमाणे जुलै 2002 मधील सेनेट-सदस्यांची भा.वि. विरोधी चर्चा विफल ठरली. कारण ? त्यापूर्वी 1972 मध्ये द फिनॅशिअल अकौटिंग स्टॅंडर्डस् बोर्डाने (FASB) असा निर्णय दिला होता की भा.वि. अनुदानांसंबंधातील (grants) आधार सामग्री (data) कंपन्यांकडून उपलब्ध नसल्यामुळे लेखापरीक्षकांना कंपन्यांच्या मोलाची (worth) परिगणना करणे शक्य झाले नाही परिणाम ? भा.वि. ला मोकळे कुरण मिळाले. तीन दशके जैसे थे स्थिती होती. त्यानंतर द इंटरनॅशनल अकौंटिंग स्टॅंडर्डस् बोर्डाने (IASB) भा.वि. अनुदानांच्या संबंधात नियमांचा/निर्बंधांचा मसुदा तयार केला. त्या मसुद्यानुसार कर्मचाऱ्याच्या पगाराप्रमाणेच भा.वि. अनुदानांची नोंद खर्चाच्या बाजुला करण्याचे संबंधित कंपन्यांवर निर्बंध लादणे सुलभ झाले. दरम्यानच्या काळात या सुधारणेला अमेरिकेत भांडवल बाजाराकडून हिरवा कंदील मिळाला. पूर्वी भा.वि. च्या समर्थकांकडून अशी भीति व्यक्त करण्यात येत होती की भा.वि. अनुदानांची कंपन्यांच्या हिशेबपत्रकांत खर्च म्हणून नोंद केल्यानंतर त्या कंपन्यांच्या भागांच्या किंमती घसरतील व नफा घटेल.

परंतु कोका-कोला व वॉशिंग्टन पोस्ट या कंपन्यांच्या भागांच्या किंमती, त्यांनी भा.वि. अनुदानांची खर्च म्हणून नोंद करुनही, घसरल्या नाहीत. आपण भा.वि. संकल्पनेचा सैद्धांतिक बाजुने विचार करीत आहोत. आणि त्या सैद्धांतिक विश्लेषणाच्या मार्गावरील मैलाच्या दगडापर्यंत आपण पोहोचलो आहोत. भा.वि. खर्चाच्या कराल प्रश्नाचे सम्यक दर्शन व्हावे या हेतुने हार्वर्ड बिजनेस रिव्हयुसारख्या (मार्च 2003) नियतकालिकाने आठ पाने (पूर्ण 9 पृष्ठे) खर्ची टाकली ("For the Last Time : Stock Options Are an Expense" by Zvi Bodie, Robert S. Kaplan and Robert C. Merton) आणि वाचक व धोरणकर्त्यांचे त्या प्रश्नाच्या सैद्धांतिक बाजुकडे लक्ष वेधले. त्या लेखात त्यांनी फिशर ब्लॅक, रॉबर्ट मेर्टन व मायरन स्कोल्स यानी 1973 मध्ये भा.वि. ची अचुकपणे परिगणना करण्यासाठी विकसित केलेल्या पद्धतीचा आधार घेतला आणि आपणास माहीत आहे की त्याबद्दल मेर्टन व स्कोल्स यांना अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकाने गौरविण्यात आले. असो.

विस्तारभयास्तव येथे HBR मधील लेखाच्या तपशीलात जाता येत नाही. म्हणून लेखातील निष्कर्षाचा सार उधृत करून अखेरच्या परिच्छेदाकडे वळू. मागील तीन दशकांत भा.वि. संकल्पनेविषयी निर्माण झालेला 'काथ्याकूट' किंवा 'शब्दच्छल' (Charade) संपविण्याची हीच वेळ आहे, असे सांगून लेखक म्हणतात "आम्ही मान्य करतो की विकल्प ही शक्तिशाली प्रोत्साहने आहेत.....परंतु आमचा असा विश्वास आहे की शक्तिशाली परिणामांना जन्म देणाऱ्या व्यवहाराची नोंद करण्यात विफल होणे आर्थिक दृष्टीकोनातून समर्थनीय ठरु शकत नाही...आज ज्या मार्गाने हानिपूर्तीचे कंपन्यांकडून वृत्त दिले जाते त्या मार्गाने नव्हे, तर त्या हानिपूर्ति पद्धतींच्या आर्थिक लाभांनुसार कंपन्यांनी त्यांची (हानिपूर्ति पद्धतींची) निवड केली पाहिजे." अशाप्रकारे, एक निव्वळ सैद्धांतिक बाब म्हणून भा.वि. विषयीचा वाद संपला, असे मानावयास हरकत नाही. प्रश्न आहे तो त्या पद्धतींच्या कार्यवाहीचा.

भा.वि. विषयीच्या या वाद-प्रतिवादापासून भारतीय उद्योग क्षेत्राने कोणता धडा घ्यावा ? आज भारतीय उद्योग क्षेत्रात भा.वि. विकाराची लागण झाली नाही, असे नि:संदिग्धपणे म्हणता येणार नाही. 2003-2004 च्या अर्थसंकल्पी अधिवेशनात कंपनीज (अमेंडमेंट) बिल 2003 मधील प्रमुख प्रस्तावित तरतुदींवर नज टाकल्यानंतर भा.वि.च्या तरंगापासून आज ते क्षेत्र मुक्त दिसले, तरी भविष्यात ते तरंग किंवा त्या लाटा निमाण होणार नाहीत या भ्रमात आज कोणी राहू नये. काही बिनीच्या कंपन्यांत भा.वि. सदृश तरंग अधून-मधून निर्माण होतात. समजा, काही कंपन्यांत भा.वि. विकाराची आज लागण झाली आहे. भविष्यात त्याने अक्राळ-विक्राळ रूप धारण करण्यापूर्वीच आपण सावध असणे श्रेयस्कर ठरावे. अन्यथा, 'मेंढपाळ व लांडगा' या रूपक कथेप्रमाणे प्रत्यक्षात लांडगा येऊनही मेंढपाळाच्या हाकेला प्रतिसाद देण्यासाठी त्यावेळी कोणीही तेथे असणार नाही.

## संदर्भ सूची

1. Business Encyclopedia, Knowledge Exchange, 1997.

2. Harvard Business Review, March, 2003, P.71.

3. The Economist, ("Stock options : Use and abuse") July 20-26,2002, P.14

●●●

टिपण

# जागतिकीकरण व भारतीय शेती

● **एम. एन. शिंदे**

*प्रपाठक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग क.भा.पा. कॉलेज,*
*उरुण-इस्लामपूर जि. सांगली.*

## जागतिकीकरणाचे धोरण व भारतीय शेती

जागतिकीकरणाची नीती ॲडम स्मिथच्या निरंकुशतेच्या धोरणावर (Laissezfaire) आधारलेली आहे. सनातनावाद्यांच्या व्यक्तीस्वातंत्र्य, निर्हस्तक्षेप धोरण व खुला व्यापार या धोरणामध्ये आजच्या जागतिकीकरणाची पाळेमुळे सापडतात. 18व्या शतकात सनातनवाद्यांच्या विचारावर आधारित खुली अर्थव्यवस्था प्रभावी होती, त्यातून भांडवलशाहीचा उदय झाला. भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या दोषांमधुन समाजवादी अर्थव्यवस्था निर्माण झाली. हस्तक्षेपनीती व संरक्षणवाद या काळात प्रभावी झाला. परंतु 20व्या शतकातील रशियाच्या विघटनानंतर संरक्षण नीती व समाजवादाचा प्रभाव नाहीसा झाला. 20व्या शतकाच्या शेवटी जागतिक अर्थव्यवस्थेत खुल्या आर्थिक धोरणाचा प्रभाव वाढत आहे.

आजच्या काळातील जागतिकीकरणाची संकल्पना 14 ऑगस्ट 1941 च्या अटलांटीक सनदेत सापडते. दुसऱ्या महायुद्धानंतर मागासलेल्या देशांच्या आर्थिक विकासासाठी आर्थिक धोरणे व व्यापारविषयक धोरणे कशी असावीत याबाबत विचारविनिमय सुरू झाला. जागतिक विकासासाठी अर्थपुरवठा करणाऱ्या विविध व्यापारी संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यातुनच 1944 मध्ये, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, 1947 मध्ये आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य गट वगैरेची स्थापना करण्यात आली. सन 1945 मध्ये अमेरिकेने ''प्रपोजल्स् फॉर एक्स्पान्शन ऑफ वर्ल्ड ट्रेड एम्प्लॉयमेंट'' या नावानी एक पत्रिका प्रसिद्ध करुन इतर राष्ट्रांच्या विचारार्थ पाठविली. त्यातून आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेची कल्पना साकारण्यात आली. ही संघटना स्थापन करण्यासाठी ऑक्टोबर 1946 मध्ये लंडन येथे पहिली बैठक झाली. त्यानंतर 1947 ला जिनेव्हा येथे दुसरी बैठक होऊन त्यामध्ये जागतिक व्यापार संघटनेचा अंतिम, मसुदा तयार करण्यात आला. त्याच वेळी 'गॅटची' चर्चा झाली व आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना स्थापन करण्याचे ठरले. परंतु अमेरिकेच्या ताठर भूमिकेमुळे तीची स्थापना झाली नाही. या संघटनेच्या स्थापनेची वाट पाहण्याऐवजी जकातदर कमी करणे, विदेशी

व्यापारावरील बंधने कमी करणे व खुल्या व्यापाराबाबत वाटाघाटी करण्याबद्दल नियम करण्यात आले. 30 ऑक्टोबर 1947 ला 23 देशांनी जिनेव्हा येथे जी परिषद घेतली त्यामध्ये ''जकाती व व्यापाराबाबतचा सर्वसाधारण करार'' (गॅट) करण्यात आला. युनोच्या हवाना येथील मार्च 1948 च्या परिषदेत आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेच्या अंतिम मसुद्यास मान्यता देण्यात आली. परंतु 1950 मध्ये अमेरिकेने या मसुद्याला मान्यता देण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना अस्तित्वात येऊ शकली नाही. म्हणून जागतिक व्यापाराच्या नियंत्रणासाठी गॅट करार करण्यात आला. या कराराची 1948 पासून धोरणात्मक अमलबजावणी करण्याचे ठरले. सन 1947 ते 1986 पर्यंत जागतिक व्यापाराबाबत चर्चेच्या आठ फेऱ्या झाल्या. सन 1986 मध्ये उरूग्वे येथे आठवी फेरी सुरु झाली व त्यामधुन डंकेल प्रस्ताव पारित झाला आणि जगातील जवळ जवळ सर्व देशांनी तो मान्य केला. या परिषदेस भारताचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी हजर होते. पुढे 1991 मध्ये गॅट कराराला अनुसरून त्यावेळचे पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी नवे आर्थिक धोरण स्वीकारले. गॅट करार हा ऐच्छिक स्वरुपाचा करार आहे. या करारात सामील होणाऱ्या देशांना काही फायदे मिळतात तसेच कांही बंधने देखील पाळावी लागतात. गॅट करारातून सुरूवातीला 1955 मध्ये शेती क्षेत्राला वगळण्यात आले होते. सन 1984 मध्ये अमेरिकेच्या व्यापारात 10 हजार कोटी डॉलर व 1987 मध्ये 16,000 कोटी डॉलरची तूट निर्माण झाली. त्यामुळे अमेरिकेने शेतमाल निर्यात वाढीसाठी गॅट कराराला मान्यता दिली. 24 एप्रिल 1994 रोजी मोरोक्कोची राजधानी 'मराकेश' येथे जागतिक व्यापारी संघटना करार झाला. 1 जानेवारी 1995 मध्ये जागतिक व्यापारी संघटना स्थापन करण्यात आली. ही संघटना जगातील व्यापाराचे नियंत्रण करते.

जागतिकीकरण म्हणजे खुली स्पर्धा व नवेतंत्रज्ञान या माध्यमातून उत्पादकता वाढविणे व संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणे होय.

जागतिकीकरणाद्वारे भारताचा जलद आर्थिक विकास घडवून आणता येईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. जागतिकीकरणामुळे विविध उत्पादन क्षेत्राची उत्पादकता वाढावी, देशांतर्गत उत्पादन तसेच निर्यातीत वाढ व्हावी ही अपेक्षा आहे. जागतिकीकरणाचे देशाच्या शेती क्षेत्रावर काय परिणाम झाले आहेत याची चर्चा या लेखामध्ये केली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळ ते 1991 पर्यंत भारताच्या देशांतर्गत उत्पादनात शेती क्षेत्राचा वाटा इतर क्षेत्रापेक्षा जास्त होता. सन 1980-81 च्या दशकात देशांतर्गत उत्पादनात शेती क्षेत्राचा वाटा 34.50% होता, 1991-92 मध्ये तो 30% होता, तर जागतिकीकरणाच्या 12 वर्षात (1991-92 ते 2001-02) देशांतर्गत उत्पादनातील शेती क्षेत्राचा वाटा सरासरी 26.82% राहिला आहे. शेती क्षेत्राच्या वाढीचा दर 1980-81 मध्ये 4.8% होता तो जागतिकीकरणाच्या काळात सरासरी 4.21% झाला. 2002-03 या वर्षात शेतीक्षेत्राच्या वाढीचा दर -3.1% राहिला. म्हणजे शेती क्षेत्राचा देशांतर्गत उत्पादनातील वाटा व वाढीचा दर या दोहोत जागतिकीकरणाच्या काळात घट झाली (तक्ता क्र.1).

याच काळात औद्योगिक क्षेत्राचा देशांतर्गत उत्पादनातील वाटा 26.26% वरून 26% व वाढीचा दर 7% वरून सरासरी 6% इतका कमी झाला. तर तृतीय क्षेत्राचा वाटा 42.63% वरुन 54.10% पर्यंत

तक्ता क्र. 1
देशांतर्गत उत्पादनातील क्षेत्रिय वाटा

| कालावधी | शेती व पूरक क्षेत्रे | | औद्योगिक क्षेत्र | | तृतीय क्षेत्र | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वाटा | वाढीचा दर | वाटा | वाढीचा दर | वाटा | वाढीचा दर |
| 1980-81 | 34.50 | + 4.8 | 26.26 | + 7 | 42.63 | +6.16 |
| 1991-92 | 30.00 | + 2.3 | 30.06 | + 1.9 | 45.4 | +4.6 |
| 1992-93 | 30.2 | + 6.1 | 30.2 | + 4.3 | 45.3 | +5.2 |
| 1993-94 | 29.5 | + 4.1 | 29.5 | + 7.6 | 45.7 | +7.1 |
| 1994-95 | 28.8 | +5.0 | 28.8 | +11.2 | 45.6 | +7.6 |
| 1995-96 | 26.0 | +0.9 | 26.0 | + 12.9 | 47.0 | +10.3 |
| 1996-97 | 26.1 | + 9.6 | 26.1 | + 6.6 | 47.1 | +7.8 |
| 1997-98 | 24.4 | + 2.4 | 24.4 | + 6.10 | 48.6 | +8.3 |
| 1998-99 | 26.4 | + 6.4 | ---- | ---- | ---- | ---- |
| 1999-00 | 25.2 | + 1.3 | 21.6 | +4.2 | 53.2 | +9.4 |
| 2000-01 | 24.2 | + 0.2 | 22.1 | + 6.2 | 53.7 | +5.0 |
| 2001-02 | 24.3 | +5.7 | 21.5 | + 2.9 | 54.1 | +6.2 |
| गेल्या 11 वर्षातील सरासरी | 26.82 % | + 4.21 | 26.0% | + 6.39 | 48.57% | +7.15 |

स्रोत : 1) RBI Annual Report Sept. 2000
2) RBI Hand book of statistics
3) Currency and finance, 1997-98

वाढला. या क्षेत्रातील वाढ 6.16% वरून 7.15% झाली. याचा अर्थ जागतिकीकरणाच्या काळात औद्योगिक क्षेत्राचा देशांतर्गत उत्पादनातील वाटा व वाढीचा दर थोडासा कमी झाला. मात्र तृतीय क्षेत्राचा वाटा व वाढीचा दर यात वृद्धी झाल्याचे दिसून येते. म्हणजे गेल्या 12 वर्षांच्या काळात शेती क्षेत्र व कारखानदारी क्षेत्रावर जागतिकीकरणाचा प्रतिकूल परिणाम घडून आला आहे.

जागतिक लोकसंख्येपैकी 25% लोकसंख्या व जगातील एकूण पशुधनाच्या 20% पशुधन भारतात आहे. त्यावरुन भारतीय शेतीचे महत्त्व दिसून येते. शेतीचा विकास खुंटल्यास त्याचा भारताच्या कारखानदारी, रोजगार, सेवा क्षेत्र इत्यादींवर प्रतिकूल परिणाम होतो.

जागतिकीकरणपूर्व व नंतरच्या शेतीक्षेत्राच्या वाढीचा दर पाहिल्यास असे दिसून येते की, सन 1980-81 ते 2000 ते 2001 या काळात शेती क्षेत्राच्या वाढीचा दर अनुक्रमे 6.2%, वरून 2.7% पर्यंत घसरला. याचा अर्थ शेतीक्षेत्राच्या जागतिकीकरण पूर्व वाढीचा सरासरी दर 4.9%, होता.तो जागतिकीकरणानंतर 4.3% झाला म्हणजे तो 0.6% ने कमी झाला (तक्ता क्र. 2.)

**तक्ता क्र. 2**

**शेती क्षेत्राच्या वाढीचा दर**

| कालावधी | वाढीचा दर |
|---|---|
| 1980-81--1984-85 | + 6.2 % |
| 1985-86 --1989-90 | + 3.6 % |
| 1990-91 -- 1994-95 | + 3.4 % |
| 1995-96 -- 1999-2000 | + 6.8 % |
| 2000-01 -- 2001-02 | + 2.7 % |
| वाढीचा सरासरी दर 1981-90 | + 4.9 % |
| 1991 ते 2002 | + 4.3 % |

साधने : i) CSO
ii) RBI-Hand Book Statistics 1998.
iii) RBI-Annual Report sept. 2000.

भारतासमोर अन्नधान्याच्या कमतरतेची समस्या नेहमीच राहिली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळ ते स्वातंत्र्यानंतरची काही वर्षे भारतात तीव्र स्वरुपाची अन्नसमस्या होती. या काळातील अन्नधान्य नीति अमेरिकेच्या सार्वजनिक कायदा 480 वर आधारलेली होती. देशातील अन्न समस्या सोडविण्यासाठी स्वातंत्र्यानंतर विविध प्रयत्न करण्यात आले. पहिल्या व तिसऱ्या योजनेत शेती विकासाला प्राधान्य दिले, 1961 चे नवे शेतीविषयक धोरण इत्यादी उपायांमुळे 1980च्या दशकात भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. आजच्या काळात गहू, तांदुळ, यांसारख्या अन्नधान्याची निर्यात भारत करतो. अन्नधान्याच्या उत्पादनातील वाढीचा दर हा शेती क्षेत्राची कार्यक्षमता दर्शवितो.

सन 1990-91 या वर्षी भारतात अन्नधान्याचे उत्पादन 175.36 दशलक्ष टन इतके झाले तर 2001-02 या वर्षात ते 211.30 दशलक्ष टन झाले. जागतिकीकरणाच्या काळात अन्नधान्याच्या उत्पादन वाढीचा दर -6.62% ते+10.50% या पातळीत राहिला. हा दर जागतिकीकरणाच्या काळात शेती उत्पादनात मोठ्या प्रमाणात झालेले चढउतार दर्शवितो. अशा रितीने जागतिकीकरण काळात अन्नधान्याच्या उत्पादनवाढीचा दर कमी झाला. (तक्ता क्र. 3)

तसेच अन्नधान्य व इतर पिकांच्या उत्पादनातील बदल जागतिकीकरणाच्या आधीच्या आणि नंतरच्या काळात झालेले बरेच चढउतार दर्शवितात.

अर्थव्यवस्थेतील भांडवलनिर्मिती व गुंतवणुकीचा दर देशाच्या आर्थिक विकासावर परिणाम करीत असतो. कोणत्याही क्षेत्रात भांडवल निर्मिती गुंतवणुकीचा दर मोठा असेल तर त्या क्षेत्राचा जलद विकास घडून येतो. या उलट हे दर कमी असतील तर त्या क्षेत्राचा विकास मंद गतीने होत असतो. शेती क्षेत्रातील भांडवल निर्मिती व गुंतवणुकीचा जागतिकीकरणानंतरचा दर

**तक्ता क्र.3**

**अन्नधान्य उत्पादन** दशलक्ष टन

| वर्ष | उत्पादन | वाढीचा दर |
|---|---|---|
| 1990-91 | 176.39 | + 3.61 |
| 1991-92 | 168.37 | - 4.50 |
| 1992-93 | 179.48 | + 6.50 |
| 1993-94 | 194.26 | + 8.20 |
| 1994-95 | 191.50 | -1.40 |
| 1995-96 | 180.41 | - 5.80 |
| 1996-97 | 199.43 | + 10.50 |
| 1997-98 | 192.34 | - 3.60 |
| 1998-99 | 203.60 | + 5.80 |
| 1999-2000 | 209.80 | + 3.04 |
| 2000-2001 | 195.90 | - 6.62 |
| 2001 - 2002 | 211.30 | + 7.80 |
| उत्पादन वाढीचा सरासरी दर | | + 1.8 |

स्रोत : 1) India 2002.
2) RBI Annual Report Sept. 2002.

**तक्ता क्र.4**

**शेती उत्पादन वाढीतील प्रवृत्ती**

| कालावधी | अन्नधान्य | इतर पिके |
|---|---|---|
| 1971-1980 | 2.08 % | 1.66 % |
| 1981-1990 | 3.54 % | 4.84 % |
| 1991-2002 | 1.80 % | *2.18 % |

* वाढीचा दर अंदाज काढलेला

स्रोत : Economic Survey 1998-99

कमी झाल्याचे दिसून येते. सन 1974-80 या काळात शेती क्षेत्रातील भांडवल निर्मितीचा दर 19.1% होता तो 1994-95 मध्ये 10% इतका झाला तर शेती क्षेत्रातील सरकारी गुंतवणूक 1985-86, 1993-94 व 1996-97 या वर्षात अनुक्रमे 1520 कोटी रुपये, 1,153 कोटी रुपये व 1,132 कोटी रुपये अशी कमी झाली म्हणजे जागतिकीकरणकाळात शेती क्षेत्रातील भांडवल निर्मिती व गुंतवणुकीवर प्रतिकूल परिणाम झाला. (तक्ता क्र. 5 व 6).

**तक्ता क्र.5**

**शेती क्षेत्रातील भांडवल निर्मिती**

| कालावधी | भांडवल निर्मिती दर |
|---|---|
| 1974-1980 | + 19.1 |
| 1994-1995 | + 10 |

स्रोत : International Food Policy Research Institute.

**तक्ता क्र.6**

**शेती क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूक**

(रु. कोटी)

| कालावधी | सार्वजनिक गुंतवणूक |
|---|---|
| 1985-1986 | 1520 |
| 1993-1994 | 1153 |
| 1996-1997 | 1132 |

स्रोत : Leading Issues in Agricultural Economics R.N. Soni, पृष्ठ क्र. 622-23

जागतिकीकरणामुळे भारतीय शेतकऱ्यांची उत्पादकता, स्पर्धात्मकता वाढावी ही अपेक्षा आहे. भारतीय शेतकऱ्यांची जागतिक बाजारपेठेतील स्पर्धात्मकता वाढल्यास शेती क्षेत्राची निर्यात वाढेल, देशाच्या एकूण निर्यातीमध्ये शेती क्षेत्राचा वाटा मोठा राहिल, देशाला मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळेल शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन गुणक परिणामाद्वारे शेती क्षेत्र व इतर क्षेत्रांचा विकास घडून येईल. गेल्या बारा वर्षांच्या जागतिकीकरण कालावधीचा विचार करता असे दिसून येते की, जागतिकीकरणपूर्व काळात सन 1970-71 व 1980-81 मध्ये भारताच्या एकूण निर्यातीत शेती क्षेत्राचा वाटा अनुक्रमे 31.7% व 30.6% होता. शेतीक्षेत्राचा एकूण निर्यातीतील वाटा जागतिकीकरणाच्या काळात 30.6% वरुन 13.4% इतका कमी झाला आहे. (तक्ता क्र.7)

**तक्ता क्र.7**

**देशाच्या निर्यातीमधील शेती क्षेत्राचा वाटा**

| कालावधी | शेती क्षेत्रातील निर्यातीचे मूल्य (को.रु.) |
|---|---|
| 1970-1971 | 487 (31.7) |
| 1980-81 | 2057 (30.6) |
| 1997-98 | 25,225 (17.8) |
| 1998-99 | 27,063 (18) |
| 1999-2000 | 24,301 (15.2) |
| 2000-01 | 27,288 (13.4) |
| 2001-02 | 27,923 (13.4) |

कंसातील आकडे एकूण निर्यातीशी टक्केवारी दर्शवितात

स्रोत: i) RBI Report Currency and Finance.

जागतिकीकरण म्हणजे सर्व क्षेत्रात असणारी तीव्र स्पर्धा होय. जो बळकट असतो तो या स्पर्धेमध्ये टिकतो. जागतिकीकरणामुळे अविकसित, विकसनशील व विकसित राष्ट्रांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे. ही स्पर्धा अशक्त व सशक्तांमध्ये आहे. अशक्त राष्ट्रांना या स्पर्धेमध्ये टिकून राहायचे असेल तर सशक्तीकरणाचे मार्ग शोधले पाहिजेत. त्यासाठी अविकसित राष्ट्रांनी शेती क्षेत्राला मोठ्या प्रमाणात अनुदाने द्यावीत, जी गॅट कराराच्या मर्यादेत बसतात. गॅट करार प्रत्येक देशाला त्यांच्या एकूण शेती उत्पादन मूल्याच्या 10% पर्यंत अनुदान देण्यास परवानगी देतो. भारतात दिली जाणारी शेती अनुदाने ही 10% पेक्षा कमी आहेत. काही बाबतीत तर ती उणे असल्याची दिसून येते. सन 1991-92 ते 2000-01 या काळात शेती क्षेत्रात शेतकऱ्यांना खतांसाठी दिलेली अनुदाने सरासरीने 2.8% राहिली. म्हणजे ती गॅटच्या 10% मर्यादेपेक्षा कमी आहेत. ज्या देशातील अनुदाने ही त्या देशाच्या शेती उत्पादन मूल्यांच्या 10% पेक्षा जास्त आहेत, त्या देशांनी अनुदाने कमी करावीत असे गॅट करार स्पष्ट करतो, ज्या देशांमध्ये ही अनुदाने प्रस्थापित मर्यादेपेक्षा कमी आहेत त्या देशांना अनुदाने वाढविण्यास गॅट करार संमती देतो. भारतात शेती अनुदाने 10% पेक्षा कमी असल्यामुळे सरकारने शेती अनुदानात कपात न करता ती 10% पर्यंत वाढवावीत, तरच भारतीय शेतकऱ्यांची उत्पादकता व स्पर्धात्मकता वाढेल अन्यथा जागतिकीकरणाचा भारताच्या शेतीवर विपरीत परिणाम घडून येईल. भारतात जागतिकीकरण काळात शेती अनुदानाचे प्रमाण घटले आहे.

गॅट करार येत्या 10 वर्षांत 24% आयात कर कमी करण्यास सांगतो, तसेच प्रत्येक सहभागी देशाने देशांतर्गत उपभोगाच्या 3% वस्तूंची आयात केली पाहिजे व पुढील 5 वर्षांच्या काळात आयातीचे प्रमाण 5% वाढविण्यास सांगतो. आयात कर कमी करणे हे देखील जागतिकीकरणाचे अंगभूत वैशिष्टचे होय. आयात कर कमी केल्यामुळे भारतामध्ये परदेशामधून दुध, सफरचंद, खाद्य तेल, रेशीम, केशर, साखर वगैरे वस्तू मोठ्या प्रमाणात येत आहेत व भारतीय शेती वस्तुंशी त्यांची स्पर्धा मोठ्या प्रमाणात होत आहेत. जागतिकीकरणामुळे भारतीय साखर व केशर उत्पादनावर अत्यंत वाईट परिणाम झाल्याचे दिसून येते. केशर हा मसाल्याचा पदार्थ होय. त्याचे उत्पादन भारतातील जम्मू व काश्मीर या राज्यात होते. भारतामध्ये उच्च प्रतीचा केशर उत्पादित केला जातो. या भारतीय केशराला जागतिकीकरणामुळे इराणमध्ये उत्पादित होणाऱ्या केशरशी तीव्र स्पर्धा निर्माण झाली

आहे. इराणचा केशर तुलनेने कमी प्रतीचा व स्वस्त असल्यामुळे भारतीय केशराच्या मागणीवर त्याचा प्रतिकूल परिणाम झाला आहे. आणखी काही काळ हीच स्थिती राहिल्यास भारतातील केशर उत्पादन धोक्यात येईल व त्याचा जम्मू काश्मीरमधील शेती क्षेत्रावर विपरीत परिणाम घडून येईल.

जागतिकीकरणामुळे भारतातील साखर उद्योगावर देखील आर्थिक संकट कोसळले आहे. युरोपियन राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेचे मूल्यावपाती विक्री सुरु केल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील उत्पादनापैकी 40% साखर उत्पादन हे युरोपियन राष्ट्रांच्या ताब्यात आहे. ही राष्ट्रे आंतरराष्ट्रीय बाजारात साखर प्रती टन 200 डॉलर या प्रमाणे विकतात तर देशांतर्गत बाजारपेठेत प्रतीटन 1200 डॉलरला साखरेची विक्री करतात. या दोन्ही किंमतीमधील फरक त्या देशांची सरकारे, अल्कोहल व इतर उपपदार्थावरील कर कमी करून भरून काढतात. युरोपियन राष्ट्रांचे मूल्यावपाती विक्री, साखरेची आयात यामुळे भारतीय साखर उद्योग धोक्यात आला आहे. महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, आंध्र, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यांवर साखर उद्योगाच्या आर्थिक संकटाचा प्रतिकूल परिणाम होऊन या राज्यातील ऊस शेती धोक्यात आली आहे.

जागतिकीकरणाच्या काळात भारतातील एकूण दारिद्रयात वाढ झाली. सन 1991-92 मध्ये भारतातील दारिद्र्याचे प्रमाण 40.7% होते ते सन 1998 मध्ये 43.01 % इतके वाढले. याच काळात ग्रामीण भागातील दारिद्र्याचे प्रमाण 41.70 % वरून 45.25 % इतके झाले तर शहरी भागातील दारिद्र्य 37.80 % वरुन 34.58% पर्यंत कमी झाले. याचा अर्थ जागतिकीकरणामुळे ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण वाढले व शहरी भागातील दारिद्र्याचे प्रमाण कमी होऊन ग्रामीण व शहरी भागातील आर्थिक विषमता वाढली.

जागतिकीकरणामुळे ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण वाढले याचाच अर्थ ग्रामीण भागातील शेतकरी, अल्पभूधारक, शेतमजूर, ग्रामीण कारागीर यांच्यावर प्रतिकूल परिणाम होऊन त्यांचे उत्पन्न घटले. परिणामी ग्रामीण लोकांची खरेदीशक्ती कमी झाली. त्यांची विविध वस्तूंची मागणी कमी होउन राहणीमान घटले. तसेच ग्रामीण लोकांची खरेदीशक्ती व मागणी कमी झाल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील आर्थिक मंदीची तीव्रता वाढण्यास मदत झाली. अशा रितीने भारतीय अर्थव्यवस्थेतील आर्थिक मंदी ही जागतिकीकरणाची देण होय. जागतिकीकरणाचा भारताच्या शेती व्यवसायावर व शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांच्यावर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

## संदर्भ सूची

1. Agarwal Ashish ' GATT AND THE DEVELOPING COUNTRIES, Mohit Publication, New Delhi (1994)

2. Devendra Sharma' GATT AND INDIA, The policy of Agriculture, Konark publishers pvt. Ltd. Delhi (1994).

3. Vishwanathan V.N. DUNKEL DRAFT, Academic Publishers New Delhi (1994).

4. INDIA 2002.

5. 'Datt R , K.P.M. Sundram' INDIAN ECONOMY, S. Chand and Company Ltd., New Delhi.

6. 'RBI Bulletin",Aug.2000 and Sept. 2002.

7. "Southern Economists", 15 Feb. 2000, June 15, 2000.

●●●

संकीर्ण

# कृषी उत्पादनातील बदल : मराठवाड्याच्या संदर्भात

● **एस.आर. टकले**
*अर्थशास्त्र विभाग प्रमुख, सरस्वती विद्या मंदिर कला महाविद्यालय, किनवट. जि. नांदेड*

## प्रस्तावना

भारतीय शेती क्षेत्रातून एकूण लोकसंख्येपैकी 65 टक्के लोकांना रोजगार पुरविला जातो. कृषी क्षेत्राच्या राष्ट्रीय उत्पन्नात असलेला हिस्सा 27 टक्के आहे. तसेच निर्यातीतील हिस्सा 15 टक्के (1999-2000) असल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान म्हणून ओळखली जाते, परंतु स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील रोजगार व निर्यातीतील हिस्सा कमी-कमी होत आहे. म्हणून कृषी क्षेत्रातील उत्पादन कमी तर झाले नाही ना अशी शंका निर्माण होते. परंतु स्थिती याउलट आहे. भारतात 1950-51 ला 50.8 दशलक्ष टन उत्पादन झाले होते तर 1999-2000 मध्ये 206 दशलक्ष टन एवढे उत्पादन वाढले म्हणजेच मागील 50 वर्षाच्या काळात 4 पटीने कृषी उत्पादनात वाढ झाली असे म्हणावयास हरकत नाही.या वाढीसाठी सिंचनक्षेत्रातील लक्षणीय वाढ, नवीन संशोधन, आधुनिक बियाणे, खते यांचा वापर, कृषीतील तंत्रज्ञानात झालेल्या सुधारणा, आधुनिक बाजारपेठा, इत्यादी घटक कारणीभूत आहेत.

अन्नधान्याच्या उत्पादनाच्या बाबतीत महाराष्ट्राचा विचार केला असता (1990-91 ते 1999-2000)ह्या दहा वर्षाच्या काळात 121.84 दशलक्ष टनावरून 126.99 दशलक्ष टन एवढी वाढ झाली (1%). याउलट अन्नधान्याच्या लागवडीखाली असलेल्या क्षेत्राचे प्रमाण (1990-1991) 143.99 लक्ष हेक्टरवरून (1999-2000) 136.42 लक्षहेक्टर इतके कमी झाले. म्हणजे लागवडीखालील क्षेत्रात घट होऊनही उत्पादन वाढले याचा अर्थ अन्नधान्याची उत्पादकता वाढली असे म्हणावे लागेल. प्रस्तुत शोधनिबंधात मराठवाड्यातील निवडक कृषी मालाच्या 90-91 ते 99-2000 या काळातील उत्पादकतेच्या आधारे येत्या दशकात (2000-2001 ते 2009-2010) कृषी उत्पादनात दुप्पट वाढ करणे शक्य आहे काय ? याचे विवेचन केले आहे.

कृषी अर्थशास्त्रीय सिद्धांताप्रमाणे कृषीउत्पादन दोन पद्धतीने वाढविता येते. (1) विस्तारित लागवड (2) सघन लागवड. पहिल्या पद्धतीत लागवडीखालील क्षेत्र वाढवून उत्पादन वाढविता येते तर दुसऱ्या पद्धतीत आहे त्याच क्षेत्रात आधुनिक तंत्राचा वापर करून कृषी उत्पादन वाढविले जाते. अलीकडे भारतासारख्या खंडप्राय देशातही पहिल्या पद्धतीचा वापर न करता दुसऱ्या पद्धतीनेच कृषी उत्पादन वाढविण्याचे शेतकऱ्यांचे व शासनाचे प्रयत्न होत असल्याचे दिसते. यासाठी सर्वात महत्त्वाचे

म्हणजे कृषीक्षेत्रातील गुंतवणुकीत वाढ होणे गरजेचे आहे. कारण कृषी क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणुकीचे प्रमाण फक्त 8 टक्के असून कृषीक्षेत्रातील प्रत्यक्ष गुंतवणूक व प्रत्यक्षात केलेली गुंतवणूक यात 41 टक्के एवढी तफावत आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

1. निर्देशांकाच्या साहाय्याने मुख्य पिकांच्या उत्पादकतेचा महाराष्ट्र व भारताच्या स्तरावरील स्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

2. चक्रवाढ वृद्धीदराच्या आधारे निवडलेल्या पिकांच्या उत्पादकतेतील बदलाचे विश्लेषण करणे.

3. येत्या दशकासाठी (2000-2001 ते 2001-2010) मागील दशकातील (90-91 ते 99-2000) उत्पादकतेच्या आधारे कृषी उत्पादनाच्या स्थितीचा अभ्यास करणे.

4. निवडलेल्या पिकांच्या उत्पादकतेत झालेले बदल तपासणे.

**संशोधन पद्धती :**

मराठवाड्यातील एकूण लोकसंख्येपैकी 82 टक्के लोकसंख्या ही कृषीक्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे मराठवाड्यात या क्षेत्राला निश्चितच महत्व आहे. या अभ्यासासाठी मराठवाड्यातील मुख्य 15 पिकांची निवड केली असून त्यांचे प्रमाण एकूण कृषी उत्पादनाशी 99-2000 मध्ये जवळ-जवळ 82 टक्के एवढे होते. अभ्यासासाठी निवडक पिकांच्या उत्पादकते विषयक आकडेवारीचा उपयोग केला आहे.1990-91 ते 1999-2000 या काळातील उत्पादकतेतील वाढ मोजण्यासाठी चक्रीय वृद्धीदर या सांख्यिकीय साधनाचा वापर केला असून, भारत व महाराष्ट्र पातळीवरील तुलनात्मक उत्पादकता मोजण्यासाठी निर्देशांकाचा वापर करण्यात आला आहे. हा बदल मोजताना दहा वर्षातील पिकांचे क्षेत्र व उत्पादन यांचा विचार करण्यात आला नाही.

कृषी उत्पादकता म्हणजे दर हेक्टरी उत्पादन होय, कृषी उत्पादकता दोन प्रकारे मोजता येते (1) पैशाच्या माध्यमाने कृषी उत्पादकता मोजणे व दुसरे भौतिक स्वरुपात कृषी उत्पादन मोजणे. उदा. मराठवाड्यातील 1999-2000 ची खरीप ज्वारीची उत्पादकता 1274 किलो प्रतिहेक्टर इतकी आहे. महाराष्ट्राची तीच उत्पादकता 1074 किलो प्रतिहेक्टर एवढी आहे. म्हणजेच महाराष्ट्रापेक्षा 16 टक्क्याने मराठवाड्याची खरीप ज्वारीची उत्पादकता जास्त आहे. इतर पिकांच्या बाबतीत त्याचे प्रमाण काय आहे हे बघू या.

**मराठवाड्यातील कृषी उत्पादकता : तुलनात्मक अभ्यास**

कोणत्याही प्रदेशाची कृषी क्षेत्रातील कार्यक्षमता व प्रगती मोजण्याचे एक प्रमुख मोजमाप म्हणजे त्या प्रदेशाची दर हेक्टरी कृषी उत्पादकता होय. तक्ता क्र.- 1 मध्ये मराठवाड्यातील प्रमुख 11 पिकांची दर हेक्टरी उत्पादकता किलोग्राम मध्ये दर्शविली असून प्रत्येक उत्पादकतेला 100 एवढा समान निर्देशांक दिला आहे उदा. मराठवाड्यातील गव्हाची दर हेक्टरी उत्पादकता 1201 किलोग्राम आहे. म्हणजेच मराठवाड्यापेक्षा महाराष्ट्र पातळीवरील उत्पादकता 14 टक्क्यांनी जास्त आहे त भारताच्या पातळीवर गव्हाची उत्पादकता मराठवाड्याच्या उत्पादकतेच्या सव्वादोनपटीने जास्त आहे. म्हणजेच भारत व महाराष्ट्र यांच्यापेक्षा मराठवाड्यातील गव्हाची उत्पादकता कमी आहे. अशाच प्रकारे काही पिकांच्या बाबतीत खालील निष्कर्ष काढता येतात.

1. मराठवाड्यात ज्वारी व बाजरी ही प्रमुख पिके समजली जातात म्हणून यासंदर्भात महाराष्ट्र व भारताच्या पातळीवरील उत्पादनापेक्षा मराठवाड्याची उत्पादकता जास्त दिसून येते. उदा. महाराष्ट्र-खरीप ज्वारी 1074 किलो (निर्देशांक 84) व भारत 1014 किलो (निर्देशांक 80), तर बाजरीच्या संदर्भात महाराष्ट्र 653 किलो (निर्देशांक 88) व भारत 639 किलो (निर्देशांक 86).

2. तांदळाच्या संदर्भात मराठवाड्यातील उत्पादकता फारच कमी आहे.(569किलो) महाराष्ट्र 1790 किलो (निर्देशांक 315) आणि भारताच्या पातळीवर

1990 किलो (निर्देशांक 350) एवढी दिसून येते.

3. तुरीच्या बाबतीत महाराष्ट्राचा निर्देशांक 117 असून भारताचा निर्देशांक 111 एवढा दिसून येतो. परंतु तुरीच्या तुलनेत भुईमुगाची उत्पादकता मराठवाड्यापेक्षा महाराष्ट्र पातळीवर 950 किलो (निर्देशांक 171) व भारत 774 (निर्देशांक 140) ने जास्त आहे. तर सूर्यफूल व करडी या तेल बियांच्या बाबतीत मराठवाड्याच्या जवळपास महाराष्ट्राची उत्पादकता आहे.

4. कापूस हे मराठवाड्यात महत्त्वाचे नगदी पीक मानले जाते. तरीही मराडवाड्याची कापसाची दर हेक्टरी उत्पादकता 119 लिंट आहे. महाराष्ट्र पातळीवर ती 162 लिंट (निर्देशांक 136) तर भारतीय पातळीवर 226लिंट(निर्देशांक 190) म्हणजेच मराठवाड्याच्या जवळजवळ दुप्पट उत्पादकता जास्त आहे.

5. अलिकडे ऊस हे नगदी पीक मराठवाड्यातील महत्त्वाचे मानले जात आहे. कारण मराठवाड्यात दर हेक्टरी 74 टन ऊस उत्पादन होते तर महाराष्ट्र पातळीवर 90 टन (निर्देशांक 122) व भारताच्या पातळीवर प्रतिहेक्टरी 71 टन ऊस (निर्देशांक 96) एवढी उत्पादकता आहे. अर्थातच भारतापेक्षा जवळपास जास्त परंतु उर्वरित महाराष्ट्रापेक्षा ऊसाची उत्पादकता कमी आहे.

6. मराठवाड्यातील प्रमुख 11 पिकांचा सरासरी निर्देशांक 100 गृहीत धरल्यास राज्याच्या 11 पिकांचा सरासरी निर्देशांक हा 135 येतो तर भारताच्या पातळीवर 9 पिकांचा सरासरी निर्देशांक हा 164 येतो. या ठिकाणी ढोबळ मानाने विचार केला असता मराठवाड्यापेक्षा महाराष्ट्राची 35 टक्क्याने व भारताची 64 टक्याने उत्पादकता जास्त आहे असे म्हणता येईल.

7. फक्त अन्नधान्य व तेलबिया यांचा विचार केला असता महाराष्ट्राची दर हेक्टरी उत्पादकता अनुक्रमे 931,974 किलो (निर्देशांक 152, 168) व भारताची अनुक्रमे 1697,856 किलो (निर्देशांक 276,148)एवढ्याप्रमाणात दिसून येते.

**मराठवाड्यातील कृषी उत्पादन दुप्पट करणे शक्य आहे काय ?**

मराठवाड्यातील येत्या दशकात कृषी उत्पादन दुप्पट करावयाचे झाल्यास प्रत्येक पिकांच्या वृद्धीवर चक्रवाढदराने किमान दहा वर्षात 7.2 असला पाहिजे तरच येत्या दशकात (2000-2001ते 2001 ते 2010) कृषी उत्पादन दुप्पट होईल. यासाठी मागील दहा वर्षातील (90-91 ते 99-2000) चक्रवाढ वृद्धीदराचा विचार करणे गरजेचे आहे. तक्ता क्र. 2 मध्ये मराठवाड्यातील मुख्य 15 पिकांच्या उत्पादकतेचा चक्रवाढ वृद्धीवर दिला आहे त्यावरून खालील निष्कर्ष काढता येतील.

1. तक्ता क्र.2 मध्ये दर्शविलेल्या चक्रवाढ वृद्धीदरावरून फक्त तुरीच्या उत्पादकतेत दुपटीपेक्षा (7.2 टक्क्यांपेक्षा) वाढ झालेली आहे. उदा. तुरीची दर हेक्टरी उत्पादकता 254 किलोवरून 715 किलो एवढी झाली याचाच अर्थ तुरीच्या उत्पादनात येत्या दशकात दुपटीपेक्षा जास्त वाढ होईल.

2. कापूस व सोयाबीन या पिकांच्या उत्पादकतेत निश्चित दरापेक्षा (7.2 टक्के) थोड्या कमी प्रमाणात वाढ झालेली आहे. उदा. कापसाची उत्पादकता दर हेक्टरी 102 लिंट वरून 119 लिंट एवढी झाली (चक्रवाढ वृद्धीदर 5.4) तर सोयाबीनची उत्पादकता प्रती हेक्टी 1429 किलो वरून 3015 किलो एवढी झाली (चक्रवाढ वृद्धीदर 5.1) यावरून या दोन्ही पिकांच्या उत्पादनात येत्या दशकात दुप्पट होण्यास वाव असून त्यासाठी अधिक भांडवल, तंत्रज्ञान, नवीन बियाणे, खते व सक्षम बाजारपेठ यांची आवश्यकता आहे.

3. याउलट काही पिकांच्या बाबतीत विचार केला असता मागील दहावर्षातील चक्रवाढ वृद्धीदर अल्प दिसून येतो. उदा; गहू (2.3 टक्के), बाजरी (3.6 टक्के) खरीप भूईमूग (1.2 टक्के) आहे तर याहीपेक्षा फारच नगण्य वृद्धीदर असणारी पिके पुढील प्रमाणे सांगता येतील. उदा: खरीप ज्वारी (0.6 टक्के), रब्बी ज्वारी (0.5 टक्के), उडिद (0.5 टक्के) व करडी (0.7 टक्के) या पिकांच्या उत्पादकतेत मोठ्या

प्रमाणात वाढ होणे गरजेचे आहे.

4. वरील तक्त्यावरून आणखी एक महत्त्वाचा निष्कर्ष काढता येईल. काही पिकांची उत्पादकता सतत घसरल्यामुळे त्यांचा वृद्धीदर उणे आहे. उदा. तांदुळ -2.8 टक्के, मुग -2.8 टक्के, रब्बी भूईमूग -3.9 टक्के, सूर्यफूल -1.2 टक्के टक्के व ऊस -0.3 टक्के.

वरील वृद्धीदराच्या आकडेवारी वरून प्रमुख निष्कर्ष खालील प्रमाणे काढता येतील.

1. तूर या पिकाचा वृद्धीदर (7.2 टक्क्यांपेक्षा) जास्त असल्यामुळे पुढील दहावर्षात तुरीच्या उत्पादनात निश्चितच वाढ होईल.

2. सोयाबीन व कापूस यांचे वृद्धीदर (7.2 टक्के)च्या जवळजवळ असल्यामुळे येत्या देशकात त्यांचे उत्पादन दुप्पट करणे शक्य आहे.

3. गहू, बाजरी, खरीप भूईमूग यांचा वृद्धीदर मध्यम असल्यामुळे यांचेही उत्पादन येत्या 10 वर्षात वाढ करणे शक्य होईल परंतु खरीप ज्वारी, रब्बी ज्वारी, उडीद व करडी या पिकांचे वृद्धीदर अत्यंत नगण्य असल्यामुळे या पिकांच्या उत्पादकतेत वाढ करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील.

4. तांदूळ, मूग, रब्बी भूईमूग, सूर्यफूल व ऊस या पिकांच्या उत्पादकतेचा वृद्धीदर उणे असला तरीही याची उत्पादकता वाढविणे गरजेचे आहे.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, मराठवाडा हा कृषी उत्पादनाच्या बाबतीत मागासलेला असून मराठवाड्यातील दर हेक्टरी उत्पादकता दुप्पटीपेक्षा अधिक करण्यात वाव आहे.

**कृषी उत्पादन वाढीतील प्रमुख अडचणी :**

तूर, सोयाबिन, कापूस या पिकांचा वृद्धीदर सोडला तर ऊस, सूर्यफूल, ज्वारी, भूईमूग या सारख्या महत्त्वाच्या पिकांचा वृद्धीदर फारच निराशाजनक वा उणे आहे. अर्थात तो कमी असण्याच्या प्रमुख अडचणी पुढील प्रमाणे सांगता येतील.

1. विशेषत: मराठवाड्यातील कृषीक्षेत्रात जलसिंचनाचे प्रमाण कमी असल्यामुळे अल्पकाळात उत्पादन होणाऱ्या पिकांकडे येथील शेतकऱ्यांचा जास्त कल आहे. उदा. बाजरी, ज्वारी वगैरे.

2. जलसिंचनाखाली असलेल्या जमीनीचे प्रमाण (98-99 मध्ये 18 टक्के) कमी असल्यामुळे दुबार पिके घेता येत नाहीत.

3. भांडवल गुंतवणुकीचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे.

4. सरकार, सहकार व बँकाकडून होणारा कर्जपुरवठा कमी आहे व जो आहे त्याचे वसुलीचे प्रमाण कमी असल्यामुळे पुन:कर्ज मिळत नाही.

5. अनियमित पावसाचे प्रमाण.

6. आधुनिक खते, बियाणे, औषधी, व तंत्रज्ञान याचा अभाव.

7. कृषी विभागाने निश्चित केल्याप्रमाणे पीक रचना केली जात नाही, तसेच त्यांच्या सूचनेनुसार लागवडीसाठी बियाणे किंवा खतांचा वापर होत नाही याचा परिणाम उत्पादकतेवर होतो.

8. पाणीवापरात बचतीचा अभाव उदा. ठिंबक सिंचन, तुषारसिंचन यांचा अवलंब होत नाही.

9. अजूनही बाजारापर्यंत जाण्यासाठी पक्के रस्ते खेड्यांना जोडलेले नाहीत. तसेच शीतगृहे, गोडाऊन, यांचा अपुरा पुरवठा बाजारभावाविषयी माहिती या बाबींचा अभाव.

मराठवाड्यातील कृषी उत्पादन दुप्पट करावयाचे असल्यास वरील अडचणी सोडवून पुढील प्रमाणे सुधारणा/उपाययोजना करूनच हे उद्दिष्ट साध्य करता येईल.

तक्ता क्र. 2 मध्ये मराठवाड्यातील प्रमुख 15 पिकाचा चक्रवाढ वृद्धीदर काढला आहे. त्यावरून असे स्पष्ट झाले की फक्त तीन पिकांच्या बाबतीत आपण येत्या दशकात कृषी उत्पादन दुप्पट करु शकू. परंतु ज्यांचा वृद्धीदर फारच नगण्य किंवा उणे आहे अशा पिकांच्या बाबतीत उत्पादकतेत वाढ करण्यासाठी खालील उपाययोजना करणे उचित

ठरेल.

1. मराठवाड्यातील पूर्ण जमीन लागवडी खाली आलेली नाही. पाणलोट क्षेत्राच्या संदर्भात विचार केला असता मार्च 98 अखेर 11.53 लक्ष हेक्टरवर हा कार्यक्रम राबविला असून, अजून 43.82 लक्ष हेक्टर जमीन शिल्लक आहे.

2. मराठवाड्यात 1998-99 या वर्षापर्यंत 18% एवढी जमीन सिंचनाखाली होती हे प्रमाण 2005 पर्यंत 25% वाढविणे शक्य आहे.

3. भूजलसाठ्याचा पूर्ण वापर करून सिंचन क्षमता वाढविता येते कारण 98-99 पर्यंत विहीरी खालील क्षेत्र मराठवाड्यात फक्त 27.6 टक्के एवढे होते.

4. पाण्याच्या वापराच्या आधुनिक पद्धतीचा अवलंब करून पाण्याची बचत करता येते. उदा. ठिबक सिंचन, तुषार सिंचन वगैरे.

5. कृषी विभागाने, कृषी विद्यापीठाने किंवा अधिकृत कृषी कंपन्यांनी, सुचविल्या प्रमाणे पीक लागवड करण्याची पद्धती, बियाणे, खते, औषधी यांचा वापर केल्यास कृषी उत्पादकतेत वाढ करणे शक्य होईल.

6. भारतीय कृषी क्षेत्रात भांडवलाचा पुरवठा फारच अपुरा असून कृषीक्षेत्रातील भांडवलपुरवठा वाढविणे गरजेचे आहे. कारण यामुळे कृषी उत्पादनासाठी नवीन संसाधने उपलब्ध होऊन उत्पादकतेत वाढ करता येईल.

7. अजूनही मराठवाड्यात काही उत्पादनाला प्रमुख बाजारपेठ नाही. उदा. केळी. दुसरे म्हणजे कृषी पूरक उद्योगांचा अभाव असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या कृषीमालाला योग्य किंमत मिळत नसल्यामुळे कृषी व्यवसाय हा सतत तोट्यात चालतो.

8. कृषी उत्पादन वाढविण्यासाठी वरील उपायांबरोबरच, कृषीमालाची व बाजारातील साठवणुकीची व्यवस्था, शीतगृहे, वाहतूक व्यवस्था याबाबी सुद्धा आवश्यक आहेत.

9. खुल्या अर्थव्यवस्थेत कृषी उत्पादन दुप्पट झाले तर त्याचा परिणाम हा कृषी मालाच्या किमतीवर हो तसेच उत्पादकतेवरही होतो, म्हणून, यासाठी शासनाने पीकवार योग्य अशा आधारभूत किंमती देणे गरजेचे आहे.

10. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात कृषी विषयक सर्व माहिती ग्रामपातळीवर पोहचणे गरजेचे आहे. उदा.कृषीमालाचे भाव, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर माल नेण्यासाठी जिल्हा/तालुका स्तराव ''कृषी मालनिर्यात सहकारी संस्था'' स्थापन करून अशा संस्थावर विपणनातील तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करावी.

## सारांश

मराठवाड्यातील मुख्य पिकांच्या उत्पादकतेचा वृद्धीदर फारच निराशाजनक आहे की,ज्यामध्ये तीन पिकांचा अपवाद सोडता सर्वच पिकांची उत्पादकता येत्या दशकात दुप्पट होईल काय?हा प्रश्न पडतो. परंतु यावरून असे दिसून येते की मराठवाड्यातील कृषीउत्पादन वाढविण्यास अधिक वाव आहे. याची नोंद घेऊन व जागतिक अर्थव्यवस्थेत होणारे बदल लक्षात घेता येत्या दशकात कृषीउत्पादन दुप्पट करणे शक्य होईल.

## संदर्भ

1. अहवाल : भारताची आर्थिक पाहणी (2000-2001)

2.अहवाल कृषी सहसंचालक विभागीय कार्यालय, औरंगाबाद (1999 ते 2000)

3. Indian Journal of agricultural marketing vol.-14, No.3 Sept. Dec.2002

4. कुलकर्णी भुजंगराव : मराठवाडा विकास : अभ्यास व चिंतन

5.प्रबोधन प्रकाशन ज्योती : नवे शेती धोरण, ऑक्टोबर/नोव्हेंबर 2000.

6. मराठवाडा वैधानिक विकास मंडळ पुरस्कृत प्रकल्प, जालना जिल्ह्याची बहुआयामी योजना.

7. मराठवाडा 2000 मधील विभाग - 3 शेती

8.साधना : मराठवाडा अनुशेष विशेषांक

**तक्ता क्र. 1**

**तुलनात्मक दर हेक्टी उत्पादकता (किलो) 1999-2000 मराठवाडा, महाराष्ट्र व भारत**

| अ.क्र. | पिकांचे नाव | मराठवाडा | निर्देशांक (100) | महाराष्ट्र | निर्देशांक | भारत | निर्देशांक | मराठवाड्याच्या कितीपट उत्पादकता आहे | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | महाराष्ट्र | भारत |
| 1 | ज्वारी खरीप | 1274 | 100 | 1074 | 84 | 1014 | 80 | 16 टक्के कमी | 20 टक्के कमी |
| 2 | ज्वारी रब्बी | 768 | 100 | 658 | 86 | 716 | 93 | 14 टक्के कमी | 7 टक्के कमी |
| 3 | गहू | 1201 | 100 | 1369 | 114 | 2755 | 229 | 14 टक्के जास्त | सव्वा दोन पट जास्त |
| 4 | तांदूळ | 569 | 100 | 1790 | 315 | 1990 | 350 | 215 टक्के जास्त | सव्वा तीन पट जास्त |
| 5 | बाजरी | 743 | 100 | 653 | 88 | 639 | 86 | 12 टक्के कमी | 14 टक्के कमी |
| 6 | तूर | 715 | 100 | 834 | 117 | 797 | 111 | 17 टक्के जास्त | 11 टक्के जास्त |
| 7 | भूईमूग | 554 | 100 | 950 | 171 | 774 | 140 | 71 टक्के जास्त | 40 टक्के जास्त |
| 8 | सूर्यफूल | 535 | 100 | 523 | 98 | - | - | समान | - |
| 9 | करडी | 516 | 100 | 550 | 107 | - | - | 7 टक्के जास्त | - |
| 10 | कापूस (लिंट) | 119 | 100 | 162 | 136 | 226 | 190 | 36 टक्के जास्त | दोन पट जास्त |
| 11 | ऊस (टनात) | 74 | 100 | 90 | 122 | 71 | 96 | 22 टक्के जास्त | समान |
| 12 | एकूण अन्नधान्य | 614 | 100 | 931 | 152 | 1697 | 276 | दीडपट | पावणे तीन पट |
| 13 | एकूण तेलबिया | 580 | 100 | 974 | 168 | 856 | 148 | 68 टक्के जास्त | दीडपटीने जास्त |
| 14 | सरासरी निर्देशांक | - | 100 | - | 135 | - | 164 | 35 टक्के जास्त | 64 टक्के जास्त |

कापूस लिंट मध्ये मोजलेला आहे. ऊसाची उत्पादकता टनात मोजली आहे.

टीप. 1. विभागीय सहसंचालक कृषी कार्यालय औरंगाबाद
2. भारताची आर्थिक पाहणी 2000-2001
3. निर्देशांक स्वत: काढलेले आहेत. मराठवाड्यासाठी निर्देशांक 100 घेतला आहे.

तक्ता क्र. 2

मराठवाड्यातील 1990-91 ते 1999-2000 (दहा वर्षांची) दरहेक्टरी उत्पादकता (किलो) व वृद्धीदर

| पिकांचे नाव | 1990-91 | 91-92 | 92-93 | 93-94 | 94-95 | 95-96 | 96-97 | 97-98 | 98-99 | 99-2000 | चक्रवाढ वृद्धीदर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्वारी खरीप | 1141 | 902 | 1748 | 1386 | 1280 | 1339 | 1659 | 1074 | 1167 | 1274 | 0.6 |
| ज्वारी रब्बी | 690 | 439 | 688 | 768 | 653 | 687 | 767 | 385 | 647 | 768 | 0.5 |
| गहू | 919 | 824 | 1105 | 1249 | 1475 | 1153 | 1342 | 676 | 1269 | 1201 | 2.3 |
| तांदूळ | 991 | 288 | 743 | 760 | 772 | 558 | 739 | 434 | 470 | 569 | -2.8 |
| बाजरी | 575 | 358 | 970 | 920 | 557 | 738 | 1030 | 635 | 744 | 743 | 3.6 |
| तूर | 254 | 231 | 350 | 453 | 317 | 391 | 557 | 290 | 761 | 715 | 11.12 |
| मूग | 309 | 240 | 563 | 555 | 280 | 369 | 456 | 115 | 540 | 348 | -2.0 |
| उडीद | 406 | 249 | 565 | 621 | 344 | 363 | 536 | 197 | 599 | 407 | 0.5 |
| भूईमूग खरीप | 545 | 205 | 965 | 622 | 495 | 600 | 799 | 598 | 480 | 554 | 1.2 |
| भूईमूग रब्बी | 1338 | 1034 | 1174 | 1616 | 3287 | 1080 | 1157 | 780 | 1079 | 1020 | -3.9 |
| सूर्यफूल | 602 | 346 | 524 | 640 | 567 | 610 | 610 | 317 | 437 | 535 | -1.2 |
| सोयाबीन | 1429 | 737 | 1000 | 1341 | 981 | 1198 | 1166 | 899 | 1003 | 3015 | 5.1 |
| करडी | 363 | 451 | 466 | 646 | 540 | 540 | 606 | 278 | 501 | 516 | 0.7 |
| कापूस (लिंट) | 102 | 60 | 84 | 107 | 148 | 126 | 146 | 88 | 148 | 119 | 5.4 |
| ऊस (टनात) | 78 | 65 | 65 | 72 | 75 | 66 | 65 | 66 | 78 | 74 | -0.3 |

आधार : विभागीय सहसंचालक, कृषी खाते औरंगाबाद, यांच्या कार्यालयाकडून मिळालेली आकडेवारी, वृद्धीदर स्वत: काढलेले आहेत.

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## सत्ताविसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सत्ताविसावे वार्षिक अधिवेशन **दिनांक 23 नोव्हेंबर ते 25 नोव्हेंबर 2003** या दरम्यान पालघर, जिल्हा ठाणे येथे होणार आहे. सोनोपंत दांडेकर कला महाविद्यालय, पालघर यांच्या विद्यमाने हे अधिवेशन आयोजित करण्यात आले असून त्यामध्ये परिषदेच्या सदस्यांनाच फक्त सहभागी होता येईल. अधिवेशनाच्या संयोजकांकडून परिषदेच्या सदस्यांना निमंत्रण व माहिती पत्रक पाठविण्यात आले आहे. प्रतिनिधी शुल्क रुपये चारशे धन्नास फक्त मनी ऑर्डरने/ डिमांड ड्राफ्टने ''**मराठी अर्थशास्त्र परिषद सत्ताविसावे अधिवेशन**'' या नावाने स्थानिक कार्यवाहांकडे पाठवावे. नव्याने परिषदेचे सदस्य होऊ इच्छिणाऱ्यांनी आपली सदस्यत्वाची वर्गणी (वार्षिक साधारण सदस्य वर्गणी रु. 150 किंवा आजीव सदस्य वर्गणी रु. 1200) पालघर येथेच प्रतिनिधी शुल्काबरोबर पाठवावी. या रकमेची रीतसर पावती यथावकाश संबंधितांकडे परिषदेच्या कार्यालयाकडून पाठविली जाईल.

आयत्या वेळेचा विषय (चौथ्या चर्चासत्रासाठी) खालीलप्रमाणे राहील.

## ''कॅनकून मंत्री परिषद व भारत''

या विषयावर निबंध मागविले जात नाहीत.

अधिवेशनासंबंधी आवश्यक तपशिलासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा :

**डॉ. अमृत बा. पोळ,**
**40, जयस् को. हाऊसिंग सोसायटी,**
**इमारत क्र. 2, 4 था माळा, जयप्रकाश नगर,**
**रस्ता क्र. 5, गोरेगांव (पूर्व)मुंबई-400 063**
**(दूरध्वनी क्रमांक. 28742728)**

**सर्जेराव ठोंबरे**
कार्यवाह - खजिनदार

Registration No. 31918/77

हे त्रैमासिक प्रा. सर्जेराव आसाराम ठोंबरे यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता श्रीनिवास मुद्रणालय, धंतोली, नागपूर 440012 येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, 42,रंजन 1 सोसायटी एन -9 सिडको, औरंगाबाद 431003 येथे प्रसिद्ध केले.